# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – २२

## सभावृत्तांत

दिनांक – १९.१०.२०१३ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑक्टोंबर २०१३ ची मा.महापालिका सभा शनिवार दि.१९.१०.२०१३ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

1. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
2. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
3. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
4. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
5. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
6. मा.भालेकर अरुणा दिलीप
7. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
8. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
9. मा.थोरात वनिता एकनाथ
10. मा.सायकर अजय शंकरराव
11. मा.जाधव साधना रामदास
12. मा.जाधव राहुल गुलाब
13. मा.आल्हाट मंदा उत्तम
14. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
15. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
16. मा.जगदीश शेटटी
17. मा.बाबर शारदा प्रकाश
18. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
19. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
20. मा.पवार संगीता शाम
21. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
22. मा.तानाजी विठ्ठल खाडे
23. मा.बो-हाडे शुभांगी संजय
24. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
25. मा.भारती फरांदे
26. मा.आर.एस.कुमार
27. मा.जावेद रमजान शेख

**28.** मा.चारुशीला प्रभाकर कुटे
**29.** मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
**30.** मा.पांढरकर निलेश शंकरराव
**31.** मा.नंदा विकास ताकवणे
**32.** मा.नेटके सुमन राजेंद्र
**33.** मा.तरस बाळासाहेब जयवंत
**34.** मा.भोंडवे संगिता राजेंद्र
**35.** मा.मोरेश्वर महादू भोंडवे
**36.** मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
**37.** मा.लोंढे गणेश नारायण
**38.** मा.शमीम पठाण (पठाणबाई)
**39.** मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे
**40.** मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
**41.** मा.अपर्णा निलेश डोके
**42.** मा.अनंत सुभाष को-हाळे
**43.** मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
**44.** मा.जयश्री वसंत गावडे
**45.** मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
**46.** मा.वाबळे संजय मल्हारराव
**47.** मा.मडिगेरी वर्षा विलास
**48.** मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
**49.** मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
**50.** मा.सुपे आशा रविंद्र
**51.** मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
**52.** मा.गोफणे अनुराधा देविदास
**53.** मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
**54.** मा.गव्हाणे सुरेखा शंकर
**55.** मा.श्रध्दा बाजीराव लांडे
**56.** मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
**57.** मा.लोंढे शुभांगी संतोष
**58.** मा.विश्वनाथ विठोबा लांडे
**59.** मा.सावळे सिमा रविंद्र
**60.** मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
**61.** मा.भोसले राहूल हनुमंतराव
**62.** मा.पालांडे सुजाता सुनिल
**63.** मा.बहल योगेश मंगलसेन
**64.** मा.कदम सदगुरु महादेव

**65.** मा.गिता सुशिल मंचरकर
**66.** मा.कैलास महादेव कदम
**67.** मा.छाया जगन्नाथ साबळे
**68.** मा.वाघेरे सुनिता राजेश
**69.** मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
**70.** मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
**71.** मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
**72.** मा.काळे विमल रमेश
**73.** मा.पाडाळे निता विलास
**74.** मा.विनोद जयवंत नढे
**75.** मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
**76.** मा.विमलताई सुरेश जगताप
**77.** मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
**78.** मा.बारणे निलेश हिरामण
**79.** मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
**80.** मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
**81.** मा.बारणे माया संतोष
**82.** मा.ओव्हाळ शेखर अशोक
**83.** मा.यमुनाताई रमणनाना पवार
**84.** मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
**85.** मा.कलाटे स्वाती मयुर
**86.** मा.नांदगुडे विलास एकनाथ
**87.** मा.चौंधे आरती सुरेश
**88.** मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
**89.** मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
**90.** मा.बोकड रामदास गेणभाऊ
**91.** मा.जवळकर वैशाली राहुल
**92.** मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
**93.** मा.जगताप राजेंद्र गणपत
**94.** मा.शितोळे शैलजा बाबुराव
**95.** मा.जगताप नवनाथ दत्तु
**96.** मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
**97.** मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
**98.** मा.जम सोनाली पोपट
**99.** मा.प्रशांत शितोळे
**100.** मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
**101.** मा.काटे रोहितअप्पा सुदाम

**102.**मा.गायकवाड संध्या सुरदास
**103.**मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
**104.**मा.शेंडगे आशा सुखदेव
**105.**मा.मोटे किरण बाळासाहेब
**106.**मा.संजय केशवराव काटे
**107.**मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
**108.**मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
**109.**मा.पाटील सुजित वसंत
**110.**मा.बो-हाडे अरुण तुकाराम
**111.**मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त,मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त,मा.झुरे-सह आयुक्त,मा.गायकवाड,मा.डॉ.माने,मा.कुलकर्णी,मा.दुरगुडे,मा.खांडकेकर-सहा.आयुक्त,मा.घाडगे - मुख्यलेखापरिक्षक,मा.गावडे-नगरसचिव,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.चव्हाण,मा.पाटील-सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.डॉ.रॉय-प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी,मा.भदाणे-उपसंचालक(नगररचना), मा.सवणे,मा.तांबे,मा.साळवी, मा.कुलकर्णी,मा.पिरजादे,मा.सय्यद,मा.दांगट,मा.बरशेटटी-कार्य.अभियंता,मा.उबाळे-प्रशासन अधिकारी, मा.चव्हाण-आरोग्य कार्यकारी अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौरः-** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

(१) जुनी सांगवी येथे जुनी ६ लक्ष लिटर पाण्याची टाकी, पंप हाऊस व पंप पाडून १५ ल.लि. क्षमतेची नवीन टाकी बांधणे या कामास अंदाजपत्रकातील प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेत बदल करणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १ (क) अंतर्गत दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांचे प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८५ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(२) जलक्षेत्र क्र. ड/१२ पिंपळे गुरव परिसरातील गुरुत्व वाहिनीवरील थेट पाणीपुरवठा बंद करणेकामी स.नं.७२ येथे २० द.ल.लि. क्षमतेची टाकी बांधणे या कामास अंदाज पत्रकातील प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेत बदल करणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १ (क) अंतर्गत दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांचे प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८५ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(३) कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्रामधील प्रक्रिया केलेले पाणी, CME येथे पुरविणेबाबत. मा.आयुक्त यांचे प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १ (क) अंतर्गत सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८५ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(४) मौजे ताथवडे या नव्याने पिंपरी चिंचवड मनपात समाविष्ट झालेल्या गावाची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधि.१९६६ च्या कलम ३० अन्वये शासनास सादर करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १-के अंतर्गत विषय दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांचे प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.महापालिका सभेत ऐनवेळचा विषय दाखल करुन घेत आहोत. ज्यावेळी महापालिका सभा झाली, त्यावेळी १के खाली विषय आला होता. याठिकाणी ज्या-ज्या सदस्यांच्या ताथवडे गावाच्या डि.पी. मध्ये प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे जागा आहेत, त्या सदस्यांना या चर्चेत भाग घेऊ देऊ नका. त्यांचे सात/बारा माझ्याकडे आहेत. ते असतील किंवा त्यांचे पार्टनर असतील. या विषयावर चर्चा चालू असताना त्यांनी या चर्चेत सहभाग घेतला तर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ११ ड नुसार अशा सदस्यांचे पद डायरेक्ट रद्द होते. या संदर्भात मी आपल्याला पत्र दिले होते. ताथवडे गावाचा डि.पी. चा विषय दाखल करुन घेत असताना माझे म्हणणे सुद्धा सभा कामकाजात सामील करुन घेण्यात यावे.

**मा.महापौर** – आत्ता फक्त विषय दाखल करुन घेणार आहोत. नंतर या विषयावर चर्चा करणार आहोत.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी आपल्याला पत्र देऊ का? ज्यांचे हितसंबधांचे विषय असतील, ते या सभागृहात डि.पी.वर बोलणार असतील तर त्यांचे कसे काय करणार? हा सभागृहाचा व आपला अधिकार आहे. आयुक्त साहेबांचा अधिकार आहे. सदस्य त्यांच्या हितात निर्णय घेणार असतील तर तसे पत्र मी आपल्याला द्यावे? हे पत्र नगरसचिव यांनी पहिले वाचून दाखवले होते. पूर्वी ब्ल्यू लाईन, रेड लाईनचा विषय झाला होता. त्याबाबत ज्या सदस्यांची सात/बारावर नावे आहेत, त्यांच्या जागा आहेत. याबाबत ठोस भूमिका घेतली पाहिजे. तसा तुम्ही विचार करा. मी पत्र देते.

**मा.महापौर** – हा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्य़ात येत आहे.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, तसे नगरसचिव यांनी मला सांगावे. तुमचे सुद्धा कायदा सांगायचे काम आहे. तुम्ही फक्त खुर्चीवर बसणार आहात का? महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार महापालिकेचा कारभार चालतो. तुम्ही सांगावे की, ज्यांचे हितसंबंधांचे विषय असतील त्यांनी सभागृहाबाहेर जावे म्हणून. सभागृह नियमानुसार चालले पाहिजे. ज्यांना स्वार्थ साधायचा आहे, ते त्याच पद्धतीने विषय मांडणार, ते त्यांचे आर्थिक हितसंबंध जोपासणार. नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी. नगरसचिव यांनी आपली भूमिका कणखरपणे बजावली पाहिजे. तुम्ही तुमची ड्युटी बजावणार आहात का? विषय चर्चेसाठी येण्याआधी इथे सांगितला पाहीजे. ज्यांचे हितसंबंध असतील त्यांनी बाहेर जावे. नाहीतर मी कोर्टात जाणार. कलम ११ ड नुसार या सदस्यांचे पद अनर्ह ठरवण्यात यावे असे सांगणार.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय आत्ता न घेता शहर सुधारणा समितीमार्फत येऊ द्या. शहर सुधारणा समितीत काही विषय येत नाहीत. हा विषय समितीतून आला पाहिजे. १के खाली विषय दाखल करण्यास  माझा आक्षेप आहे.

**मा.आप्पा बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ताथवडे गावाचा प्रारुप आराखड्यासंदर्भात १के खाली विषय घेतला आहे. विषयाला मंजूरी देत असताना हरकती/सूचना देऊन परत 1के खाली विषय घेतोय. हा विषय अजेंडावर का घेतला नाही? १ के खाली घेताय. ताथवडे गावाच्या डिपी संदर्भात अनेक वेळा वर्तमानपत्रांमध्ये बातम्या आल्या आहेत. त्याठिकाणी ब-याचशा प्रमाणात सावळा गोंधळ झालेला दिसतो आहे. यात कोणाचे हितसंबंध आहेत. हे हितसंबंधदेखील उघड झाले पाहिजेत. याचा सुद्धा खुलासा करावा. आयुक्तांनी विषय ठेवला आहे. त्यांनी खुलासा करावा. 1के खाली विषय का ठेवला आहे? एवढी घाई का होते आहे हे सुद्धा सभागृहाने सांगावे. याचा खुलासा करुन नंतर विषय दाखल करुन घ्यावा.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, हा विषय दाखल करण्यासंबधी विषय़ आहे. सन्मा. सदस्यांना जास्तीत जास्त मते मांडण्याचा अधिकार आहे. महापौर साहेब, मी तुम्हाला विनंती करतो की, हा विषय सभा कामकाजात दाखल करुन घ्यावा. नंतर चर्चा करण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा. आपल्याला विनंती आहे, विषय दाखल करुन घ्यावा. तो आपला अधिकार आहे.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी शहर सुधारणा समितीच्या सदस्यांनी सांगितले आहे, शहराच्या विकासासाठी शहर सुधारणा नावाची समिती निर्माण केली आहे. महापालिका सभेत गावांच्या विकास आराखड्याचा विषय डायरेक्ट १ के खाली येतो आहे. आयुक्त साहेबांमुळे प्रत्येकाला काटेकोरपणे काम करायची सवय लागली आहे. मात्र आपल्या उपस्थितीत हे घडते आहे. विकास आराखड्याचा विषय १के खाली आला होता. आत्ता सुद्धा 1के खालीच विषय येतो आहे. यामागे काय कारण आहे हे क्लिअर करा. १के खाली विषय घेण्यासाठी माझा विरोध राहील. शहर सुधारणा समितीतून विषय येऊ द्या. इतके दिवस विकास

आराखडा दडपून ठेवला होता. यामध्ये सगळ्या नगरसेवकांची बदनामी होते. देणे नाही घेणे नाही तरी नागरीकांचा आमच्याकडे पहायचा दृष्टीकोण बदलून गेला आहे. याचा खुलासा झाला पाहिजे. विषय १के खाली घ्यायची वेळ का आली? विषय दाखल करत असताना आमच्या सगळ्यांचा विरोध नोंदवून घ्या. आयुक्त साहेबांनी याचा खुलासा करावा.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, १के खाली विषय दाखल करायला हरकत नाही. मा.सिमाताई सावळे यांनी सांगितल्याप्रमाणे नियमानुसार सभा चालली आहे. ज्यांना ज्यांना जे जे आक्षेप नोंदवायचे आहे त्यांनी नोंदवावेत. हा महासभेचा अधिकार आहे. १ के खाली विषय दाखल करायचा का नाही करायचा. जेव्हा मूळ विषय दाखल केला तेव्हा सुद्धा १के खाली विषय दाखल केला होता. २/३ वर्षे विषय प्रलंबित होता. या कालावधीत कोणत्याही व्यक्तीने आक्षेप नोंदवलेला नाही. सभागृहापुढे विषय नियमानुसार मान्यतेसाठी येणार आहे. हा विषय आज जरी दाखल केला तरी यावर सविस्तर चर्चा होणार आहे. विषय का घेतला कारण विषय मांडायची अर्जन्सी आहे. ऑलरेडी उशीर झाला आहे. पूर्ण जुन्या हद्दीवरच्या नकाशाच्या रिव्हिजनसाठी विषय येणार आहे. प्रोसेस पूर्ण झाली पाहिजे. ६० दिवसांचा कालावधी पूर्ण झाला आहे. सूचना/हरकती घेतल्यानंतर त्यानुसार सदस्यांचे काय म्हणणे, समितीचे काय म्हणणे हे या समितीने सविस्तरपणे महासभेसमोर मांडले आहे. त्यांचे गा-हाणे उघड होणार आहे, त्यावर चर्चा होणार आहे. विषय कोणी दाखल करायचा, कशासाठी दाखल करायचा, आयुक्तांना का घाई आहे, हे प्रश्न बाजूला ठेवून विषय येईल तेव्हा तुम्ही हे प्रश्न विचारू शकता.

**मा.महापौर** – विषय दाखल करुन घेण्यात येत आहे. या विषयावर नंतर चर्चा करणार आहोत. त्यावेळी आयुक्त साहेब सर्व माहिती सांगतील.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आयुक्तांनी खुलासा का केला नाही. अजेंडा १० तारखेला झाला त्यावेळी अजेंडावर विषय का येऊ दिला नाही ते सांगा.

**मा.महापौर** – जी कमिटी याकरिता नेमली होती, त्यांनी पूर्ण अभ्यास करुन हा विषय ठेवलेला आहे.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, तुम्हाला खुलासा करायला सांगितला होता, तुम्ही का केलेला नाही?

अनुकूल - ८५ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(५) पुणे-नाशिक महामार्गावरील भोसरी येथील राजमाता जिजाऊ उड्डाणपुलाखालील परिसर विकसीत व सुभोभिकरण करणेबाबतचा विषय महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम- १(क) अंतर्गत महापालिका सर्वसाधारण सभेची प्रशासकिय मान्यता घेणेसाठी विषयपत्र दाखल करुन

घेणेबाबत मा.आयुक्त यांचे प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८५ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उपस्थित सभागृह दिनांक २६/९/२०१३ च्या पाकिस्तानी अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात शहिद झालेले जवान यांना तसेच डॉ.मोहन धारिया - माजी केंद्रीय मंत्री व वनराई संस्थेचे संस्थापक पदमविभूषण, दशरथ ज्ञानोबा लांडगे - माजी नगरसेवक, प्रसाद शेटटी - हॉटेल व्यवसायिक व स्थायी समिती माजी सभापती जगदीश शेटटी यांचे बंधू, शंकर नारायण नवरे (शं.ना.नवरे) - जेष्ठ लेखक, राजीव पाटील - पदमश्री पुरस्कार सन्मानित सुप्रसिध्द दिग्दर्शक, ह.भ.प.धोंडीबा मारुती वाघेरे, भानुदास तापकीर, आर.ओ.पाटील, आण्णा जाधव, नूतन गजानन चव्हाण, कुमार भारत कोकरे - प्रोपा.कोकरे मंडप, पार्वती शंकरराव देशमुख, पोपट दळवी, नदाफ शेख, वस्ताद किसन उर्फ बापू नाना तरस, कै.विमल दत्तात्रय राऊत, भामाबाई रामचंद्र चिंचवडे (पाटील) यांना श्रध्दांजली अर्पण करावी अशी विनंती करतो.

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.प्रशांत शितोळे** - ही सभा शुक्रवार दिनांक २५/१०/२०१३ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत तहकूब करावी अशी विनंती करतो.

**मा.राजू मिसाळ** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे शुक्रवार दिनांक २५/१०/२०१३ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – २२**

**सभावृत्तांत**

**(दिनांक १९.१०.२०१३ ची तहकूब सभा)**

दिनांक – २५.१०.२०१३ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑक्टोंबर २०१३ दि.१९.१०.२०१३ची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२५.१०.२०१३ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.जगदीश शेटटी
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२०. मा.उल्हास शेट्टी
२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२२. मा.पवार संगीता शाम
२३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२५. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२६. मा.भारती फरांदे
२७. मा.आर.एस.कुमार
२८. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
२९. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३०. मा.नेटके सुमन राजेंद्र
३१. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३२. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३३. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३४. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३५. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३६. मा.लोंढे गणेश नारायण
३७. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३८. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे
३९. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४०. मा.अपर्णा निलेश डोके
४१. मा.अनंत सुभाष को-हाळे
४२. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४३. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४४. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४५. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
४६. मा.सुपे आशा रविंद्र
४७. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४८. मा.गोफणे अनुराधा देविदास
४९. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५०. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
५१. मा.लोंढे शुभांगी संतोष
५२. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
५३.मा.सावळे सिमा रविंद्र
५४. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
५५. मा.पालांडे सुजाता सुनिल
५६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
५७. मा.कदम सदगुरु महादेव
५८. मा.कैलास महादेव कदम
५९. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
६०. मा.आसवाणी सविता धनराज
६१. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
६२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

६३. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
६४. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
६५. मा.काळे विमल रमेश
६६. मा.पाडाळे निता विलास
६७. मा.विनोद जयवंत नढे
६८. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
६९. मा.कैलास गबाजी थोपटे
७०. मा.विमलताई सुरेश जगताप
७१. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
७२. मा.बारणे निलेश हिरामण
७३. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
७४. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
७५. मा.बारणे माया संतोष
७६. मा.ओव्हाळ शेखर अशोक
७७. मा.यमुनाताई रमणनाना पवार
७८. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
७९. मा.कलाटे स्वाती मयुर
८०. मा.नांदगुडे विलास एकनाथ
८१. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
८२. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
८३. मा.बोकड रामदास गेणभाऊ
८४. मा.जवळकर वैशाली राहुल
८५. मा.जगताप राजेंद्र गणपत
८६. मा.शितोळे शैलजा बाबुराव
८७. मा.जगताप नवनाथ दत्तु
८८. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
८९. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
९०. मा.जम सोनाली पोपट
९१. मा.प्रशांत शितोळे
९२. मा.गायकवाड संध्या सुरदास
९३. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
९४. मा.शेंडगे आशा सुखदेव
९५. मा.मोटे किरण बाळासाहेब
९६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
९७. मा.संजय केशवराव काटे
९८. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
९९. मा.पाटील सुजित वसंत

१००. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१०१. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त,मा.झुरे-सह आयुक्त,मा.टेकाळे, मा.डॉ.माने, मा.कुलकर्णी, मा.दुरगुडे, मा.माछरे - सहा.आयुक्त, मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक,मा.गावडे-नगरसचिव, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.चव्हाण, मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.दुधेकर, मा.सवणे, मा.निकम, मा.पठाण, मा.लडकत, मा.साळवी, मा.सय्यद, मा.कुलकर्णी, मा.बरशेटटी - कार्य.अभियंता, मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.चव्हाण-आरोग्य कार्यकारी अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौरः-** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.शत्रुघ्न काटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सादबा उर्फ आप्पासाहेब काटे-माजी महापौर,मन्ना डे उर्फ प्रबोधचंद्र डे–हिंदी चित्रपट संगीतात ठसा उमटविणारे ज्येष्ठ गायक,ऋषीकेश बापू सरोदे–मनपा शाळेतील विद्यार्थी यांचे दुःखद निधन झाले असल्याने त्यांना श्रद्धांजली वाहण्यात यावी.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, आपल्या शहराचे आदर्श व्यक्तिमत्व व शहराचे माजी महापौर सादबा उर्फ आप्पासाहेब काटे यांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले. आपली महापालिका स्थापन झाली, त्या कालावधीत त्यांना सावळे महापौर पद मिळाले होते. आज यादरम्यान अनेक वर्षांचा कालावधी उलटून गेला आहे. आज याठिकाणी मा.आप्पा बारणे, मा.भाऊसाहेब भोईर ही जुनी मंडळी यांनी त्यांच्या बरोबर, त्यांच्या सहका-यांबरोबर राहून त्यांचे काम पाहीले आहे. त्यावेळी सांगवी, पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, पिंपरी, आकुर्डी, निगडी अशी छोटी छोटी गावे होती. आज या छोट्या छोट्या गावांचे मिळून एक वेगळे अस्तित्व असलेले शहर उभे राहिलेले पाहतोय. पूर्वीच्या काळी कै. आप्पासाहेब हे महापौर असताना त्यावेळची परिस्थिती वेगळी होती, मानसिकता वेगळी होती. यायल-जायला रस्ते नव्हते. त्यावेळी त्यांनी घेतलेले धडाडीचे निर्णय सगळ्यांना माहित आहेत. मा.शरद पवार यांचे नेतृत्व मानणारे कै.आप्पासाहेब हे होते. त्यांच्या विचारांतून होणारी चांगल्या कामे, त्या कामांना गती देण्याचा प्रयत्न त्यांच्या कालावधीत केलेला आहे. या शहराच्या जडणघडणीत त्याचे प्रयत्न होते. शंभर टक्के गाववाले होते. त्यांना या गावांचे मिळून एक शहर करायचे होते. आज याठिकाणी अतिशय सुनियोजित विकास झालेले शहर दिसते आहे. यामागचे कारण हेच आहे. कोणत्याही अनावश्यक गोष्टींची इथे उपलब्धता नाही. हे करु न देण्यात त्यांच्यासारख्या विचारवंत लोकांचा सहभाग आहे. या

शहरासाठी त्याचे मोठे योगदान दिसून येते. या नगरीला उद्योगनगरी म्हणून संबोधले जाते. उद्यानांची नगरी म्हणून संबोधले जाते. या शहराचे वेगवेगळे पैलू बघायला मिळतात. जेव्हा महापालिका अस्तित्वात आली त्यावेळी पहिल्या टर्मचे नेतृत्व ज्यांनी केले. त्यातील आप्पासाहेब एक होते. त्यांचे काही दिवसांपूर्वी दुःखद निधन झाले आहे. मी सभागृहाच्या वतीने त्यांच्या विचारांशी सुसंगत आहे. त्यांचे विचार आपल्याबरोबर कायम राहतील अशीच अपेक्षा व्यक्त करतो. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज आपण पिंपरी चिंचवडचे ज्येष्ठ नेते, पिंपरी चिंचवड शहराच्या जडणघडणीत ज्यांचा सहभाग आहे असे आप्पासाहेब काटे यांना शहर श्रद्धांजली अर्पण करीत आहे. पिंपरी चिंचवडची जडणघडण, ज्यांच्या कल्पनेतून झाली, ज्यांनी हे शहर म्हणून साकार केले, त्या आदरणीय कै.आण्णासाहेब मगर यांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारे आप्पासाहेब काटे यांच्याबरोबर काम करायचा योग मला सुद्धा आलेला आहे. खूप कमी बोलणारे, मीतभाषी परंतू सर्वांवर दरारा असणारे, शिस्तप्रिय असे कै. आप्पासाहेब आमचे मार्गदर्शक होते. आदरणीय शरदचंद्रजी पवार यांच्याबरोबर, त्यांच्या विचारांशी, त्यांच्या कार्याशी ते नेहमीच सहमत होते. सतत त्यांच्या बरोबर असायचे. शेवटपर्यंत त्यांच्या विचारांशी एकनिष्ठ राहीले होते. असे आमचे नेते आदरणीय आप्पासाहेब काटे यांचे निधन झाले आहे. त्यांना इथे श्रद्धांजली अर्पण करते.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, कै.सादबा काटे यांना या सभागृहाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहत असताना एक आदर्श व्यक्तित्व व सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य. खरेतर त्यांनी त्यांच्या सामाजिक व राजकीय कारकीर्दीत अनेक संस्थांवर काम केले होते. पिंपळे सौदागर गावाचे सरपंच, पंचायत समितीचे सदस्य नंतर जिल्हा परिषद समितीचे सदस्य, महापालिकेच्या स्थापनेनंतर पहिली निवडणूक झाली, त्यावेळी शहरात जे ६० सदस्य निवडून आले होते त्यामध्ये आप्पासाहेब सुद्धा एक नगरसेवक म्हणून निवडून आले होते. त्यानंतर त्यांना या नगरीचे महापौर पद सुद्धा मिळाले. अतिशय शांत स्वभाव, सर्वांना मिळून-मिसळून घेणारे असे आप्पासाहेब होते. त्यांच्या चेह-यावर कधी राग पाहिलेला नाही. सातततत्याने पंढरीची वारी करणारे, महापौर असताना सुद्धा रांगेत थांबून पंढरपूरच्या पांडूरंगाचे दर्शन घेणारे पंढरीचे वारकरी होते. कै.आण्णासाहेब मगर, कै.रामकृष्ण मोरे व मा.शरदचंद्रजी पवार यांच्या बरोबर काम करणारे व्यक्तीत्व, नेतृत्व या शहराला लाभले होते. शहराच्या वतीने, आप्पासाहेब काटे यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो.

**मा.भाऊसाहेब भोईर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, कै. आप्पासाहेब ऊर्फ सादबा काटे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सभागृहात तहकूबी घेतली आहे. शहरात अशी व्यक्तीत्वे होऊन गेली आहेत, ज्यांचे आवर्जून नाव घ्यावे असे ऋषितुल्य, आदरयुक्त व्यक्तीमत्व म्हणजे कै.आप्पासाहेब काटे. काही लोकांची प्रतिष्ठा पदामुळे वाढते. काही व्यक्तींची त्या पदामुळे शहरामध्ये ओळख निर्माण होते. काही व्यक्तींमुळे पदाची प्रतिष्ठा वाढते. कै.आप्पासाहेब असे व्यक्तिमत्व होते, ज्यांच्यामुळे महापौर पदाची ऊंची वाढली आहे. स्वतःचे नाव, पद बाजूला ठेवून ते शहरात कायम कार्यरत राहीले. १९८६च्या निवडणुकांनंतर शहरात वेगळे वातावरण

होते. २४ सदस्य काँग्रेस आय चे व १० सदस्य एस काँग्रेसचे होते. एस काँग्रेस काँग्रेस आय मध्ये विलीन झाल्यानंतर कै.रामकृष्ण मोरे यांनी काही लोकांना पदाधिकारी म्हणून त्यांचे नाव निश्चित केले होते. त्यातील एक नाव कै.आप्पासाहेब काटे हे होते. दिवंगत मोरे साहेब यांनी त्यांची दखल का घेतली असेल? त्यावेळी वातावरण वेगळे होते. राजकारणात, चढाओढ वेगवेगळे प्रकार अवलंबले जात होते. राजकारणाची पत कमी होते का असा प्रश्न त्यांना पडला होता. यावर एकच उत्तर होते, आदरणीय आप्पासाहेब काटे यांना त्या खुर्चीवर बसवायचे. त्यावेळी सर्व नगरसेवकांवर कायद्याचे बंधन नव्हते. फार मोठी कारवाई होत नव्हती. सगळे सभागृहात एक राहीले. आप्पासाहेबांनी महापौर पदाची उंची वाढवली. जास्तीत जास्त कार्य असो, कोणत्याही रोडला दुरुस्ती असली तरी आप्पासाहेब १५ दिवस वारीला जात होते. माझे नात्यातील संबंध असल्यामुळे त्यांच्याशी वेगळ्या पद्धतीची जवळीक आहे. कार्यकर्त्यांना सक्ती न करता काम झाले नाहीतर, अबोल भाषेने त्याच्यावर किती प्रेम करायचे, असे राग न येणारे व्यक्तीमत्व होते. मी विद्यार्थी दशेत काम करत असताना एक फोनवर काम होत होते. आप्पासाहेबांची अपॉईंटमेंट घ्यावी लागते, त्यांची पी.ए. असतो असा प्रकार त्यांना माहित नव्हता. त्यावेळी वायरलेस होते. मुलांना नाराज करायला नको असे समजून त्यांना आशिर्वाद देणारे आप्पासाहेब, त्यांच्या जाण्यामुळे त्यांच्या कुटूंबियांचे कधीही न भरून येणारे नुकसान झाले आहे. शहरामध्ये काही नावे घ्यावी लागतात तरच शहराचा इतिहास पूर्ण होतो. पिंपरी चिंचवड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

**मा.शत्रुघ्न काटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ज्येष्ठ मार्गदर्शक, मीतभाषी स्वभावाचे आदरणीय माजी महापौर सादबा काटे आमच्याच कुटूंबातील होते. आपण सर्वांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. सभागृहाला विनंती करतो की, आजची सभा शनिवार दिनांक १६/११/२०१३ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात यावी.

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** – आपण आत्ताच आप्पासाहेब काटे, माजी महापौर यांना पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने श्रद्धांजली वाहिली आहे. उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन शनिवार दिनांक १६/११/२०१३ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – २२**

**सभावृत्तांत**

**(दिनांक १९.१०.२०१३, २५.१०.२०१३ ची तहकूब सभा)**

दिनांक – १६.११.२०१३ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑक्टोंबर २०१३ दि.२५.१०.२०१३ ची तहकूब मा.महापालिका सभा शनिवार दि.१६.११.२०१३ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.जगदीश शेटटी
१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१८. मा.उल्हास शेट्टी
१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२०. मा.पवार संगीता शाम
२१. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२२. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२३. मा.भारती फरांदे
२४. मा.जावेद रमजान शेख

२५. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
२६. मा.पांढरकर निलेश शंकरराव
२७. मा.नंदा विकास ताकवणे
२८. मा.नेटके सुमन राजेंद्र
२९. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३०. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३१. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३२. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३३. मा.लोंढे गणेश नारायण
३४. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३५. मा.†।›।.संदीप गुलाब चिंचवडे
३६. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
३७. मा.अपर्णा निलेश डोके
३८. मा.अनंत सुभाष को-हाळे
३९. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४०. मा.प्रसाद शेट्टी
४१. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४२. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४३. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४४. मा.शेख अस्लम शैकत
४५. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४६. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४७. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
४८. मा.सुपे आशा रविंद्र
४९. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५०. मा.गोफणे अनुराधा देविदास
५१. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
५२. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५३. मा.महेशदादा किसन लांडगे
५४. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
५५. मा.लोंढे शुभांगी संतोष
५६. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
५७. मा.सावळे सिमा रविंद्र
५८. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
५९. मा.भोसले राहूल हनुमंतराव
६०. मा.पालांडे सुजाता सुनिल
६१. मा.बहल योगेश मंगलसेन

६२. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
६३. मा.कदम सदगुरु महादेव
६४. मा.गिता सुशील मंचरकर
६५. मा.कैलास महादेव कदम
६६. मा.छाया जगन्नाथ साबळे
६७. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
६८. मा.वाघेरे सुनिता राजेश
६९. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
७०. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७१. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७२. मा.काळे विमल रमेश
७३. मा.पाडाळे निता विलास
७४. मा.विनोद जयवंत नढे
७५. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
७६. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
७७. मा.विमलताई सुरेश जगताप
७८. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
७९. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८०. मा.बारणे माया संतोष
८१. मा.ओव्हाळ शेखर अशोक
८२. मा.यमुनाताई रमणनाना पवार
८३. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८४. मा.कलाटे स्वाती मयुर
८५. मा.नांदगुडे विलास एकनाथ
८६. मा.चौंधे आरती सुरेश
८७. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
८८. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
८९. मा.बोकड रामदास गेणभाऊ
९०. मा.जवळकर वैशाली राहुल
९१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९२. मा.जगताप राजेंद्र गणपत
९३. मा.शितोळे शैलजा बाबुराव
९४. मा.जगताप नवनाथ दत्तु
९५. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
९६. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
९७. मा.जम सोनाली पोपट
९८. मा.प्रशांत शितोळे

९९. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१००. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१०१. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०२. मा.शेंडगे आशा सुखदेव
१०३. मा.मोटे किरण बाळासाहेब
१०४. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
१०५. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१०६. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
१०७. मा.पाटील सुजित वसंत
१०८. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी - आयुक्त, मा.तानाजी शिंदे – अति.आयुक्त, मा.टेकाळे, मा.गायकवाड, मा.डॉ.माने, मा.माछरे, मा.खांडकेकर - सहा.आयुक्त, मा.घाडगे - मुख्यलेखापरिक्षक, मा.गावडे - नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.चव्हाण-सह शहर अभियंता, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.निकम, मा.पठाण, मा.साळवी, मा.पिरजादे, मा.बरशेटटी - कार्य.अभियंता, मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.चव्हाण - आरोग्य कार्यकारी अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौरः-** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.योगेश बहल** –मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, दत्तात्रय सखाराम पाटील - माजी महापौर व सभागृह नेता सौ.मंगलाताई अशोक कदम यांचे वडील, डॉ.दिलिप सोपानराव घुले – राष्ट्रवादी काँग्रेसच्या जेष्ठ नागरीक सेलचे प्रदेशाध्यक्ष, मुक्ताबाई किसन मुरकुटे – नगरसदस्या अरुणा भालेकर यांच्या मातोश्री, अनुसया धर्माजी वाल्हेकर – शिवसेना शहरप्रमुख भगवान वाल्हेकर यांच्या मातोश्री, कृष्णाबाई साहेबराव भापकर–पिंपरी चिंचवड मनपाचे माजी नगरसेवक मारुती भापकर यांच्या मातोश्री, मालती जोशी – पत्रकार मदन जोशी यांच्या मातोश्री, सुधीर भट – जेष्ठ नाट्यनिर्माते, सोपानराव दगडू काळभोर – निगडी येथिल जेष्ठ नागरीक यांचे दुःखद निधन झाले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, रुपा शेट्टी – पिंपरी चिंचवडचे माजी नगरसेवक सर्वोत्तम शेट्टी यांच्या पत्नी, बालकृष्णन महादवन – प्रसिद्ध †›व्होकेट, महादेव केमसे – लोकमतचे पत्रकार मयुर केमसे यांचे वडिल, सचिन लांडे – पिंपरी चिंचवड मनपाच्या माजी नगरसेविका श्रीमती सुमन पवळे यांचे जावई यांचे दुःखद निधन झाले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**मा.नारायण बहिरवाडे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, मा.महापालिका सभा गुरुवार दि.२१/११/२०१३ रोजी दुपारी १.०० पर्यंत तहकूब करणेत यावी.

**मा.राजू मिसाळ –** मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर** – उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन गुरुवार दिनांक २१/११/२०१३ रोजी दुपारी १.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – २२</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दिनांक १९.१०.२०१३, २५.१०.२०१३, १६.११.२०१३ ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक – २१.११.२०१३</u> <u>वेळ – दुपारी १.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑक्टोंबर २०१३ दि.१६/११/२०१३ ची तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दि.२१.११.२०१३ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.जगदीश शेटटी
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१९. मा.उल्हास शेट्टी
२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२१. मा.पवार संगीता शाम
२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२३. मा.तानाजी विठठल खाडे
२४. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२५.मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२६.मा.भारती फरांदे
२७.मा.आर.एस.कुमार
२८.मा.जावेद रमजान शेख
२९.मा.चारुशीला प्रभाकर कुटे
३०.मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३१. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३२.मा.नंदा विकास ताकवणे
३३.मा.नेटके सुमन राजेंद्र
३४.मा.तरस बाळासाहेब जयवंत
३५.मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३६.मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३७.मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३८.मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३९.मा.लोंढे गणेश नारायण
४०.मा.शमीम पठाण (पठाणबाई)
४१. मा.[illegible].संदीप गुलाब चिंचवडे
४२.मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४३.मा.अपर्णा निलेश डोके
४४.मा.अनंत सुभाष को-हाळे
४५. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४६.मा.प्रसाद शेट्टी
४७. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४८.मा.काळभोर वैशाली जालिंदर
४९.मा.सौ.साळुंके सविता सुरेश
५०.मा.शेख अस्लम शैकत
५१.मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५२.मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५३.मा.वाबळे संजय मल्हारराव
५४. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
५५. मा.सुपे आशा रविंद्र
५६.मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५७. मा.अजित दामोदर गव्हाणे
५८.मा.गोफणे अनुराधा देविदास
५९.मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
६०. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
६१. मा.महेशदादा किसन लांडगे

६२.मा.श्रध्दा बाजीराव लांडे
६३. मा. [illegible].नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६४.मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६५.मा.ननवरे जितेंद्र बाबा
६६.मा.सावळे सिमा रविंद्र
६७.मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६८.मा.भोसले राहूल हनुमंतराव
६९.मा.पालांडे सुजाता सुनिल
७०.मा.बहल योगेश मंगलसेन
७१.मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७२.मा.कदम सदगुरु महादेव
७३.मा.गिता सुशील मंचरकर
७४. मा.कैलास महादेव कदम
७५. मा.छाया जगन्नाथ साबळे
७६.मा.आसवाणी सविता धनराज
७७. मा.वाघेरे सुनिता राजेश
७८.मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७९.मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
८०.मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
८१. मा.काळे विमल रमेश
८२.मा.विनोद जयवंत नढे
८३.मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८४.मा.विमलताई सुरेश जगताप
८५.मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८६.मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे
८७.मा.बारणे माया संतोष
८८.मा.ओव्हाळ शेखर अशोक
८९.मा.यमुनाताई रमणनाना पवार
९०. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
९१. मा.कलाटे स्वाती मयुर
९२.मा.नांदगुडे विलास एकनाथ
९३.मा.चौंधे आरती सुरेश
९४.मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
९५.मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
९६. मा.बोकड रामदास गेणभाऊ
९७.मा.जवळकर वैशाली राहुल
९८.मा.जगताप राजेंद्र गणपत

९९. मा.शितोळे शैलजा बाबुराव
१००. मा.जगताप नवनाथ दत्तु
१०१. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१०२. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१०३. मा.जम सोनाली पोपट
१०४. मा.प्रशांत शितोळे
१०५. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१०६. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०७. मा.शेंडगे आशा सुखदेव
१०८. मा.मोटे किरण बाळासाहेब
१०९. मा.संजय केशवराव काटे
११०. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
१११. मा.पाटील सुजित वसंत
११२. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
११३. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी - आयुक्त, मा.तानाजी शिंदे – अति.आयुक्त, मा.टेकाळे, मा.माछरे, मा.डॉ.माने, मा.खांडकेकर - सहा.आयुक्त, मा.गावडे - नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.चव्हाण - सह शहर अभियंता, मा.भोसले - मुख्य लेखापाल, मा.डॉ.रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.साळवे - अति.वैद्य. अधिकारी, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.तांबे, मा.काची, मा.पठाण, मा.साळवी, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.सय्यद, मा.बरशेटटी - कार्य.अभियंता, मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.चव्हाण - आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.जगताप - समाज विकास अधिकारी, मा.जरांडे - सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर :-** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त,अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, माझ्या भागातील सामाजिक कार्यकर्ते बाबाजी उत्तम सोनवणे, वत्सलाबाई दत्तोबा कवडे यांचे दुःखद निधन झाले असल्याने त्यांना श्रद्धांजली वाहण्यात यावी.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, आकुर्डी भागातील बंडोपंत जगताप यांचे दुःखद निधन झाले असल्याने त्यांना श्रद्धांजली वाहण्यात यावी.

**मा.राजू मिसाळ** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.अपर्णा डोके** – मा.महापौर साहेब, केशवनगर भागातील समिर रानवडे, सुंदराबाई लक्ष्मण दातीर यांचे दुःखद निधन झाले असल्याने त्यांना श्रद्धांजली वाहण्यात यावी.

**मा.राजू मिसाळ** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

---------

मा.महापालिका सभा क्र.२० दि.१९/०८/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**<u>प्रश्नोत्तरे</u>**

**मा.महापौर** – हा प्रश्न न्यायप्रविष्ट आहे म्हणून फक्त चर्चा करता येईल.

**मा.अनंत को-हाळे** – मी मागिल महापालिका सभेमध्ये काही प्रश्नोत्तरे विचारली होती. ईडब्ल्यूएस संदर्भात सर्वांचे लक्ष वेधू इच्छितो की, हा प्रोजेक्ट २००८-०९ ला सुरु झाला असला तरी या प्रोजेक्टचे काम आत्ता सुद्धा चालू आहे. या प्रोजेक्टमध्ये जो काही भ्रष्टाचार होतो आहे, त्याकडे प्रामुख्याने लक्ष वेधू इच्छितो. मी प्रश्न क्र.२ (अ) विचारला होता, मंजुरी घेण्यात आली त्यावेळी प्रति चौ.फु. बांधकामाचा दर किती होता? त्याचे मला उत्तर देण्यात आले आहे की, मंजुरीस अनुसरुन इमारती बांधकामाचा प्रति चौ.फुट दर पॅकेज-१ साठी र.रु.११००/- व पॅकेज-५ व ६ साठी र.रु.११५२/- एवढा दर येतो आहे. दोन्हीमध्ये बांधकाम सारखेच आहे. दोन्ही पॅकेजमध्ये एकाच प्रकारची बिल्डींग बांधली जाणार आहे. मग पॅकेज ५ व ६ चा दर जास्त आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे हा दर ठरविताना डीएसआरचा वापर करण्यात आला नाही. ज्यावेळी डीएसआरप्रमाणे, बांधकाम रेट धोरणाप्रमाणे ९००/९५० घरांसाठी १५०/२०० प्रति चौ.फूट दरवाढ जास्त आकारण्यात आलेली आहे. भ्रष्टाचाराची सुरुवात इथूनच झालेली आहे. १५०/२०० कोटींचा भ्रष्टाचाराचा हा विषय आहे. शहरातील नागरीकांना आपल्याकडून भरपूर अपेक्षा आहेत. आपण पिंपरी चिंचवड शहरात या भागातून अतिशय काटेकोरपणे भरपूर काम केलेले आहे. त्यामुळे नागरीक आपल्याकडे या अपेक्षेने बघतात की, जे काही प्रकल्प राबविले जातात ते लवकरात लवकर पूर्ण होऊन त्याचा लाभ लाभार्थ्याला मिळावा. या उद्देश्याने आपल्याकडे पाहिले जाते. आपण जर बघितले तर सर्वात महत्वाचे हे की हा ठराव ईडब्ल्यूएसचा विषय कोणी मांडला. याविषयी माहिती मिळाली नाही. नक्की ठराव कोणी

आणला? गोरगरीबांना घरे देण्यासाठी आणला आहे का आपले खिसे भरण्यासाठी ही योजना तयार केलेली आहे. याचे खूप मोठे कोडे नागरीकांना इथे आहे. संबंधित अधिका-यांना जे प्रश्न विचारले, त्याची सविस्तर उत्तरे देण्यासाठी त्यांना बोलवावे.

**मा.महापौर** – हा विषय न्यायप्रविष्ट आहे म्हणून अशी प्रश्नांची उत्तरे देता येणार नाहीत.

**मा.अनंत को-हाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी भ्रष्टाचाराविषयी बोलतोय. मागील महापालिका सभेत पाण्याच्या बंद पाईप लाईनसंदर्भात ज्यावेळी चांगलीच चर्चा झालेली होती, त्यावेळी हा मुद्दा का काढला नाही. उत्तरे द्यायची नसतील तर लोकांना कशाला सुळावर घ्यायचे?

**मा.नगरसचिव** – अधिनियमातील तरतुदी इथे वाचून दाखवतो, यामध्ये जे प्रश्न विचारले कलम ५ अनुसूची ड मध्ये त्याची तरतूद आहे. कोणताही प्रश्न लादलेल्या निर्बंधाच्या कक्षेत येतो किंवा नाही याबाबत शंका उपस्थित झाल्यास त्या मुद्यावर मा.महापौर यांनी निर्णय दिला आहे. त्यांचा निर्णय अंतिम असेल.

**मा.महापौर** – हा विषय न्यायप्रविष्ट आहे म्हणून या विषयावर चर्चा करता येत नाही हे आधीच सांगितले आहे. (बंद पाईप नळ योजना न्यायप्रविष्ट नाही.)

**मा.अनंत को-हाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, भ्रष्टाचाराविषयी चर्चा करतोय. एफ.एस.आय. विषयी बोलणार नाही. प्रशासनाला पाठिशी घालणार असाल तर निश्चित नागरीकांची दिशाभूल करताय अशी नागरीकांना घरासंदर्भात शंका येते आहे. ठराविक प्रश्नांची उत्तरे द्यायला सांगा.

**मा.महापौर** – लेखी उत्तरे दिली आहेत.

**मा.अनंत को-हाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उत्तरे चुकीची दिलेली आहेत.

**मा.महापौर** – आयुक्तांशी परत एकदा बोला.

---------

**मा.अपर्णा डोके** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १

दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/वा.क/कावि/१४६/२०१३ दि.३१/७/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४१०९ दि.२१/०९/२०१३

मा.शहर सुधारणा समिती सभा दिनांक २६/०८/२०१३ ठराव क्र.२७ नुसार, पुणे शहर वाहतूक पोलिसांनी केलेल्या मागणीनुसार पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील नियोजित बी.आर.टी. मार्गातून अवैधपणे/अनधिकृतपणे संचलन करणा-या शहरातील इतर रस्त्यावर ‘नो

पार्कींग' झोनमध्ये उभी राहणारी व शहरात इतर ठिकाणी अवैध पार्कींग करुन वाहतूकीचे सुरळीत संचलनात अडथळा ठरणा-या सर्व प्रकारच्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करणेस व त्यापोटी सदर वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क मनपाच्या पावती पुस्तकाद्वारे वसूल करुन त्यातील ५० टक्के रक्कम वाहतूक पोलिसांना वाहतूकीचे साहित्य खरेदी इ.साठी ठेवून उर्वरित ५० टक्के रक्कम महानगरपालिकेच्या कोषागारात भरणा वाहतूक पोलिसांनी करावा. सदर प्रस्तावानुसार मनपा रस्त्यावर अवैध पार्कींग करणा-या व 'नो पार्कींग' मध्ये उभ्या राहणा-या आणि बी.आर.टी. मार्गामधून अनधिकृतपणे संचलन करणा-या सर्व प्रकारच्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी आणि त्यापोटी सदर वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क खालीलप्रमाणे आकारणेत यावे.

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | विमोचन व प्रशासकीय शुल्क रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | अवजड वाहने ट्रक, बस, ट्रेलर्स इ. | ५,०००/- |
| २ | रोड रोलर, इतर यंत्र सामुग्री | ३,०००/- |
| ३ | हलकी वाहने १० टनापर्यंत क्षमता | २,५००/- |
| ४ | कार, जीप इ. | २,०००/- |
| ५ | सहा आसनी रिक्षा, टेम्पो इ. | १,५००/- |
| ६ | स्वयंचलित दुचाकी वाहने | १,०००/- |

उपरोक्त प्रमाणे वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क मनपाच्या पावतीपुस्तकाद्वारे वसुल करण्यासाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २०८ अन्वये मनपाचे अधिकार वाहतूक पोलिसांना प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.शुभांगी बो-हाडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, बीआरटी मार्ग व इतर मार्ग आहेत, त्याठिकाणी वाहनधारकांकडून काही नियम मोडले तर ट्रॅफिक पोलिसाकडून त्यांच्यावर कारवाई केली जाते. दंडात्मक कारवाई करण्यासाठी त्यांना परवानगी देण्याचा विषय आहे. आपली परवानगी असो किंवा नसो, हा विभाग अतिशय सक्षम, अक्टिव्ह असलेला विभाग आहे. न सांगता सुद्धा कारवाई होतच असते. रोख स्वरुपात, पावती देऊन किंवा पावती न देताही नागरीक दंड भरत असतात. ते त्यांचे काम करत असतात. आपण ठराव करुन त्यांच्या हातात कोलीत देतो आहोत. हा सगळ्यांचाच अनुभव आहे. खरेतर त्यांच्या विभागाचे कोणीतरी इथे असायला पाहिजे होते. त्यांच्या समोर बोललो असतो तर त्यांना सुद्धा कळाले असते. त्यांनी फक्त दुचाकींसाठीच ठराव पास केल्यानंतर मोठमोठे आकडे दिले होते. अवजड वाहने, रोडरोलर, इंडिका, नॅनोसारख्या कार ही वाहने उचलत नाहीत. कंटनेरसारखी अवजड वाहने कधी उचलणार? प्रेमलोक पार्क हे पार्किंग तुमच्याकडे दिलेले आहे. पुढारीमध्ये,पेपरमध्ये सुद्धा आले

होते. माझ्या वॉर्डात रोड वायडींगचे काम अर्धवट राहिलेले आहे. त्या जागेत एका -एका वेळेला ८/८ कंटेनर लागतात. आपण ट्रॅफिक पोलिस यांना तिथेच ऑफिस बांधून दिले होते. एकदा त्यांच्या समोरच दिव्याच्या साईडला अंधार होता. तिथे कंटेनर उभा असल्याबद्दल मी त्यांच्याकडे गेले होते. त्याठिकाणी चोरट्याने ८२ वर्षांच्या आजींच्या गळ्यातले लुटले होते व चोर त्या कंटेनरखाली लपला होता. त्या कंटेनरमुळे ट्रॅफिकला सुद्धा इतका अडथला होत असतो. ८/१० कंटेनर रोडमध्ये आलेले असतात. टेल्को कंपनीच्या गेटपासून एसकेएफ कंपनीच्या गेटपर्यंत कंटेनर लागलेले असतात. मी पीएसआयकडे गेले त्यांना म्हणाले, हे काय आहे. रोडवर किती कंटेनर उभे आहेत. त्यांना जामर का लावला नाहीत. ते म्हणाले, ते चाक काढून घेऊन जातात. त्या पोलिसाकडून हे उत्तर मिळाले. ते या वाहनांवर कारवाई करत नाहीत. ५ फूटांवर वाहने लावलेली असतात. ऑफिसच्या समोर लावलेल्या वाहनांवर कारवाई करत नाहीत. आपण त्यांना कायदेशीर अधिकार देतोय. माझ्या प्रभागात ड्रेनेजचे काम करायचे होते. त्यांची लेखी परमिशन घेतली होती. रोडवरच्या साहेबाला काय माहित त्याने रोड खणायला सुरुवात केली. तेव्हा ट्रॅफिक पोलिसाने त्यांना थांबवले. रोड खणायचा नाही म्हणून सांगितले. मला अधिका-यांचा फोन आला, काही कळत नाही. मी त्यांना सांगितले, लेखी परवानगी आहे. ते म्हणाले माझ्या लक्षात नाही. एवढे होऊन सुद्धा नंतर महापालिकेचे कर्मचा-यांकडे ट्रॅफिक पोलिस पुन्हा तिथे गेला व आपल्या अधिका-यांना त्यांना सांगितले, आमच्या काही चहापाण्याची व्यवस्था आहे का नाही. अशा प्रकारचे हे लोक आहेत. कितीही काही केलेतरी मला वाटत नाही त्यांच्यात काही फरक पडेल. त्यांचे काळे धंदे चालतात, त्याला पांढरे करतोय. असा प्रकार सगळ्यांना माहिती आहे. ट्रॅफिक कंट्रोल करायचे सोडून रस्त्याच्या एका बाजूला जाऊन उभे राहतात. सावज कसे आपल्या हातात येईल ते बघत असतात. मला सर्व सभागृहाला, मा.महापौरांना विनंती करायची आहे की, आपला वाहतूक विभाग फक्त नावालाच आहे. तिथे काळा बाजार सुरु झाला आहे. यावर काही कारवाई करत नाही. हे काम आमच्याकडे नाही असे उत्तर त्यांच्याकडून आले आहे. परंतू अशाप्रकारे आम्हाला कुठेही सहकार्य मिळत नाही. त्यांच्या ऑफिससमोर वाहने उभी असतात. आत्ता गेलात तरी तिथे ६ कंटेनर उभे आहेत. महिनाभर/१५-१५ दिवस पडून असतात. कोणीही कुठलीही कारवाई करत नाही. अशा प्रकारे तुम्ही त्यांच्या हातात अधिकार देऊ नयेत अशी विनंती करते. हा विषय तहकूब करण्यात यावा अशी सूचना करते.

**मा.यमुनाताई पवार** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देते.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी अवजड वाहने, ट्रक, बस, ट्रेलर्स, रोडरोलर, सहा आसनी रिक्षा, टेम्पो, स्वयंचलित दुचाकी वाहने असे म्हटले आहे. जेवढी गर्दीची ठिकाणे आहेत, व्यापारी संकुल, ऑफीसेस, भाजी मंडई तिथे पार्किंग व्यवस्था आहे का हे आधी तपासले पाहिजे. संबंधित बिल्डींग यांनी पार्किंगची व्यवस्था केली नसेल तर तेथे जाणा-यांनी त्यांची वाहने कुठे लावायची? अवजड वाहनासंदर्भात बोलायचे नाही. ते कमर्शियल यूजमध्ये असतात. टू व्हिलरच्या संदर्भात बोलायचे तर टू व्हिलरचा जास्त वापर महिला भगिनी करत असतात. संबंधित बिल्डींग मालकाने जागा केली नसेल तर गाड्या कुठे

लावायच्या? एवढ्या मोठ्या प्रमाणात दंड घेणार असाल तर ही अन्यायकारक भूमिका आहे. ज्या इमारतींनी वाहतूक व्यवस्था केली नाही, त्यांना आधी पार्किंगची सुविधा उपलब्ध करुन द्यायला सांगा. तुमचा महसूल वाढवण्यासाठी सामान्य नागरीकांना कायम बळी दिले जाते. पैसे कमी पडतात म्हणून पाण्याच्या बीलाचे दर वाढवा, टॅक्स वाढवा. सर्वसामान्य वर्ग यात भरडला जातो. उच्चभ्रू लोकांना काही फरक पडत नाही. जे प्रामाणिकपणे टॅक्स पेअर आहेत, त्यांना कायम बळी दिले जात असते. झोपडपट्टीतील लोकांना पाणी, लाईट सर्व फुकट देतो. जोपर्यंत बिल्डींगच्या माध्यमातून पार्कींग उपलब्ध करुन देत नाही, तोपर्यंत दुचाकींचा समावेश यात करु नये. राजमाता जिजाबाई कॉलेज, भोसरी इथे काही लक्झरी बसेस लागतात. ओपन स्पेस आहे तिथे यांच्याकडून रु.१००/१५० भाडे घेतले जाते. तिथे पाण्याची लाईन मुद्दाम फोडली आहे. बसेस धुतल्या जातात. ड्रायव्हर आंघोळ करतात. जागा फुकट वापरली जाते. पाण्याचा अपव्यय होतो. तिथे प्रायव्हेट वाहनतळ उपलब्ध करुन देऊन हजारो लाखो रुपयांचा महसूल वसूल करत आहेत. महापालिकेची जागा आहे का प्रायव्हेट जागा आहे. प्रायव्हेट जागा असलीतरी त्यांच्यावर कोण टॅक्स लावतोय? सर्वसामान्य नागरीकांना नोटीस देऊन त्यांच्यावर जप्ती लावता. त्यांच्यावर कारवाई करता. ही धूळफेक कधी बंद करणार आहात. भोसरी उड्डाणपूल १०० कोटी खर्च करुन बांधतोय. भोसरीतील नागरीकांना त्याचा किती फायदा होणार आहे हा संशोधनाचा विषय आहे. इथून गाडी सुरु होऊन डायरेक्ट नाशिक रोडलाच गाडी बाहेर पडते. पण भोसरीतील लग्न कार्यालयात जायचे असेल तर ५ मिनिटांच्या रस्ता पार करायला आम्हाला पाऊण तास लागतो. एवढे ट्रॅफिक जाम होते. अशात काय करणार आहात? आमच्यासारख्यांचे हाल होतात. आपल्याला माझी विनंती आहे की, पार्किंगची सूचना आलेली आहे. केवळ रिक्षा, सहा आसनी रिक्षांना त्यांचे थांबे फिक्स करुन दिले तरच उपयोग होतो. ट्रॅफिक पोलिस सहा आसनी रिक्षावाल्यांकडून पैसे घेतात. त्यांचे हप्ते ठरलेले आहेत. रिक्षा रस्त्यात, सिग्नलला पॅसेंजर घेण्यासाठी थांबलेल्या असतात. यात लक्ष द्या. प्रायव्हेट व्हिईकलसाठी कोणतेही शुल्क घेऊ नये. दंडात्मक कारवाई करु नये अशी विनंती आहे.

**मा.नारायण बहिरवाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पुणे शहर वाहतुक पोलिस यांनी मागणी केली आहे. पिंपरी चिंचवड शहरात बीआरटीसाठी रस्ते प्रस्तावित आहेत. त्यात काळेवाडी ते देहू रोड हा रस्ता प्रस्तावित आहे. या रस्त्यावर अनधिकृतपणे चालविली जाणारी वाहने किंवा शेती करणा-यांची वाहने यांच्यावर पोलिसांकडून दंड लावला जातो. याशिवाय शहरात अनधिकृत पार्किग केल्यानंतर दंड करायचा आहे तो महापालिका व पुणे वाहतूक विभाग यांच्याकडे जमा करायचा आहे. तो त्यांनी ५०/५० टक्के वाटून घ्यायचा आहे असा विषय आहे. या विषयाची घाई कशासाठी आहे? अजून एकही बीआरटी रस्ता तयार नाही. दापोडी ते निगडी फक्त या रस्त्याचे बीआरटी साठी काम झालेले आहे. या रस्त्यावर थांब्यांचा पत्ताच नाही. फक्त १८ ते २० बसस्टॉपचे काम झाले आहे. औंध-रावेत रस्ता अपूर्ण आहे. काळेवाडी-देहू रोड हा रस्ता अपूर्ण आहे. नाशिक फाटा-आळंदी हा रस्ता अपूर्ण असताना देखील दंडात्मक कारवाई करायचा विषय इथे का आणला आहे? बीआरटी शहराला नवीन आहे. रस्ता कधीही चालू होऊ द्या. नागरीकांना ठोस प्रशिक्षणाची गरज आहे. दिशादर्शक फलक रस्त्यांवर लावले पाहीजेत. २/३ महिने झाल्यानंतर नागरिक बेकायदेशीरपणे संचालन करत असतील

तरच त्यांच्याकडून दंड आकारला जावा. त्याचबरोबर मुळात बीआरटी रस्ता असावा याबद्दल हरकत आहे. शहरात बीआरटी रस्त्यावरुन जाणा-या वाहनांना शासन झालेल्या शुल्काची रक्कम ते आपल्याकडे ट्रान्सफर करतील असे म्हणणे चुकीचे वाटते. पुणे-मुंबई हा रस्ता सलग ६१ मी. रस्ता आहे. बाकी रस्ते काही ठिकाणी ४५ मी., ३० मी. झाले आहेत. काळेवाडी – देहू फाटा हा रस्ता ४५ मी., ३० मी. आहे. दीड मीटर फूटपाथसाठी ठेवला आहे. २ मी. सायकल ट्रॅक ठेवला आहे. बीआरटीसाठी ११ मी., इतर वाहनांसाठी ७ १/२ मी. चा ट्रॅक केलेला आहे. बीआरटीवरुन शक्यतो बसेस धावणार आहेत. मोठे ट्रेलर, जड वाहने, प्रायव्हेट बसेस, कार, रिक्षा, टेम्पो या साडे सात मीटर रस्त्यावरुन जाणार आहेत. शहरात बीआरटी जास्तीत जास्त नागरीकांनी बसमधून प्रवास करण्यासाठी केलेली आहे. तरीसुद्धा नागरीक इतर वाहनांतून प्रवास करणारे सुद्धा शहरातीलच नागरीत आहेत. बीआरटीबाबत सांगायचे तर, बसेस व रस्त्यावरुन जाणारी हजारो वाहने यांचा विचार केला तर वाहनचालकांवर अन्याय होणार आहे. शहरात पार्किंग व्यवस्था जेव्हा कराल तेव्हा दंड आकारावा. व्यवस्था नसेल तर ही दंड आकारणी करणे देखील चुकीची आहे. चिंचवड स्टेशन, बीआरटी रस्ता कुठेही पार्किंग व्यवस्था आहे का? तिथे मोठे कमर्शियल सेंटर आहे. आजूबाजूला ३०/३५ बँका आहेत. द्वारकादाससारखी मोठमोठी कपड्याची दुकाने आहेत. खेड्यापाड्यातील लोक लग्नाचा बस्ता बांधायला तिथे येत असतात. तिथे पार्किंगची व्यवस्था नाही. निगडी, चिंचवड स्टेशन असेल जिथे कमर्शियल शॉपिंग सेंटर्स आहेत. तिथे पार्किंगची व्यवस्था केली पाहीजे. जोपर्यंत ही व्यवस्था होत नाही, तोपर्यंत अनधिकृत प्रवेशावर दंड लावता कामा नये असे मला वाटते. दंडाची रक्कम बघितली तर रु.५,०००/-, रु.३,०००/- रु.५००/-. टू व्हिलरच जास्त पकडल्या जातात. तरुण तरुणी चालवत असतात. शाहू नगर, संत तुकाराम नगर इथे पोलिस उभा असतो. आमचे कार्यकर्ते पकडले जातात. ते मला फोन करतात. हवालदाराशी बोलायला सांगतात. हवालदार दोनशे रुपयाची पावती फाडायला सांगतो. कार्यकर्त्यांकडे तेवढे सुद्धा पैसे द्यायला नसतात. या विषयात हजारो रुपयांचा दंड लावला आहे. ही रक्कम किती अवाजवी, न परवडणारी आहे. यात देखील कुठेतरी कमी करायला पाहीजे. एखाद्याने चूक केली, अनधिकृतपणे संचालन केले, पार्किंगमध्ये गाडी उभी केली नाहीतर त्यांच्यावर दंड लावताना त्या चालकाकडे तेवढे पैसे द्यायला असले पाहीजेत. हजार रुपये देत नाहीतर दोनशे दे, तीनशे दे असा पद्धतीने यातून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळणार आहे. जोपर्यंत बीआरटी रस्ता चालू होत नाही, शहरातील लोकांना बीआरटी म्हणजे काय, त्यातून वाहने कशी चालवायची याचे प्रशिक्षण मिळत नाही, पार्किंगची व्यवस्था होत नाही, तोपर्यंत दंड आकारु नये. हा विषय फेटाळून लावावा.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ख-या अर्थाने नागरीकांना शिस्त लागावी, शिस्तीने वाहने चालवावीत म्हणून हा विषय ठेवलेला आहे. खरेतर विषय चांगला आहे. परंतु विषय चांगला असताना त्याची अंमलबजावणी होईल का. हे देखील आपण पाहिले पाहिजे. प्रामुख्याने या विषयात बीआरटी चा उल्लेख केलेला आहे. आपण पुण्यामध्ये पहा बीआरटीची काय अवस्था झालेली आहे. हडपसर बीआरटी मार्गावर, स्वारगेटला सुद्धा बीआरटी मार्गावरुन इतर वाहने जात असतात. काय परिस्थिती आहे. शंभर टक्के अयशस्वी झालेली आहे. आपल्याकडे सुद्धा हेच होणार आहे. नवीन काही होणार नाही. परंतू ज्या महापालिकेच्या

प्रशासनाने महापालिकेमध्ये डेव्हलपमेंट होत असताना महापालिकेच्या किती जागा पार्किंगसाठी ठेवल्या. ही सुद्धा महापालिकेची जबाबदारी आहे. किती पार्किंग रिझर्वेशन ताब्यात घेतले. नागरीकांची किती सोय केली. त्यांच्याकडून कर वसूल करतो तर त्यांची सोय देखील केली पाहीजे. विषय अतिशय सुंदर आहे. शहरात अनेक ठिकाणी अपघात होतात. बरेचसे ट्रक ड्रायव्हर गाड्या लावून जातात. त्यामुळे अपघात होतात. सातत्याने एखादा ड्रायव्हर त्याठिकाणी पार्किंग करत असेलतर, खाजगी बस ड्रायव्हर असेल तर त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. त्याच्यावर दंड लागला पाहिजे. ब-याचशा प्रमाणात महापालिकेने कोट्यावधी रुपये खर्च करुन रस्ते केलेले आहेत. त्याच्यावर आजदेखील पार्किंगसाठी जे रस्ते झालेले आहेत ही वस्तुस्थिती आहे. या विषयी काही त्रुटी आहेत. विषय चांगला आहे परंतू विषयात त्रुटी आहेत. दुचाकीवाल्यांना अचानक दीड/एक हजार दंड लावला आहे. हे मात्र जास्त होते आहे. हे कुठेतरी कमी केले पाहिजे. ही वाहतूक पोलिस खात्याची सुद्धा जबाबदारी आहे. नो पार्किंगमध्ये गाडी लावली तर शंभर रुपये वाढतात, ही तफावत दूर केली पाहिजे. केवळ बीआरटी रस्ता खुला रहावा म्हणून दंड आकारत असालतर हे चुकीचे आहे. भविष्यात या रस्त्यावरुन वाहने जाणार आहेत. पुण्यामध्ये सुरुवातीच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात वाहने जात होती. आज तिथे बीआरटी रस्ता राहिलेला नाही. चारचाकी सुद्धा घालत आहेत. मी पुण्यामध्ये गेलोतरी मी सुद्धा बीआरटी रोडमध्ये गाडी घालतो. कोणी अडवत नाही. हीच परिस्थिती आज शहरात आहे. यावर सर्व्हे केला पाहिजे. शहरात किती गाड्या रस्त्यालगत लागतात. आठ दिवसांत संपूर्ण सर्व्हे केलातर, कदाचित आपल्याकडे असा सर्व्हे केला असेलतर हे देखील प्रशासनाने सांगावे. प्रामुख्याने ज्या-ज्या भागात रस्त्यावर जास्त वाहने लागतात, त्या वाहनांच्या संख्येनुसार सभागृहाला सांगितले पाहिजे. मी या ठरावाशी सहमत आहे. वाहने चालवणा-यांना शिस्त लागली पाहिजे. कुठेही गाड्या पार्क केल्या नाही पाहिजेत. त्यामुळे अपघात होतात. डांगे चौकात पदमजी पेपर मिलपर्यंत ट्रक, बसेस पार्क केलेल्या असतात. त्यामुळे तिथे अनेक वेळा अपघात झाले आहेत. हिंजवडी पोलिस स्टेशनच्या रेकॉर्डनुसार ५/६ वर्षांत आज ५६ जण दगावले आहेत. हे केवळ चुकीच्या पद्धतीने गाड्या लावल्यामुळे अपघात झाले आहेत. मी या मताशी सहमत आहे. ठराव करताना तो चुकीचा झाला नाही पाहिजे. ५,०००/-, ३,०००/-, २,०००/- असे शुल्क आकारले आहे. यात काहीतरी तफावत आहे, जास्त वाटतो. दंड कमी स्वरुपात असावा, जेणेकरुन वाहनचालकांना शिस्त लागली पाहिजे. दंड स्वरुपात पैसे मिळवण्याचा उद्देश नसावा. त्यांनी शिस्तीने पार्किंगमध्ये गाड्या उभ्या केल्या पाहिजेत. आपणदेखील महापालिकेच्या वतीने पार्किंग झोन, डी.पी. रिझर्वेशन आहे. प्रामुख्याने तेथे पार्किंग झोन करावा. पुणे महापालिकेत शहरात ब-याच प्रमाणात पार्किंग झोन विकसित केलेला आहे. ४/५ ठिकाणी बीओटीवर पार्किंग केलेले आहे. तुम्ही पुण्यामध्ये गेलातर डबल डबल मजली पार्किंग झोन केलेले आहेत. ५/६ वर्षांत या शहराला देखील हे करावे लागणार आहे. शहरात निम्म्यावर बांधकामे अनधिकृत आहेत. जुन्या काळातील अधिकृत बांधकामांच्या पार्किंगमध्ये संपूर्णपणे अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. बांधकाम परवानगी देत असताना पूर्णपणे चुकीच्या पद्धतीने इमारती बांधलेल्या आहेत. पाऊस झाल्यावर पाणी पार्किंगमध्ये साठते. इमारती खड्यामध्ये केलेल्या आहेत. त्यामुळे तिथे गाड्या लावता येत नाहीत. मग रस्त्यावर गाड्या लावल्या जातात. त्यानंतर नाईलाजास्तव प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात

रस्त्यावरून जाणा-या वाहनांना अडथळा ठरतो. महापालिकेची चूक आहे. त्या इमारतीला महापालिकेने परवानगी दिलेली आहे. त्यात अनधिकृत बांधकाम केलेले असेल, हॉटेल टाकले असेल, स्ट्रक्चर उभे केले असेलतर ते काढून वेगळे केले पाहिजे. काही असो, पूर्वी जी घरे बांधली त्याच्या पार्किंगसाठी जागा ठेवलेली नाही. नाईलाजास्तव रस्त्यावर गाड्या लावतात. अशा ठिकाणी कर लागू केला, बोर्ड लावलातर नागरीकांवर देखील अन्याय होतो. नागरीकांच्या सोयीसाठी पार्किंग झोन असेलतर पुणे इथे पार्किंग झोनमध्ये पास/शुल्क लावले जाते. मासिक पास दिला जातो. या पद्धतीने आपल्याकडे देखील मोकळे प्लॉट विकसित होत आहेत. ५/१० वर्षांमध्ये पिंपरी चिंचवडमध्ये पुण्यासारखी परिस्थिती होणार आहे. अडचणींवर मात करण्यासाठी अतिशय चांगल्या प्रकारचा विषय आयुक्त साहेबांनी, प्रशासनाने ठेवला आहे. सर्व सदस्यांनी या विषयाला विचारपूर्वक पाठिंबा दिला पाहीजे. वाहतूक समस्या केवळ वाहने जास्त झाली म्हणून नाही तर चुकीच्या पद्धतीने वाहने लावतात म्हणून देखील समस्या वाढत चालली आहे. त्यावर मात करण्यासाठी शहरातील जबाबदार नागरीक, राज्यकर्ते म्हणून आपले देखील कर्तव्य आहे. याची काळजी घेतली पाहीजे. त्याअनुषंगाने आपण विषय ठेवला आहे. त्या विषयातील त्रुटी दूर करुन चांगल्या पद्धतीने विषय मांडला आहे. किती रस्त्यांवर गाड्या लावतात हे सभागृहाला सांगितले तर सभागृहाचे सुद्धा मत परिवर्तन होईल. काही सदस्यांच्या भागात हा प्रश्न नसेल. जिथे मोठ्या प्रमाणात अपघात होतात ते रस्त्यावर पार्किंग असल्यामुळे. हे प्रमाण भविष्यात वाढणार आहे. महाराष्ट्रामध्ये पुणे व पिंपरी चिंचवडमध्ये दुचाकी व चारचाकीचे आरटीओ रजिस्ट्रेशन सर्वात जास्त होते. आपली मानसिकता सक्षम व्हायला पाहिजे. आपण सक्षम झाले नाहीतर केवळ प्रशासनाला दोष देऊन उपयोग नाही. आपण आपल्या जबाबदारीपासून दूर झाले नाही पाहीजे. यातील त्रुटी दूर कराव्यात एवढेच सांगतो.

**मा.अनंत को-हाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पुणे शहर वाहतुक पोलिस बीआरटी रस्ते व नो पार्किंग झोनमध्ये त्यांनी दंडात्मक कारवाई करण्याचा विषय आहे. पण इतर ठिकाणी सुद्धा पार्किंगची व्यवस्था नाही. आज आपल्या भागात प्रत्येक कुटूंबात दुचाकी, चारचाकी आहेत. जी काही बांधकामे जुन्या पद्धतीने झाली आहेत, त्यात दुचाकी वाहनांच्या हिशोबाने जागा ठेवण्यात आली होती. पिंपरी चिंचवड मध्ये सर्व गाड्या रस्त्यावर रात्री लावल्या जातात. आपण त्यांच्याकडून शुल्क आकारणी करतोय. त्याच्या सोयी उपलब्ध करण्यासंदर्भात काहीच दृष्टीकोण ठेवत नाही. आपण या भागात पुण्यासारखाच पार्किंग मॉल करणे गरजेचे आहे. हा भांडणाचा विषय झालेला आहे. माझ्या भागात कितीतरी भांडणे या विषयावरुन होत असतात. नागरीकांशी एकमेकांशी भांडण्याची वृत्ती वाढायला लागली आहे. शुल्क आकारुन दंडात्मक कारवाई करुन हा विषय सुटणार नाही. हा ठराव अतिशय योग्य आहे. प्रथम त्याची सोय कशी होईल. आरक्षित प्लॉट आहेत तिथे पार्किंग मॉल उभा केलातर कायमस्वरुपी उत्पन्न मिळेल. हे पार्किंग कच्या रस्यावर असावे. या सर्व गोष्टींचा आपण विचार करावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३९६ विषय क्रमांक - १
दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/वा.क/कावि/१४६/२०१३ दि.३१/७/२०१३
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४१०९ दि.२१/०९/२०१३

विषय क्रमांक १चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत येत आहे.

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे**– मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३९७ विषय क्रमांक - २
दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.चंद्रकांत वाळके,मा.सौ.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४१५७ दि.२१/०९/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व नगरसदस्य यांना मानधनात वाढ करण्यात यावी. दरमहा सभेसाठी नगरसदस्य यांना २५,०००/- (पंचवीस हजार फक्त) एवढे मानधनात वाढ करण्याबाबतचा ठरावास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, याठिकाणी मिडीयाकडून प्रक्षेपण होते आहे. चॅनल्सवाल्यांना इथे मज्जाव केलेला आहे. याचे कारण काय याचा खुलासा व्हावा. लोकसभा, राज्यसभा याचे लाईव्ह प्रक्षेपण दाखवले जाते. पिठासीन अधिका-यांचा तो हक्क आहे. आपला कारभार पारदर्शक आहे. सारथी हेल्पलाईन ऑनलाईन चालू आहे. मग इथे पत्रकारांना का बंदी आहे? महासभेत चुकीचे घडतेय. प्रेक्षागॅलरीतून सुद्धा कोणी शूट करु शकतो. त्यांचा रोष आम्ही का पत्करावा? असा विचार करावा. महापौर साहेब, हा तुमचा अधिकार आहे.

**मा.महापौर –** सर्व पदाधिकारी यांनी मिळून मिटींग घेऊन या विषयावर निर्णय घ्यावा.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, लोकसभा, राज्यसभेचे प्रक्षेपण करतात. अधिवेशनाचे प्रेक्षपण बाहेर दिसते आहे. एकतर पत्रकारांची, प्रेक्षा गॅलरी आहे, आमची तोंडे तरी दिसतात का?

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, हा तुमचा अधिकार आहे. तुमच्या अधिकारात पत्रकारांना इथे सभा पाहायला परमिशन द्या.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, त्यांना आत्ता प्रक्षेपण करायला संधी द्या. आपण त्यांच्या अधिकारावर गदा आणतोय. आत्ता प्रक्षेपण होऊ द्या.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, फक्त त्यांना परमिशन द्या. तुमच्या अंगावर कशाला घेताय? मिडियाकडून बाहेर जाऊ द्या, महाराष्ट्रामध्ये जाऊ द्या.

**मा.शमिम पठाण** – हा विषयपत्रिकेवरील विषय नाही.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, हे आमच्यासाठीच चालले नाही. हा महापौरांचा अधिकार आहे. त्यांनी निर्णय घ्यावा.

**मा.सिमा सावळे** – कशासाठी सहन करायचे?

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, पत्रकारांनी सुद्धा सभेवर बहिष्कार टाकला आहे.
**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, या विषयावर चर्चा होण्याचे काहीच कारण नाही. विषय पत्रिकेवरील विषय चालू आहेत.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, सुलभा ताई म्हणतात, त्यांची मागणी चुकीची आहे असे बिल्कूल नाही. परंतू महापौर जी सूचना करतात यात वावगे नाही.पत्रकारांनी प्रसिद्धी दिली पाहीजे. प्रसिद्धी माध्यमांची कशा पद्धतीने व्यवस्था असावी हे मा.महापौर यांनी मिटींग घेऊन जाहिर करावे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.भारती फरांदे-**मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ३

दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.नरवि/कावि/तळवडे/१८/५१/२०१३ दि.१९/९/२०१३

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४२१३ दिनांक १/१०/२०१३

देहू रोड अॅम्युनिशन डेपोभोवतीची २००० यार्डाची हद्द पिंपरी चिंचवड महानगरपालिका वाढीव हद्दीच्या भागश: मंजूर विकास योजनेतील प्रस्तावांशी विसंगत होत आहे. चिखली, तळवडे या गावांव्यतिरिक्त मौजे निगडी, रावेत, किवळे, मामुर्डी यागावातील काही मिळकतींही रेड झोनमध्ये येत असल्याचे दिसून येत आहे. सदर रेड झोनने बाधित होणा-या क्षेत्रातील विकास परवानगीचे काम ठप्प झालेले आहे. सदर भागात मोठ्या प्रमाणात प्रतिनिर्बंधक क्षेत्रात यापूर्वीच बांधकामे झालेली आहेत. या सर्व बाबी वेळोवेळी संरक्षण विभागाच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. तथापि संरक्षण विभागामार्फत यासंदर्भात ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. रेडझोन संदर्भात मे. इसेन असोसिएट्स (रिट पिटीशन क्रमांक ८९८५।२००९) व श्रीमती सीमा सावळे (रिट पिटीशन क्रमांक १८०६।२०११) या दोन याचिका मा.उच्च न्यायालयात दाखल आहेत. सदर दोन्ही याचिकांमध्ये महापालिकेने मा.उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केलेली असली तरी महापालिकेची बाजू सक्षमपणे मांडण्यासाठी स्वतंत्र याचिका दाखल करणे गरजेचे होते. त्यामुळे तशी याचिका मनपामार्फत मा.उच्च न्यायालयात (रिट पिटीशन क्रमांक १९३५७।२०१३) दाखल करण्यात आलेली आहे. तरी याचिका दाखल करण्याच्या प्रस्तावास व याचिकेसाठी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, सदर विषयाला सूचना मांडते. मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्रमांकः नरवि/कावि/तळवडे/१ब/१७०/२०१३ दि.२५/१०/२०१३ चे नुसार मा.महापालिका आयुक्त यांना त्यांचे विषय क्र.३ वरील विषयपत्र मागे घेणेस मान्यता देणेत यावी.

**मा.अनिता तापकिर** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन देते.

**मा.महापौर** – आयुक्तांनी विषय मागे घेतला आहे. चर्चा करायचे काहीच कारण नाही.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज सभागृहात हा विषय रेडझोनसंदर्भात आहे. मला आयुक्त साहेबांना विनंती करायची आहे की, रेड झोन म्हणजे नेमके काय होते आहे ते आम्हांला तरी कळू द्या. यासंदर्भात सविस्तर माहिती द्यावी. आज माझ्या परिसरात सेक्टर २२ हा पुनर्वसन प्रकल्प आहे. त्याठिकाणी महापालिकेने प्राधिकरणाकडून जागा घेतली आहे. त्या जागेवर गाळे बांधले आहेत. शहरातील झोपडपट्टी ट्रान्सफर केलेली आहे. गेली २० वर्षे झाली आहेत. झोपडपट्टीतील नागरीक तिथे राहत आहेत. तिथे त्या भागातील लोकांना मला सुविधा पुरवता येत नाहीत. पाणी नाही, ड्रेनेज, गटर नाही, शाळा नाही. तुम्हांला उदाहरण देतो, माझ्या भागात शाळा झाली आहे. शाळेचे कंपाऊंड तोडलेले आहे, ते दुरुस्त करायचे आहे. टेंडर काढले आहे. ते सुद्धा कॅन्सल करण्यात आले आहे. आज रेडझोनचा स्टे कशावर आहे. बांधकामावर आहे का कशासाठी आहे ते नेमके कळत नाही. आज १५६३ मोठे ५७६ पीसीएमसी वसाहत, २५६ आण्णाभाऊ साठे वसाहत, ३३०० गाळे तिथे आहेत. १२३ स्क्वे. फूटाचे गाळे आहेत. त्यात पिंपरी चौकातील डॉ.आंबेडकर पुतळा इथली

राहूल नगरची झोपडपट्टी शिफ्ट केलेली आहे. फक्त ५०२ घरे शिफ्ट केलेली आहेत. बाकी घरांत लोक रहायला आले त्यांचे पुनर्वसन केले होते. त्यानंतर काही विशेष लोकांनी बांधकाम चुकीचे झाले आहे म्हणून कोर्टाकडून स्टे आणला आहे. स्टे आणल्यानंतर मिलिटरी यांनी सांगितले. भिंतीपासून आहे का किंवा हद्दीपासून आहे याचे काही कळत नाही, काम थांबले आहे. कोर्टाची ऑर्डर आहे त्याचे आपण पालन केलेच पाहिजे. परंतू त्या भागातील नागरीकांना छोट-छोट्या गोष्टींचे मेंटेनन्स करण्यासाठी विरोध का आहे? मेंटेनन्ससाठी विरोध करत असाल तर त्या भागातील लोकांच्या अडचणी कशा सुटतील? आज या शाळेत ३,००० मुले शाळेत शिक्षण घेत आहेत. शाळेला कंपाऊंड वॉल नाही. वॉचमनला क्वार्टर नाही. त्यामुळे तिथे नागरीक येऊन दारू पीत पडतात, बाटल्या फोडतात. त्या परिसरातील मुले क्रिकेट खेळतात, शाळेची नासधुस करतात. त्याठिकाणी सुरक्षा काहीच नाही. जर पिंपरी नगर शाळेत मर्डर होऊ शकतो तर इथे का होऊ शकणार नाही? आपल्याला निश्चित विनंती आहे की, कोर्टाकडून स्टे असलातरी त्याठिकाणचे मेंटेनन्स करायला पाहिजे. स्टे बांधकामावर असला पाहिजे. आमच्या पिंपरी चौकातील जी राहूल नगर झोपडपट्टी त्याठिकाणी शिफ्ट केली आहे ती परत त्याठिकाणीच बसू द्या. अजूनही जागा मोकळी आहे. त्याठिकाणी लोकांचे पुनर्वसन करा. त्या घरात मी देखील राहतोय. आज १२९ स्क्वे. फूटांच्या घरात मी राहतोय. कायद्याप्रमाणे प्रत्यक्षात मला १८० स्क्वे. फूटाचे घर द्यायला पाहिजे होते. माझ्याकडे कागद आहेत. त्यात स्पष्ट उल्लेख आहे. १८० स्क्वे.फूटाचे बांधकाम व्हायला पाहिजे होते. हा विषय न्यायालयात असल्यामुळे मी महापालिका सभेत मांडू शकत नाही, या विषयासंदर्भात मला बोलता येत नसले, शंका निरसन करता येत नसेल तरी माझी आपल्याला विनंती आहे की, आपल्याशी चर्चा करण्यासाठी मा.महापौर साहेब आपण मला थोडा वेळ द्यावा.

**मा.महापौर –** हा विषय मागे घेतला असल्यामुळे यावर चर्चा करायची गरज नाही.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, महापालिकेने प्रोजेक्ट राबविला आहे त्यामध्ये लोक रहात आहेत. त्यांनी मला निवडून दिले आहे. त्या भागातील लोकांची कामे मला करायची आहेत. ती जर करत येत नसतील तर आम्ही काय करायचे? आज त्यांचे प्रश्न मी सोडवू शकत नाही. त्या भागाचा नगरसेवक म्हणून मी काय करायचे? आमचा दोष तरी सांगा. माझी आपल्याला विनंती आहे. एकतर मागील आयुक्त यांनी जी कामे केलेली आहेत, त्यासंदर्भात ब-याचशी अडचणी निर्माण झालेल्या आहेत. आज त्या भागात राहणा-या नागरीकांना सोयी-सुविधा पुरवू शकत नाही. टेंडर सुद्धा कॅन्सल केलेली आहेत. ज्या लोकांसाठी प्रोजेक्ट केला आहे, त्यांचे त्याच जागी पुनर्वसन करावे. आज कोर्टात विषय असला तरी पैसे खर्च करण्याविषयी विषय आला आहे. हा विषय चांगला आहे त्याबद्दल दुमत नाही. विषय माघारी घेऊन काय करणार? मी पत्र दिले की त्याचे उत्तर दिले जाते, कोर्ट बाधित विषय असल्यामुळे तिथे काही करता येत नाही. दरवेळी मिटींगमध्ये फाईल घेऊन येत होतो. आम्ही काय करायचे हे तरी सांगा. कोर्टाची काही नोटीस आली असेल तर ती सुद्धा देण्यात यावी. आम्हाला यासंदर्भात काहीच माहिती नाही. काय प्रतिज्ञापत्र दाखल केले, त्याबद्दल माहिती घेता

येईल. प्रत्येक वेळी मला उत्तर येते. आम्हाला काम करता येत नाही. आम्ही काय करायचे? बोलायचे नाही, करायचे नाही. याचा खुलासा करावा.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी दोन प्रश्न आहेत. एकतर आपण फक्त विषय मागे घेणार आहात का रिट पिटीशन माघारी घेणार आहोत. या विषयासंदर्भात आमचा विरोध असण्याचे कारण नाही. जसे आमचे असे म्हणणे असणार आहे की, ग्राह्य धरा अथवा नका धरु जे काही करणार असाल ते सर्वांच्या संमतीने करावे.

**मा.दिलीप गावडे (नगरसचिव)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, रेड झोनसंदर्भात याचिका दाखल करण्याचा हा विषय मा.स्थायी समितीपुढे ठेवला होता. खर्चाच्या मान्यतेसाठी सदरचा विषय ठराव क्र. ४९१३ दि. १/१०/२०१३ अन्वये मंजूर झालेला आहे. हा विषय चुकून मा.स्थायी समितीमार्फत मा.महापालिका सभेकडे निर्गमित केला आहे. म्हणून तो इथे आलेला आहे. खर्चाला मान्यता झालेली आहे. त्यामुळे आयुक्तांशी विषयपत्र मागे घेण्यासाठी विनंती केली आहे. त्यांनी हा विषय मागे घेतला आहे.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, विषय क्र.३ मध्ये देहू रोड †म्युनिशन डेपोभोवतीची २००० यार्डाची हद्द जी रेड झोनमध्ये येते, त्या संदर्भात दाखल याचिकेत महापालिकेने उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले असले तरी, महापालिकेने सक्षमपणे बाजू मांडण्यासाठी स्वतंत्र याचिका दाखल करणे गरजेचे आहे. असे आयुक्त साहेबांचे मत असले तरी त्यांच्या मताशी मी सहमत नाही. सहमत यासाठी नाही. कारण ज्यावेळी मे.इसेन असोसिएटस् यांची याचिका कोर्टात होती, त्यावेळी रेड झोन संदर्भातील रिट पिटीशनमध्ये उत्तर देताना महापालिकेने सभागृहाला विचारात घेतले होते का? एकिकडे देवी बिल्डरला यांनी परवानगी रेड झोन मध्ये दिली. मे.इसेन असोसिएटस् यांना दिली नाही म्हणून ते हायकोर्टात गेले. कायदा सर्वांसाठी समान आहे म्हणून निश्चितपणे त्यांना तिथे दाद मागायचा अधिकार होता. एनओसी मॅनेज करुन आणली कशी आणली, मान्यता कशी आणली हे त्यांना माहिती होते. महापालिकेला माहिती होते. तरीसुद्धा मे.इसेन असोसिएटस् यांना महापालिकेने आपण आपली बाजू मांडताना प्रतिज्ञापत्राद्वारे सांगितले होते, दुसरा निविदाधारक आज कोर्टात असल्यामुळे आम्ही त्यांना परमिशन देऊ शकत नाही. मग ते निवेदन चुकीचे होते का ते चुकीची असल्याचा साक्षात्कार तुम्हांला आज झाला का? आपण चुकीचे बोललो. आता आपण आपली बाजू मांडायची आहे. आपण आपली बाजू निश्चितपणे सक्षमपणे मांडली पाहीजे. यातून हजारो लोकांच्या जमिनी, घरे वाचणार आहेत. मी महापालिकेच्या विरोधात सेक्टर २२ साठी हायकोर्टात का गेले होते? एकाला एक न्याय व दुस-याला दुसरा न्याय असे असेल तर असे चालणार नाही. संविधानाने सगळ्यांना एकसारखा अधिकार दिलेला आहे. त्याची अंमलबजावणी गरीब असो, श्रीमंत असो, महापालिका असो सर्वांसाठी समान झाली पाहिजे. म्हणून मी हाय कोर्टात आहे. मा.महापौर साहेब, महापालिकेची जी याचिका कोर्टात दाखल आहे. त्याला अजून नंबर पडलेला नाही. रिट पिटीशन क्रमांक १९३५७/२०१३ अन्वये दाखल करण्यात आली आहे. या याचिकेला खरेतर मान्यता घेण्यासाठी प्रशासनाने विषय सभागृहात आणला आहे. महाराष्ट्र

महापालिका अधिनियम १९४९ नुसार जवळपास संपूर्ण शोधले, एखाद्या विषयाला कार्योत्तर मान्यता घेण्याची तरतूद या कायद्यात नाही. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४८१ मध्ये दिवाणी/फौजदारी कारवाई दाखल करण्याची इ. कायदेविषयक सल्ला घेण्याची यात तरतूद आहे. कलम ४८१ नुसार कोणताही दावा दाखल करताना त्याची मान्यता स्थायी समिती किंवा अन्य कोणत्याही समितीकडून मान्यता घेण्याचा अधिकार आयुक्त यांना आहे. मात्र कोणतीही मान्यता न घेता केंद्र शासनाच्या विरोधात मा.आयुक्त यांनी रिट पिटीशन दाखल केलेले आहे. आयुक्त साहेब, आपण नेहमी कायम कायद्यावर बोट ठेवून वागता. परंतु तुम्ही याठिकाणी सभागृहाचे अधिकारांचा स्वतः वापर केला आहे. आपण स्वतः केलेल्या बेकायदेशीर कामांना कायदेशीर स्वरुप देण्याचे काम करताय. सर्व सदस्यांना आठवत असेल, २/८ महिन्यांपूर्वी दि.२१/२/१२ च्या पेपरमध्ये बातमी होती, नगररचना संचालक यांच्या केबीनमध्ये दरोडा पडला. नगररचना संचालक भदाणे मॅडम यांनी त्यांच्या केबीनमध्ये बैठक घेतली होती. त्यासंदर्भात आयुक्त साहेबांना पत्रकारांनी खुलासा विचारला होता. बैठक झाली होती, आपले काय मत आहे. त्याबाबत आयुक्तांनी सांगितले मला माहित नाही. पण मला खात्रीशीर माहिती होते. त्याठिकाणी सगळ्या बिल्डरांना घेऊन तिथे रिट पिटीशन दाखल झालेले आहे. आपण सर्वसामान्य नागरीकांचे नाव पुढे करतो. बिल्डर सुद्धा या शहराचे नागरीक आहेत. बिल्डरांना सुद्धा यामध्ये न्याय मिळाला पाहिजे. ज्याठिकाणी झोपडपट्यांचे पुनर्वसन चालू होते, त्यावेळी का सूचले नाही? वेगळे रिट पिटीशन का दाखल करताय? त्यात नेमके काय लिहिले होते? भदाणे मॅडमना निश्चितपणे माहिती आहे. विभागाचे पवार आहेत, यांना चांगले ज्ञान आहे. त्यांनी त्यांचे ज्ञान त्यांच्यापुरते ठेवावे, जास्त पाजळू नये. तुम्हाला याचिका दाखल करायची होती तर सर्वपक्षीय नेत्यांना बोलावायचे होते. त्यांना सांगायचे होते, अशी अशी याचिका दाखल करतोय. करु का नको करु. परंतू आपण तसे केलेले नाही. त्यावेळी पेपरमध्ये आलेल्या बातमीला दुजोरा दिला नाही. बरोबर त्या दिवसापासून मी प्रत्येक दिवस मोजतेय. विषय कधी समोर येतोय. विषय समोर येणार हे मला माहित होते. याठिकाणी खरेतर रेड झोनबाबत दाखल असलेल्या याचिकेवर कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही. तसेच ही याचिका महापालिकेकडून सक्षमपणे मांडली गेली नाही असे जर प्रशासनाचे मत आहे तर महानगरपालिकेची बाजू मांडायला ज्यांना-ज्यांना अपयश आले त्या अधिका-यांवर आपण काय कारवाई करणार आहात? लाखो रुपये खर्च केले त्याचे पुढे काय करणार आहात हे देखील सांगितले गेले पाहिजे. खरेतर मा.महापौर साहेब, या याचिकेसंदर्भात मी कायदा विभागाकडे गेले आहे. मला ही याचिका वाचायची आहे. मी या शहराची नागरीक आहे. भारताचे नागरीकत्व मला आहे. देशाच्या सुरक्षिततेला धोका असेल तर त्यासंदर्भात निश्चितपणे जागरुक नागरीक म्हणून त्यासदंर्भात न्यायालयात धाव घेण्याची माझी ताकद आहे. कायद्याने मला हा अधिकार दिलेला आहे. परंतू ज्यावेळी मी कायदा विभागात गेले होते, त्यांनी मला नकार दिला. त्यांच्याकडून मला याचिका मिळाली नाही. मग या विभागातून त्या विभागात. शेवटी मला कळाले की, भदाणे मॅडम यांच्या कस्टडीमध्ये ही याचिका आहे. त्यांना आपण कायदा विभागाचे प्रमुख कधी केले हे सभागृहाला कळाले नाही. आपण सांगितले असते, त्यांच्याकडून घ्या. सर्वज्ञानी असलेल्या भदाणे मॅडम यांच्याकडे गेले असतेल. हातापाया पडले असते. कसही करुन त्यांच्याकडून प्रत मिळवली असती. नागरीकांच्या हिताचे असते तर विरोध केला नसता,

ऑबजेक्शन घ्यायची वेळ आली नसती. आयुक्त साहेब, तुम्ही लावून घ्यायचे काम नाही. मी तुम्हाला बोलत नाही. तुमच्या खुर्चीला बोलते आहे. सत्ताधारी यांच्याकडूनही आरोप होत असताना सुद्धा भदाणे मॅडम यांच्या हातात हा कारभार देतो आहोत. नाकर्त्याच्या हातात कारभार देतो आहोत. जे मॅनेज होऊ शकतात, सर्वोत्तम होऊ शकतात त्यांच्या हातात हा कारभार देतो आहोत. याबाबतीत कायदा विभागाचा अभिप्राय घेतला नसेल, त्यांना विचारायचे नसेल तर तुम्ही कोर्टासमोर सक्षमपणे तुमची बाजू मांडू शकणार नाही. खरेतर आपणच निर्णय घेता, आपणच कोर्टासमोर याचिका दाखल करता, मग काही झालेतर सदस्यांवर खापर फोडता. मला मा.महापौर साहेब, आपल्याला व मा.आयुक्त साहेब यांना विनंती करायची आहे की, हा विषय बहुमताच्या जोरावर पास केला तरी नाही तिथे इंटरवेंशन दाखल करावा लागेल. मला इंटरवेंशन दाखल करायची इच्छा नाही. परंतू आपण जर आम्हाला विचारात घेणार नसाल, सभागृहाचा अधिकार वापरणार असाल तर होणा-या परिस्थीतीला वैयक्तीक आपणच दोषी असाल आम्ही नसू. यासंदर्भात दोन याचिका हायकोर्टात दाखल आहेत. एक नगरसेविका म्हणून माझी व दुसरे मे.इसेन असोसिएटस् यांची एक याचिका आहे. दोन्हीमध्ये कोणीताही निकाल लागलेला नाही. जोपर्यंत निकाल लागत नाही, तोपर्यंत ही याचिका दाखल करुन आपण हात दाखवून अवलक्षण हा प्रकार यामध्ये होणार आहे. पहिले रिट पिटीशन दाखल केले ते वाचा, त्याचा अभ्यास करा. तुम्ही हायकोर्टात सांगितले आहे. प्रतिज्ञापत्रात सांगितले आहे. तुमचे प्रतिज्ञापत्र, तुम्हीच कसे बजावणार, त्याचा निकाल आधी येऊ द्या. तुमचे ४०० कोटी वाचवण्यासाठी या लोकांच्या जागा मोकळ्या होतील. त्यांचा एफएसआय सुटेल. तुम्ही राजकीय दबाव वापरला, प्रशासकीय यंत्रणा वापरली. राष्ट्रवादी कॉंग्रेस कधीही सांगणार नाही आम्ही चुकलो, केंद्र शासन कधीही सांगणार नाही, आम्ही चुकलो. एकदाचा सोक्षमोक्ष लावायचा तो लागेल. दोन याचिका पेंडींग असताना आपण परत तिसरी करु नका. नाहीतर वर्षभर हाच घोळ चालू राहील. माझी याचिका फक्त सेक्टर २२ पुरती आहे. तीही तुम्ही केलेल्या कामापुरती आहे. मे.इसेन असोसिएटस् कधी समोरच आला नाही बिचारा. त्यांनी याचिका दाखल केली होती. माझे काय करता म्हणून सांगा? यावर आपण प्रतिज्ञापत्र देऊन सांगितले, तो भाग रेडझोनमध्ये येत असल्यामुळे देशाच्या सुरक्षिततेला धोका असल्यामुळे, तिथे मिसाईल डम्प केल्यामुळे तिथे परवानगी देऊ शकत नाही. एकिकडे एक प्रतिज्ञापत्र, दुसरीकडे दुसरे द्यायचे. परत तिसरा खेळ करायचा. नागरीकांच्या भावनांशी किती दिवस खेळ करणार? प्रशासक म्हणून आपली काही जबाबदारी आहे की नाही? आपल्याला विनंती आहे. मी विरोधाला विरोध करत नाही. करायचा म्हटले तर मी कोणाला घाबरणार पण नाही. असे खेळ करुन काही साध्य होणार नाही. एक फक्त होऊ शकते, फारफार तर निवडणूका जिंकू शकतात. आम्ही तुमच्या बाजूने कोर्टात भांडायला गेले. त्या भागातल्या सगळ्या नगरसेवकांना विनंती आहे की, रिट पिटिशनचा अभ्यास करा. काय लिहिले आहे ते नीट वाचा. कॉन्ट्राव्हर्सी झालीतर त्यात स्ट्रींजंट आहे तो वापरला जाणार आहे. त्यात काम करता येत नाही. असा आदेश आलातर त्यातून तुम्हाला कोणीही सोडवू शकत नाही. एवढे स्पष्टपणे मत मांडते कारण मला त्या ठिकाणी माहिती आहे मी काय भोगतेय आम्हाला माहित आहे. मा.तानाजी खाडे इथे बोलतात. रोज कुठेतरी त्यांचा जीव जळतो, म्हणून ते बोलतात. मी सुद्धा तेवढीच भांडले असते. देशापेक्षा स्वतःला जर महान समजणार असाल तर तुम्हाला सुद्धा देशभक्ती शिकवायची वेळ आलेली

आहे. जे कोणी तज्ञ मंडळी आहेत, सभागृहातील गटनेते आहेत. यांना माझी विनंती आहे की, जोपर्यंत २ याचिकांचा निकाल लागत नाही, तोपर्यंत तिसरी याचिका दाखल करु नये. माझी व मे.इसेन असोसिएटस् दोघांची याचिका वेगवेगळ्या काळातली होती. मे.इसेन असोसिएटस् यांची याचिका २००२ची होती. जेव्हा दोघे एकाच बेंचखाली सुनावणीसाठी पुढे आले. तेव्हा सांगितले, अशाच प्रकारचे रिट पिटीशन चालू आहे. माझ्या प्रतिज्ञापत्रात दिले आहे, केंद्र शासनाची योजना आहे म्हणून बांधकाम करतोय. आणि मे.इसेन असोसिएटस् यांना सांगितले, तिथे करता येत नाही. यातून महापालिकेचा खोटेपणा बाहेर आला म्हणून दोन्ही पिटीशन एकत्रित केले. तिसरे रिट पिटीशन ओपन होणार. भले काही करा. रेडझोन म्हणून ते करणार. एका केसमध्ये जो निकाल लागेल तो या दोन्ही केसमध्ये लागू होणार. आपल्याला हात जोडून विनंती आहे, सखोल विचार करा. कुठलीही घाई न करता या विषयावर शांतपणे विचार करावा.

**मा.राजेंद्र जगताप** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज रेडझोन संदर्भात विषय आला आहे. वडमुखवाडी असो,तळवडे असो, चिखली असो, हजारो एकर रेसिडेन्शियल जमिनीवर आत्तापर्यंत अभिप्राय देत असताना रेडझोन म्हणून असाच दिला जातो. यामध्ये आपण विषय मागे घेतला म्हणजे नेमके काय यात बदल करणार आहात, बांधकाम करण्यासाठी परमिशन देणार आहात का.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी मा.सिमा सावळे यांचे अभिनंदन करतो. त्यांनी या विषयात रिट पिटीशन दाखल केले. झोपडपट्टी पुनर्वसन, ईडब्ल्यूएसचा विषय जेव्हा सबकमिटीत आला, त्यावेळी मा.सिमा सावळे कमिटी मेंबर होत्या. त्यावेळी त्यांनी लेटर प्रोड्युस केले होते, हे रेडझोनमध्ये येते. त्यांचे लेटर गेले होते. ज्यांनी बिल्डींग परमिशन मागितली होती,त्यांना सांगितले, रेड झोन म्हणजे नॉन डेव्हलपमेंट झोन आहे. एका बाजूला असे पत्र देता आणि ४००/५०० कोटींचा प्रोजेक्ट कसा करताय? तसेच ईडब्ल्यूएस हा प्रोजेक्ट करायला मी विरोध केला होता. अडीच एफएसआय मिळाला नसताना एक्स्ट्रा बांधकाम का केले, कोणी केले? कमिशनर तुम्ही अधिका-यांची बाजू घेताय. चुकीचे झालेतर त्यांच्यावर कारवाई व्हायला पाहीजे. आमची रुलिंग पार्टी असल्यामुळे मी कोर्टात जाऊ शकत नाही. मा.सिमा सावळे हा विषय कोर्टात घेऊन गेल्या. त्यांचे अभिनंदन करतो. त्यांची केस पेंडींग आहे. तुम्ही बांधकाम केले ते चुकीचे आहे. ईडब्ल्यूएसची केस कोर्टात आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजना कोर्टात आहे. आज सगळ्या योजना कोर्टात आहेत. एक दिवस असा येईल, सगळेच विषय कोर्टात असल्यावर आम्ही त्यावर चर्चा करु शकणार नाही. जर लोकांना अडचणी असतील तर त्यांनी कोर्टात जायचे असा रुल झालाय. मग आम्ही कशाला आहोत, आम्ही इथे कशासाठी यायचे? तुम्ही लोकांना सांगायचे, रेड झोन म्हणजे नॉन डेव्हलपमेंट झोन. म्हणजे तिथे सुविधा द्यायच्या नाहीत असे कुठेही म्हणालेले नाही. अधिकारी जेवढे शिकलेत तेवढा मी सुद्धा शिकलेलो आहे. मा.तानाजी खाडे म्हणतात, त्यांच्या भागातील शाळेची कंपाऊंड वॉल बांधत नाहीत, हे बांधत नाही ते बांधत नाही. परत एकदा विचार करा. या भागामध्ये २००२ आधी अनेक प्रॉपर्टीज् झाल्या आहेत. आम्हाला कल्पना होती का, केंद्र सरकारची योजना करणार म्हणून. सर्वे नं. २४, २५, २६, २७ मध्ये फ्लॅट कधी बांधले.

सगळीकडे रेड झोन आहे. १९८० पासून बांधले आहेत. केंद्र सरकार असले तरी ते योजना करु शकतात का? १९८४ पासून आजपर्यंत महापालिका व डिफेन्स डिपार्टमेंट यांच्यात ज्या मिटींगज् झाल्या, त्यातून काहीच झाले नाही. तुम्ही म्हणताय, रेड झोनवर चर्चा करायची नाही. आम्ही निवडून आलेलो आहोत. आम्हाला लोकांना उत्तर द्यावे लागते. लोकवस्ती असेल तर तिथे सुविधा द्याव्याच लागतात. तुम्ही नाही म्हणू शकत नाही मग टॅक्स कशासाठी घेताय? ज्यांच्या वॉर्डात बांधकामे झाली म्हणून ती पाडण्यासाठी नोटीसा पाठवल्या. दुसरीकडे म्हणताय, सुविधा देता येणार नाही. हे सुद्धा आपल्यासारखे लोक आहेत. ते इतकी वर्षे तिथे राहतात. त्यावेळी रेड झोन दिसला नाही. कायदा विभाग कोर्टात व्यवस्थित पुट अप करत नाही. तुम्ही सांगितले पाहिजे. माझ्या वॉर्डात सुद्धा असे अनेक सेक्टर्स आहेत जे रेड झोनमध्ये येतात. तिथे ३० वर्षांपूर्वी लोकांनी घरे बांधली आहेत. त्यांना रेड झोनमध्ये कसे अंतर्भूत करणार? मला विनंती करायची आहे, लिगल विभागात मी पूर्वी विचार करायचो. लिगल डिपार्टमेंटमधील पवार यांना लिगल †डव्हायजर का करत नाही. त्यांच्यावर अन्याय होतो. आत्ता वाटते, ते त्या पदासाठी कॉम्पीटंट आहे का याचा विचार करायला पाहिजे. ते कधी पुस्तक काढून वाचतात का? टीडीआरची फाईल कधी येणार, †डव्हाईससाठी फाईल कधी येणार हेच बघत असतात. त्यात त्यांची बुद्धी चालते कुठेही लिगली फाईट करायला नको. मग मला सांगा, ५०० कोटींचा प्रोजेक्ट करत असताना एका बाजूला रेडझोनमध्ये काम केले आहे तर तुम्ही सिटी इंजिनिअर व कमिशनर यांच्यावर कारवाई करा. तुम्ही म्हणता हे पाठीमागे घडले आहे पण त्यामुळेच अडचण झाली आहे. त्यांच्यामुळे आज ही वेळी आली आहे. तुम्ही ज्युनिअर अधिका-यावर कारवाई करता. क्लास थ्रीचा अधिकारी १२ कोटींची खरेदी करु शकतो का? असिस्टंट कमिशनर, †डिशनल कमिशनर यांच्याकडे फाईल गेली होती. कमिशनरांपासून किरण गावडे पर्यंत सगळ्यांनाच पनिशमेंट व्हायला पाहीजे. तुम्ही खालच्या अधिका-यावर कारवाई करताय. रेड झोन आहे म्हणजे तिथे सुविधा द्यायच्या नाहीत असे कुठे मेंशन केलेले नाही, हे स्पष्ट करा. जिथे लोक राहतात, तिथे सुविधा बंद करु नका. कुणीतरी एक्सपर्ट वकिलाचा सल्ला घेऊन कोर्टात याचिका दाखल करा की, हे रेट्रोस्पेक्टिव्ह इफेक्ट होऊ शकत नाही.

**मा.पौर्णिमा सोनवणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझ्या वॉर्डात रेड झोन म्हणजे ना-विकास क्षेत्र आहे. लाखो लोकांच्या घरांवर टांगती तलवार आहे. प्रत्येकवेळी अधिकारी हेच उत्तर देतात. हे काम होऊ शकत नाही का तर रेड झोन आहे. दोन वेळ पाणी देऊ शकत नाही का तर तुमच्याकडे रेड झोन आहे. गेले दीड वर्षे हे ऐकून मला कंटाळा आला आहे. आमचे नागरीक एवढी वर्षे होऊनही महापालिकेत समाविष्ट होऊनही मुलभूत सुविधांपासून वंचित आहेत. आम्ही नागरीकांना काय उत्तर द्यायचे हा प्रश्न पडतोय. अधिका-यांच्या निष्क्रियतेमुळे सर्व घडते आहे. विकास कामांना खीळ बसली आहे. नाही हा शब्द आपल्या शब्दकोषातून काढून टाकावा एवढी विनंती करते.

**मा.शांताराम भालेकर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, रेड झोनसंदर्भात याठिकाणी बोलत असताना आमच्या परिसरात अनेक वर्षांपासून हा विषय आहे. या विषयासंदर्भात

डिव्हीजनल कोर्टात सुद्धा गेलो होतो. आमच्या केसेस विड्रॉ झालेल्या आहेत. आज याठिकाणी रेड झोनच्या माध्यमातून हा विषय अजेंडावर आलेला आहे. त्या परिसरातील नागरीक टॅक्स भरतात. आपण रिट पिटीशनच्या माध्यमातून खर्चाला मान्यता देण्यासाठी हा विषय आणला आहे. खरेतर हा विषय आपण मंजूर केला पाहीजे. प्रामुख्याने रेड झोन संदर्भात गेली अनेक वर्षे चाललेल्या योग्य प्रकारे लक्ष घालावे. डिफेन्स म्हणजे नेमके काय हे मा.आर.एस.कुमार यांनी सांगितले आहे. गेली ३०/४० वर्षापूर्वी घरे बांधली आहेत. मिलिटरी डिफेन्स एरिया असला तरी त्यांना सुद्धा कुठेतरी कायदे/नियम आहेत. त्यावेळी २००० यार्डाची हद्द ताब्यात घेत असताना त्यांनी सुद्धा याचा विचार केला पाहिजे होता. इथे डेव्हलपमेंट कशा पद्धतीने झाली पाहीजे. हा विषय पूर्वीच करायला पाहीजे होता.किती यार्ड घेतले किंवा काय केले त्यांना सुद्धा माहित नाही. यार्ड ताब्यात घेत असताना स्टोरेजपासून घेताय का, फेन्सींगपासून घेताय. आंधळ दळतयं व कुत्र पीठ खातयं अशी अवस्था झालेली आहे. आपल्याला पूर्ण माहिती नाही. नेमके राजकारण काय चालले आहे, नेमका विषय कळत नाही. हा विषय आपल्या नागरीकांच्या दृष्टीने महत्वाचा आहे. खरेतर खर्चाच्या मान्यतेसाठी रिट पिटीशन दाखल केलेले आहे. माझी विनंती आहे की, ख-या अर्थाने खर्चास मान्यता देऊन हा विषय मंजूर करावा.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, प्रथमतः आपण कोर्टातील विषयावर चर्चा करायची नाही म्हणून मा.अनंत को-हाळे यांना तुम्ही बोलू दिले नाही. एवढा मोठा विषय कोर्टात असताना त्यावर विस्तृत चर्चा चालू आहे. हा एक अन्याय आहे. इथे हा दुजाभाव केला गेला आहे, याचा मी निषेध करते. आयुक्त साहेब, हा विषय गप्प बसून सुटणार नाही. जरी विषय कोर्टात असला तरी त्याला आता किती फाटे फुटले आहेत हे सगळ्यांना माहित आहे. या विषयाची पूर्ण माहिती सभागृहाला नाही. एक प्रकारची भिती उभी केले गेलेली आहे. याठिकाणी मे.इसेन असोसिएटस् यांनी रिट पिटीशन दाखल केले. त्यानंतर मा.सिमा सावळे ताईंनी त्यांचे रिट पिटीशन दाखल केले. मे.इसेन असोसिएटस यांना रिट पिटीशन दाखल करण्याचा उद्देश वेगळा होता. मा.सिमा सावळे यांचा उद्देश वेगळा होता. त्याने न्यायात असमानता होते, खालीवरपणा दाखवला जातो म्हणून रिट पिटीशन दाखल केले होते. मला एवढेच कळते २००२ मध्ये संरक्षण खात्याने एक नोटीफीकेशन काढले होते. त्यांच्याकडून कोणालाही नोटीसीची सूचना दिली गेली नाही. महापालिका त्यात आली, प्राधिकरण त्यात आले, सेक्टर २२ त्यात आले. यात त्या भागात राहणा-या नागरीकांचा काय दोष? आपण संरक्षण खात्याशी भांडावे, आपण भांडलेच पाहीजे. नाहीतर एकाही नगरसेवकाला खुर्चीवर बसायचा अधिकार नाही. सेक्टर २२ मध्ये प्रोजेक्ट आहे. आज मा.तानाजी खाडे कळकळीने बोलतात. मा.पौर्णीमा सोनवणे, मा.शांताराम भालेकर या नगरसेवकांनी सांगितले आहे. माझा स्वतःचा वॉर्ड सुद्धा त्यात आहे. मा.संगीता पवार इथे बसल्या आहेत. माझ्या वॉर्डातील तीन बिल्डींगचा लकी ड्रॉ झाला होता. त्या बिल्डींगमध्ये नागरीक रहायला जाणार होते. आणि कोर्टाने स्टे दिला. नागरीक दिवाळी, दसरा सगळे सण त्या बिल्डींगकडे बघून बघून केले आहेत. आपण लोकांना त्यांच्या जागेत रहायला परमिशन देत नाही. ते काय करणार? तुम्ही म्हणता, मी त्यावेळी नव्हतो. हे आम्हाला सुद्धा माहित आहे. आमची अनधिकृत बांधकामे आज पाडताय. पण ही बांधकामे जेव्हा झाली होती त्यावेळी सुद्धा तुम्ही नव्हता. मग आज का तोडताय? मग याकडे का लक्ष

देत नाही? इकडे लक्ष दिले पाहीजे. महापालिका फक्त सेक्टर २२ मध्ये इंटरेस्ट घेते आहे. आपल्या प्रोजेक्टसंदर्भात याठिकाणी आपले म्हणणे मांडायचे ते आपले प्रथम कर्तव्य आहे. श्री.दिलीप बंड आयुक्त असताना प्रोजेक्ट सुरु झाला होता. त्यावेळी महाराष्ट्र शासनाची तत्वतः मान्यता घेतली होती. ६०० यार्ड साठीच बोलणे चालू होते. त्यावेळी नवीन बिल्डींग्ज् बांधल्या नव्हत्या. त्या भागात ज्या जुन्या बिल्डींग होत्या, त्यात लोक रहात होते. रेड झोन मधील त्या बिल्डींग डिमॉलिश केल्या. दुसरीकडे म्हणताय, हा भाग रेड झोन आहे. इथे बांधकाम करायला परवानगी देऊ शकत नाही. या कायदेशीर बाबींवर तुम्ही सक्षम असले पाहीजे. प्रत्येक जण आपआपली चेअर वाचवायच्या पाठिमागे लागला आहे. नागरीकांच्या दृष्टीने कोणीच लिड घेत नाही. आपण याबाबतीत लिड घेतली त्याबद्दल आपले मनापासून अभिनंदन करते. आम्ही तुमच्या बरोबर आहेत. नागरीकांसाठी नगरसेवक पद गेले तरी आम्ही मागेपुढे पाहणार नाही. आम्हाला ज्या लोकांनी निवडून दिले आहे, त्यांच्यासाठी आपण काही करु शकलो नाहीतर आमचा फायदा काय. संरक्षण खात्याने स्पष्टपणे आम्हाला चॅलेंज करायचा विषय निश्चितपणे झाला पाहीजे. त्यांना सुद्धा पश्न विचारले पाहीजेत. मध्यंतरी रिट पिटीशन कमिटी जागेवर जाऊन पाहणी करण्यासाठी आली होती. पुण्यातील एक पूल जो रेड झोन हद्दीतील असल्यामुळे बरेच दिवस बांधला जात नव्हता. त्याला या कमिटीने परमिशन दिलेली आहे. त्या पुलाचे काम सुरु होते आहे. या कमिटीच्या माध्यमातून त्यांना काही गोष्टी निदर्शनास आणून दिल्या. भोसरीतील रेड झोन असू दे, डुडुळगाव हद्दीतील रेड झोन याबाबत महापालिकेकडून सहकार्य झाले पाहीजे. मी सभागृहाच्या वतीने कळकळीची विनंती करते की, सेक्टर २२ संदर्भात लोकांचे घरकुल आहे यासाठी रिट पिटीशन मागे घेतले तर आमच्या वतीने, सभागृहाच्या वतीने आपला सत्कार करु. ही सभागृहाच्या वतीने आपल्याला कळकळीची विनंती आहे, महापालिका किंवा अन्य कोणाचीही चूक असली तरी याचा भूर्दंड गोरगरीब जनतेला बसू नये. याबाबत सगळ्यांनी बसून याबाबत सर्वांनी चर्चा करावी व लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशी विनंती करते.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, वास्तविक पाहता हा विषय जर माघारी घ्यायचा असेल तर ही चर्चा कशासाठी करतोय हे कळत नाही. कायदे पंडीत, तज्ञांची, विद्वानांची कमतरता या सभागृहात नाही. खरे तर आयुक्त साहेबांकडे ती दृष्टी नाही. त्यांनी असे चांगले लोक हेरले पाहिजेत. आणि त्यांना प्रशासनात घेतले पाहीजे. इतके दिवस रेंगाळत असलेला प्रश्न या विषयांसाठी मी विनंती करायला उभा आहे. विषय माघारी घेणार असालतर चर्चा कशासाठी करतोय? असे विषय माघारी घेऊन टाका. दुसरा विषय घ्यावा.

**मा.महापौर** - हा विषय मागे घेण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक -३९८ | विषय क्रमांक - ३ |
| दिनांक - २१/११/२०१३ | विभाग - मा.आयुक्त |

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.नरवि/कावि/तळवडे/१८/५१/२०१३

दि.१९/९/२०१३

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४२१३ दिनांक १/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्रमांक नरवि/कावि/तळवडे/१ब/१७०/२०१३ दिनांक २५/१०/२०१३ पत्रानुसार मा.महापालिका आयुक्त यांना त्यांचे विषय क्रमांक ३ वरिल विषयपत्र मागे घेणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.भारती फरांदे-**मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ४

दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.नरवि/कावि/पिं.गुरव/टे८/३६२/२०१३ दि.४/१०/२०१

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४२७१ दिनांक ९/१०/२०१३

मौजे पिंपळेगुरव ग्रेथील स.नं.८४ व ८५ पैकी मंजुर विकास योजनेतील ४५.०० मी. रस्त्याचे भूसंपादनाचे काम विशेष भुमी संपादन अधिकारी, विशेष घटक क्र.१, पिंपरी यांचे मार्फत चालू आहे. सदरचे प्रकरणी जागा मालकांना प्रपत्र अ द्वारे आगाऊ ताबा देणेबाबत महापालिकेकडून विनंती करण्यात आली होती. त्यानुसार संबंधितांनी सुमारे वर्षभरापूर्वी प्रपत्र ब द्वारे आगाऊ ताबा महानगरपालिकेस दिला असून त्यानुसार खाजगी वाटाघाटीनुसार मोबदला मिळण्याच्या अटीवर ताबा महानगरपालिकेस दिलेला आहे. सदर जागेवर महानगरपालिकेने रस्त्याचे काम केलेले असून सदर रस्त्याने बाधीत क्षेत्रासाठी मोबदला मिळणेबाबत मा.नगरसदस्य पाठपुरावा करीत आहे. सदर रस्त्याने बाधित मिळकतधारक यांना नगरभूमापन कार्यालयाकडील मोजणी फी चा खर्च सर्वसामान्य नागरीकांना करणे शक्य नाही. तरी नगररचना विभागाने केलेल्या मोजणीच्या आधारे सध्याचा ७/१२ उतारा ग्राह्य धरून व मोजणीची अट रद्द करून मोबदला देण्यात यावा. अशी मागणी संबंधीत बाधीत जागा मालकांनी केलेली आहे. परंतू सदर रस्त्याचे भूसंपादन प्रकरणी झालेल्या संयुक्त मोजणी नकाशावरून जागा मालकाची वहीवाट निश्चित होत नाही. त्यामुळे अर्जदाराचे वहिवाटीचे मोजणी नकाशाचे अभावी फक्त संयुक्त मोजणी नकाशाच्या आधारे मोबदला अदा करणेस अडचण निर्माण होत आहे. सदर रस्त्याने बाधीत मिळकतीचे एकूण क्षेत्र कमी असल्याने मिळकतधारकास त्याची शासकीय मोजणी फी परवडणारी नाही. सदरच्या शासकीय मोजणी करण्यास जास्त कालावधी लागत असल्याने तसेच महानगरपालिकेकडील बी.आर.टी. व जे.एन.एन.यु.आर.एम. प्रकल्पाचे अंतर्गत सदरचा रस्ता समाविष्ट असल्याने तो कालमर्यादेत कार्यान्वित करणेकरिता सदरचे

धोरण आवश्यक आहे. या प्रकरणी मा.आयुक्त सो. यांचे समवेत दि.०७/०३/२०१३ रोजी झालेली चर्चा व मा.जमाबंदी आयुक्त यांचे समवेत दि.११/०३/२०१३ रोजी झालेल्या चर्चेमध्ये सदर संयुक्त मोजणी नकाशावर मनपाच्या सर्व्हेअरकडून बाधीत मिळकतधारकांच्या वहिवाटी दर्शवून ती वहिवाट ग्राह्य धरुन नुकसान भरपाई रक्कम अदा करण्यास काहीही हरकत नसल्याचे सुचित करण्यात आले आहे. कोणत्याही मिळकतधारकास शासकीय कार्यालयाकडील मोजणी नकाशा सादर केल्याशिवाय त्याची मालकी हक्क सिध्द होत नाही व ज्या प्रकरणी संयुक्त मोजणी झालेली आहे. त्या प्रकरणी संयुक्त मोजणी नकाशात दर्शविल्यानुसार सी.टी.सर्व्हेच्या हद्दी, बांधकामे, सिमाभिंती, तार कुंपन, झाडे, रस्ते, इलेक्ट्रीक खांब इत्यादीच्या आधारे रस्त्याचे रूंदीने बाधीत क्षेत्र सदर मालकाने दर्शविलेले वहिवाटीचे क्षेत्र व ७/१२ उता-यामधील सदर जागा मालकांचे क्षेत्र यांचा ताळमेळ दर्शवून येणा-या वहिवाटीच्या मोजणी नकाशानुसार बाधीत क्षेत्र महानगरपालिकेच्या सर्व्हेअरने निश्चित करून त्याप्रमाणे मोजणी नकाशा तयार करून व त्यानुसार येणा-या बाधित क्षेत्रानुसार खाजगी वाटाघाटीने नुकसान भरपाई रक्कम अदा करणे शक्य आहे. सदर कामी खालील नमुद केलेनुसार कार्यपध्दती व आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहिल. १) संयुक्त मोजणी नकाशानुसार तयार करावयाचे मोजणी नकाशावर मिळकतधारकाची वहिवाट मंजूर असल्याबाबत चतु:सिमेच्या जागा मालकांच्या स्वाक्षरी घेणे, २) सदर चतु:सिमेच्या जागा मालकांना हजर करण्याची जबाबदारी ही मिळकत धारकांची राहील, ३) र.रु.२००/- चे स्टॅम्प पेपरवर साक्षांकित प्रतिज्ञापत्र व बंधनपत्र मिळकतधारकाकडून करुन घेणे, ४) सदर प्रतिज्ञापत्र व बंधनपत्राचा मसुदा मा.कायदा सल्लागार यांचेकडून तपासून घेणे, ५) ज्या मिळकतधारकांच्या मिळकती पुर्णत: मंजूर विकास योजनेतील प्रस्तावाने बाधीत होत असल्यास ७/१२ उता-यावर असणारे क्षेत्र किंवा वहिवाटीने दर्शविणेत आलेले क्षेत्र यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे मोबदला देणे, ६) सदर प्रतिज्ञापत्रात प्रामुख्याने मनपाने केलेल्या संयुक्त मोजणी नकाशात दर्शविलेले क्षेत्र संबंधित मिळकतधारकास मान्य करावे लागेल व याबाबत न्यायालयात दाद मागता येणार नाही असे नमुद करुन घ्यावे लागेल. म.प्रा. व न.र.अधि. १९६६ चे कलम १२६(१)(अ) नुसार खाजगी वाटाघाटीने भूसंपादनाचा पर्याय उपलब्ध आहे. तथापि म.प्रा. व न.र.अधि.१९६६ चे कलम १५२ नुसार सदर कलमाचे अधिकार हे Planning Authority कडे असलेने सदर बाब धोरणात्मक निर्णयासाठी मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे मंजूरीसाठी पाठविणे आवश्यक आहे. तथापि यापुढे प्रत्येक प्रकरणासाठी, आर्थिक बाबीसाठी मा.स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक राहील. भविष्यात जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत विकसीत होणारे रस्ते व इतर आवश्यक रस्त्याकरीता देखील अशाच पध्दतीने खाजगी वाटाघाटीने नुकसान भरपाई अदा करण्याची मागणी नागरीक/नगरसदस्य यांच्यामार्फत होऊ शकते. सबब प्रस्तावात नमुद केलेनुसार ज्या प्रकरणी रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव पाठविलेला आहे व संयुक्त मोजणी पुर्ण झालेली आहे. अशा रस्त्याकरीता बाधीत जागेचा खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे धोरणात्मक बाबींस व कार्यपध्दतीस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.विलास नांदगुडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी प्रथम आयुक्त साहेबांचे अभिनंदन करतो. ५/६ नाहीतर गेले दीड वर्ष आम्ही वाय जंक्शनसाठी मिलिटरी यांच्याकडे पैसे वर्ग करा म्हणून हा विषय मी सभागृहात मांडत होतो. सात /साडे सात लाखाचा चेक त्यांनी मिलिटरीकडे पाठवला म्हणून मी माझ्या वॉर्डातर्फे आपले अभिनंदन करतो आहे. दुसरे म्हणजे हा विषय चांगला आहे. या विषयाच्या माध्यमातून कुठेतरी जोडतोड करुन शेतक-यांना नुकसानभरपाई देऊन त्या पद्धतीने रस्त्याचे काम मार्गी लावण्याच्या विषयाच्या माध्यमातून चांगले काम केलेले आहे. या माध्यमातून आपले लक्ष वेधू इच्छितो की, ज्या शेतक-यांनी, छोट्या प्लॉटधारकांनी महापालिकेच्या विकासासाठी आपली जागा स्वतःहून ताब्यात दिली, त्या शेतक-यांना, प्लॉट धारकांना जागेचा मोबदला मिळत नाही. हा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठवला आहे. त्याचा पाठपुरावा करण्यासाठी होत नाही. याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. ज्यांचे मोठे पुढारी आहेत, ज्यांच्याकडे पैसा आहे, राजकीय नेते आहेत, बिल्डर आहेत, ते वेगळ्या पद्धतीने रस्त्याचा मोबदला मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यांना मोबदला द्या किंवा नाही या विषयाशी माझा संबंध नाही. विरोध सुद्धा करायचा नाही. ज्याच्याकडे सत्ता आहे, ताकद आहे, पैसा आहे, त्याला त्याचा फायदा मिळतोय. उदाहरण द्यायचे तर जो रस्ता १९९५ पूर्वी पिंपळे निलखमध्ये झाला होता. रस्ता झाला होता म्हणून त्याला टिडीआर, एफएसआय देत नाही. म्हणून त्या राजकीय पुढा-याने रस्ता नांगरून काढला व कंपाऊंड टाकले. अधिका-याने सर्वे केला व ओपिनियन दिले, त्याठिकाणी रस्ता नाही. या माणसाला टिडीआर द्यायला काही हरकत नाही. मी म्हणतो, सरसकट द्या. प्रत्येकाला, शेतक-याला, स्मॉल प्लॉट धारकाला त्याचा फायदा मिळाला पाहीजे. यासाठी आपण पुढाकार घ्यावा.

**मा.राहूल जाधव** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयाला अनुसरुन रोडचे जे काम चालू आहे, त्याठिकाणी संबंधित अधिका-यांना गेल्या दीड/दोन महिन्यांपूर्वी गोरगरीब लोकांची घरे जी रस्त्यामध्ये येत होती, ती गेलेली आहेत. त्या लोकांना भू-संपादन मोबदला मिळणार होता. तो थोड्याच दिवसांत मिळेल असे अधिका-यांनी त्यांना सांगितले होते. मी आपल्याला विनंती करतो, त्या संबंधित अधिका-याला खुलासा करायला सांगावे. जो मोबदला मिळणार आहे त्याला अजून किती दिवस लागतील.

**मा.प्रमोद ताम्हणकर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ज्या नागरीकांची घरे त्यात जात आहेत, ज्यांच्या जागा आहेत, त्यांना जागेच्या बदल्यात मोबदला मिळण्यासाठी वाटाघाटीने मोबदला अदा करणेच्या तरतुदीसाठी हा विषय सभागृहापुढे आला आहे. त्याचे सुरुवातीला स्वागत करतो. त्याचप्रमाणे या शहरामध्ये विविध ठिकाणी रस्ते केले जात होते. त्यात सध्या २५७ घरे बाधित होत आहेत. त्यापैकी माझ्या एकट्याच्या प्रभागात १६५ घरे बाधित होत आहेत. हे सर्व नागरिक सर्वसामान्य आहेत. त्यांच्या मागण्या सुद्धा सर्वसामान्य आहेत. त्यात साधारणतः बीआरटी बाधित लोकांना घरे देऊ ही मागणी मान्य करुन महापालिकेने आपल्या नगरीतील लोकांकडून फॉर्म भरुन घेतला आहे. याला ३/४ वर्षे झाली. याबदल्यात आपण त्यांना घरे देणार आहोत. त्यांच्या जागेचा मोबदला वाटाघाटीनुसार सगळ्यांना मिळावा, त्यानुसार हा विषय मंजूर करुन घ्यावा एवढी विनंती करतो.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, बीआरटीएस रोड संदर्भात हा विषय आला आहे. माझ्या प्रभागातील विषय आहे. या विषयाच्या अनुषंगाने मा.आयुक्त साहेब व मा.महापौर साहेब यांना मला सांगायचे आहे की, जानेवारी २०१३ रोजी माझ्या प्रभागातील सर्वे नं. ८४/८५ मध्ये ४९ कुटूंबे रहात होती. त्यापैकी ३० कुटूंबांनी स्वतःची घरे काढून घेऊन नगररचना विभागाला ताबा दिला आहे. त्या दिवसापासून ही ३० कुटूंबे रस्त्यावर आहेत. बेघर झालेले आहेत. याचा पाठपुरावा करत असताना कायदा विभागाच्या मते पेपरमध्ये नोटीस देण्यात आली होती. ही नोटीस देण्यात प्रशासनाने १ वर्ष घालवले आहे ही अत्यंत दूर्देवी गोष्ट आहे. जानेवरी २०१३ मध्ये हे लोक रस्त्यावर आल्यानंतर हे लोक बाहेर ४/५ हजार रुपये देऊन भाड्याच्या घरांमध्ये रहात आहेत. तरीदेखील प्रशासन त्यांचा विषय मंजूर करत नाही. वारंवार पाठपुरावा केल्यानंतर हा विषय सभागृहात आणला आहे. प्रामुख्याने या गोष्टीतून एकच सांगायचे आहे, याठिकाणी ज्या नागरीकांची घरे पाडून जागेचा ताबा घेतला आहे, आपण त्यांची दिशाभूल तर करत नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. यांना कोणी वालीच राहीलेला नाही. हे लोक माझ्या प्रभागात राहतात म्हणून मला त्यांच्यासाठी भांडायचे काम या सभागृहात करावे लागते. गेले १० महिने मी आयुक्त कार्यालय, कायदा विभाग, नगररचना विभाग यांच्याकडे पाठपुरावा करतोय. मला उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. माझ्या प्रभागामध्ये ३० लोकांना जागेचा ताबा दिलेला नाही. पेपरमध्ये नोटीस पब्लिश झाली. परंतू त्यांना फक्त गाजर दाखवण्यात आले आहे. एक रुपयाची सुद्धा नुकसानभरपाई दिलेली नाही. यांचा विचार करणार का नाही. याचे उत्तर प्रशासनाने द्यावे. या निमित्ताने मला सांगायचे आहे. या लोकांना रस्त्यावर टाकून चालणार नाही. डि. पी. १९९४ ला झाला असला तरी ही कुटूंबे १९९४ आधी पासून तिथे वस्तीस आहेत. जानेवारी २०१३ पर्यंत त्यांचे तिथे वास्तव्य होते. खरेतर बीआरटी रस्ता हाती घेतला त्यावेळी या लोकांना राहण्याची व्यवस्था करुन द्यायची होती. परंतू नंतर अधिका-यांनी त्यांची दिशाभूल केली आहे. रस्त्याचे काम करुन घेतले आहे. २० टक्के काम शिल्लक आहे. या विषयाला मी उपसूचना देतोय. ही उपसूचना या विषयाच्या निमित्ताने मान्य करावी. हा विषय उपसूचनेसहीत मंजूर करावा अशी याठिकाणी विनंती राहील.

स.न. ८४ व ८५ मधून नाशिक फाटा वाकड बी.आर.टी.एस. रोड जात असून या रोडमध्ये स.न. ८४ व ८५ मधिल ३० (तीस) बाधित कुटूंबांनी जागेचा ताबा दिलेला असून जानेवारी २०१३ ला पिंपरी चिंचवड महानगरपालिका खाजगी वाटाघाटी तत्वांवर कुठलीही कारवाई न होता ताबा दिलेला असून खाजगी वाटाघाटीनुसार पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या वतीने बी.आर.टी.एस. रोड बाधित लोकांसाठी २५७ घरांचे आरक्षण ठेवण्यात आलेले असून वर्ड बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार (गाईड लाईन) वरील रोड बाधित कुटूंबांना घरे देण्यात यावे व आताच्या सन २०१३ या वर्षाच्या प्रति गुंठा शासकीय दराने आणि ३० टक्के वाढीव रेडी रेकनर याप्रमाणे मोबदला देण्यात यावा व पिंपरी चिंचवड महानगपालिका नगर रचना विभागाची मोजणी व सातबारा उतारा ग्राह्य धरुन खाजगी वाटाघाटी तत्वावर मोबदला देण्यास मान्यता देणेत येत आहे. ही उपसुचना पिंपरी चिंचवड शहर बी.आर.टी.एस. बाधित लाभधारकांसाठी देण्यात येत आहे.

**मा.निलेश पांढरकर** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुनिता वाघेरे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, गेले २५/३० वर्षांपूर्वी पिंपरी गावातील उड्डाण पूलाचा प्रश्न प्रलंबित होता. आधीचे महापौर मा.संजोग वाघेरे यांनी सुद्धा यासाठी बरेच प्रयत्न केले होते. मी सध्या त्या भागातील नगरसेविका आहे. दिवाळीआधी त्यांचे पत्र आले होते, पूलासाठी पैसे भरा. नगररचना विभागाच्या प्रमुख श्रीमती भदाणे मॅडम यांनी पैसे भरण्यासाठी प्रयत्न केले होते. यानिमित्ताने मी विनंती करते की, हा प्रश्न माझ्या प्रभागातील आहे. मा.महापौर मॅडम यांच्या हस्ते पिंपरीतील लोकांना हा चेक देण्यात यावा.
**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, दोनही उपसूचना स्विकारल्या आहेत.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब. मा.सुनिता वाघेरे यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. डीटीपीच्या मॅडम व आयुक्त साहेबांनी प्रयत्न केल्यानंतर त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. डिफेन्स डिपार्टमेंटने संमती दिली आहे. महापालिकेने सुद्धा रु.२,८६,००,०००/- त्यांना अदा करण्यासाठी चेक काढला आहे. त्याबद्दल ज्या प्रत्येकाने प्रयत्न केले त्यांचे,प्रशासनाचे, विशेषतः मा.सुनिताताई वाघेरे,मा.उषाताई वाघेरे,मा.प्रभाकर वाघेरे या त्या भागातील नगरसेवकांचे मनापासून अभिनंदन करतो.

**मा.महापौर** – हा विषय उपसूचनेसहीत मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ३९९ | विषय क्रमांक – ४ |
| दिनांक - २१/११/२०१३ | विभाग - मा.आयुक्त |

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.नरवि/कावि/पिं.गुरव/टे८/३६२/२०१३ दि.४/१०/२०१

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४२७१ दिनांक ९/१०/२०१३

मौजे पिंपळेगुरव य़ेथील स.नं.८४ व ८५ पैकी मंजुर विकास योजनेतील ४५.०० मी. रस्त्याचे भूसंपादनाचे काम विशेष भुमी संपादन अधिकारी, विशेष घटक क्र.१, पिंपरी यांचे मार्फत चालू आहे. सदरचे प्रकरणी जागा मालकांना प्रपत्र अ द्वारे आगाऊ ताबा देणेबाबत महापालिकेकडून विनंती करण्यात आली होती. त्यानुसार संबंधितांनी सुमारे वर्षभरापूर्वी प्रपत्र ब द्वारे आगाऊ ताबा महानगरपालिकेस दिला असून त्यानुसार खाजगी वाटाघाटीनुसार मोबदला मिळण्याच्या अटीवर ताबा महानगरपालिकेस दिलेला आहे. सदर जागेवर महानगरपालिकेने रस्त्याचे काम केलेले असून सदर रस्त्याने बाधीत क्षेत्रासाठी मोबदला मिळणेबाबत मा.नगरसदस्य पाठपुरावा करीत आहे. सदर रस्त्याने बाधित मिळकतधारक यांना नगरभूमापन कार्यालयाकडील मोजणी फी चा खर्च सर्वसामान्य नागरीकांना करणे शक्य नाही. तरी नगररचना विभागाने केलेल्या मोजणीच्या आधारे सध्याचा ७/१२ उतारा ग्राह्य धरून व मोजणीची अट रद्द करून मोबदला देण्यात यावा. अशी मागणी संबंधीत बाधीत जागा मालकांनी केलेली आहे. परंतू सदर रस्त्याचे भूसंपादन प्रकरणी झालेल्या संयुक्त मोजणी नकाशावरून

जागा मालकाची वहीवाट निश्चित होत नाही. त्यामुळे अर्जदाराचे वहिवाटीचे मोजणी नकाशाचे अभावी फक्त संयुक्त मोजणी नकाशाच्या आधारे मोबदला अदा करणेस अडचण निर्माण होत आहे. सदर रस्त्याने बाधीत मिळकतीचे एकूण क्षेत्र कमी असल्याने मिळकतधारकास त्याची शासकीय मोजणी फी परवडणारी नाही. सदरच्या शासकीय मोजणी करण्यास जास्त कालावधी लागत असल्याने तसेच महानगरपालिकेकडील बी.आर.टी. व जे.एन.एन.यु.आर.एम. प्रकल्पाचे अंतर्गत सदरचा रस्ता समाविष्ट असल्याने तो कालमर्यादेत कार्यान्वित करणेकरिता सदरचे धोरण आवश्यक आहे. या प्रकरणी मा.आयुक्त सो. यांचे समवेत दि.०७/०३/२०१३ रोजी झालेली चर्चा व मा.जमाबंदी आयुक्त यांचे समवेत दि.११/०३/२०१३ रोजी झालेल्या चर्चेमध्ये सदर संयुक्त मोजणी नकाशावर मनपाच्या सर्व्हेअरकडून बाधीत मिळकतधारकांच्या वहिवाटी दर्शवून ती वहिवाट ग्राह्य धरुन नुकसान भरपाई रक्कम अदा करण्यास काहीही हरकत नसल्याचे सुचित करण्यात आले आहे. कोणत्याही मिळकतधारकास शासकीय कार्यालयाकडील मोजणी नकाशा सादर केल्याशिवाय त्याची मालकी हक्क सिध्द होत नाही व ज्या प्रकरणी संयुक्त मोजणी झालेली आहे. त्या प्रकरणी संयुक्त मोजणी नकाशात दर्शविल्यानुसार सी.टी.सर्व्हेच्या हद्दी, बांधकामे, सिमाभिंती, तार कुंपन, झाडे, रस्ते, इलेक्ट्रीक खांब इत्यादीच्या आधारे रस्त्याचे रूंदीने बाधीत क्षेत्र सदर मालकाने दर्शविलेले वहिवाटीचे क्षेत्र व ७/१२ उतारामधील सदर जागा मालकांचे क्षेत्र यांचा ताळमेळ दर्शवून येणा-या वहिवाटीच्या मोजणी नकाशानुसार बाधीत क्षेत्र महानगरपालिकेच्या सर्व्हेअरने निश्चित करून त्याप्रमाणे मोजणी नकाशा तयार करून व त्यानुसार येणा-या बाधित क्षेत्रानुसार खाजगी वाटाघाटीने नुकसान भरपाई रक्कम अदा करणे शक्य आहे. सदर कामी खालील नमुद केलेनुसार कार्यपध्दती व आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहिल. १) संयुक्त मोजणी नकाशानुसार तयार करावयाचे मोजणी नकाशावर मिळकतधारकाची वहिवाट मंजूर असल्याबाबत चतु:सिमेच्या जागा मालकांच्या स्वाक्षरी घेणे, २) सदर चतु:सिमेच्या जागा मालकांना हजर करण्याची जबाबदारी ही मिळकत धारकांची राहील, ३) र.रु.२००/- चे स्टॅम्प पेपरवर साक्षांकित प्रतिज्ञापत्र व बंधनपत्र मिळकतधारकाकडून करुन घेणे, ४) सदर प्रतिज्ञापत्र व बंधनपत्राचा मसुदा मा.कायदा सल्लागार यांचेकडून तपासून घेणे, ५) ज्या मिळकतधारकांच्या मिळकती पुर्णत: मंजूर विकास योजनेतील प्रस्तावाने बाधीत होत असल्यास ७/१२ उता-यावर असणारे क्षेत्र किंवा वहिवाटीने दर्शविणेत आलेले क्षेत्र यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे मोबदला देणे, ६) सदर प्रतिज्ञापत्रात प्रामुख्याने मनपाने केलेल्या संयुक्त मोजणी नकाशात दर्शविलेले क्षेत्र संबंधित मिळकतधारकास मान्य करावे लागेल व याबाबत न्यायालयात दाद मागता येणार नाही असे नमुद करुन घ्यावे लागेल. म.प्रा. व न.र.अधि. १९६६ चे कलम १२६(१)(अ) नुसार खाजगी वाटाघाटीने भूसंपादनाचा पर्याय उपलब्ध आहे. तथापि म.प्रा. व न.र.अधि.१९६६ चे कलम १५२ नुसार सदर कलमाचे अधिकार हे Planning Authority कडे असलेने सदर बाब धोरणात्मक निर्णयासाठी मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे मंजूरीसाठी पाठविणे आवश्यक आहे. तथापि यापुढे प्रत्येक प्रकरणासाठी, आर्थिक बाबीसाठी मा.स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक राहील. भविष्यात जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत विकसीत होणारे रस्ते व इतर आवश्यक रस्त्याकरीता देखील अशाच पध्दतीने खाजगी वाटाघाटीने नुकसान भरपाई अदा करण्याची मागणी नागरीक/नगरसदस्य यांच्यामार्फत होऊ शकते. सबब प्रस्तावात नमुद

केलेनुसार ज्या प्रकरणी रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव पाठविलेला आहे व संयुक्त मोजणी पुर्ण झालेली आहे. अशा रस्त्याकरीता बाधीत जागेचा खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे धोरणात्मक बाबींस व कार्यपध्दतीस तसेच स.न. ८४ व ८५ मधून नाशिक फाटा वाकड बी.आर.टी.एस. रोड जात असून या रोडमध्ये स.न. ८४ व ८५ मधिल ३० (तीस) बाधित कुटूंबांनी जागेचा ताबा दिलेला असून जानेवारी २०१३ ला पिंपरी चिंचवड महानगरपालिका खाजगी वाटाघाटी तत्वांवर कुठलीही कारवाई न होता ताबा दिलेला असून खाजगी वाटाघाटीनुसार पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या वतीने बी.आर.टी.एस. रोड बाधित लोकांसाठी २५७ घरांचे आरक्षण ठेवण्यात आलेले असून वर्ड बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार (गाईड लाईन) वरील रोड बाधित कुटूंबांना घरे देण्यात यावे व आताच्या सन २०१३ या वर्षाच्या प्रति गुंठा शासकीय दराने आणि ३० टक्के वाढीव रेडी रेकनर याप्रमाणे मोबदला देण्यात यावा व पिंपरी चिंचवड महानगपालिका नगर रचना विभागाची मोजणी व सातबारा उतारा ग्राह्य धरुन खाजगी वाटाघाटी तत्वावर मोबदला देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.झामाबाई बारणे** – मा.महापौर साहेब, बाधित झालेल्या लोकांना पर्यायी जागा द्यायला पाहीजे. महापौर साहेब तुम्ही एक महिला आहात. आपण महिलांच्या पाठिशी उभे राहिले पाहिजे. माझ्या प्रभागात एक महिला आहे. तिचे पूर्ण घर रस्त्यात गेले आहे. तिने थोडेसे दोन पत्रे टाकून निवारा केला आहे. तिला यायला जायला वाट सुद्धा ठेवलेली नाही. ती महिला माझ्याकडे येत असते. ती उघड्यावरच काम करत असते, पाटपाणी करत असते. आपण घरकुल योजना राबवताय. या महिलेला आपण घर दिलेतर पुण्य घडेल.

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.प्रतिभा भालेराव-**मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ५

दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.अरुणा भालेकर,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३६७७ दिनांक ९/७/२०१३
३) मा.गणेश लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.४२७२ दिनांक ९/१०/२०१३

वाचनाने सतसंस्कार होतात व सतसंस्कार संपन्न माणुसच सतकृती सदभक्ती संपन्न होतो, त्यामुळे पुर्णतः सामाजिक दृष्टीकोन ठेवुन सोहम लायब्ररी हे स्व.ईश्वरदास बहल विरंगुळा केंद्र येथे नागरीकांसाठी स्वखर्चाने मोफत लायब्ररी सुरु करणार आहे. तरी स्व.ईश्वरदास बहल विरंगुळा केंद्र येथे "सोहम लायब्ररीस" १५ x १५ ची जागा नाममात्र भाडयाने ५ वर्षे कालावधी करीता सेवाभावी सर्वधर्मीय आध्यात्मीक ग्रंथालयाकरीता देण्यास व त्याकामी करारनामा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.संजय वाबळे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो आहे –इंद्रायणीनगर प्रभाग क्र.२९ मधील सेक्टर नं.२ याठिकाणी पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने मोफत ग्रंथालय (लायब्ररी) सुरु करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.संजय काटे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.प्रतिभा भालेराव** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ४००　　　　विषय क्रमांक - ५
दिनांक - २१/११/२०१३　　　　विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.अरुणा भालेकर,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३६७७ दिनांक ९/७/२०१३
३) मा.गणेश लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.४२७२ दिनांक ९/१०/२०१३

वाचनाने सतसंस्कार होतात व सतसंस्कार संपन्न माणुसच सतकृती सदभक्ती संपन्न होतो, त्यामुळे पुर्णत: सामाजिक दृष्टीकोन ठेवुन सोहम लायब्ररी हे स्व.ईश्वरदास बहल विरंगुळा केंद्र येथे नागरीकांसाठी स्वखर्चाने मोफत लायब्ररी सुरु करणार आहे. तरी स्व.इश्वरदास बहल विरंगुळा केंद्र येथे "सोहम लायब्ररीस" १५ x १५ ची जागा नाममात्र भाडयाने ५ वर्षे कालावधी करीता सेवाभावी सर्वधर्मीय आध्यात्मीक ग्रंथालयाकरीता देण्यास व त्याकामी करारनामा करण्यास तसेच इंद्रायणीनगर प्रभाग क्र.२९ मधील सेक्टर नं.२ याठिकाणी पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने मोफत ग्रंथालय (लायब्ररी) सुरु करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ९२　　　　प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुमन नेटके** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ६
दिनांक - २१/११/२०१३　　　　विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/८१२/२०१३, दि.२१/०६/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.३७ दि.०६/०९/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.३६२ दि.२०/९/२०१३

डॉ.के.अनिल रॉय, वैद्यकीय अधिकारी यांना र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० या वेतनश्रेणीमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयाला अनुसरुन एक विषय आपल्यासमोर आणला आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेत मानधनावर एक महिला आहे. तिचा विनयभंग झालेला आहे असे तिने दि.८/१०/२०१३ रोजी आयुक्त साहेबांना कळवले होते. विषय अत्यंत गंभीर असताना मघाशी आयुक्त साहेबांनी त्यांना इथे येवून काही दिवस, काही महिने व काही तास झाल्याचे सांगितले होते. मी याठिकाणी सांगू इच्छितो की, आपल्याकडे त्या महिलेची तक्रार येऊन, दि.८/१०/१३ पासून म्हणजे १ महिना १३ दिवस व ५ तास झाले आहेत. त्या महिलेने तक्रार अर्जात म्हटले आहे, रहाटणी येथील दवाखान्यातून बदली होऊन बिजलीनगर येथील दवाखान्यात आलेले डॉ.संजय पोटे इथे आल्यापासून माझ्याशी यथास्थिती लगट करुन, मी अपंग असल्यामुळे, मानधनावर असल्यामुळे, न्यायालयीन दावा दाखल केल्यामुळे संगनमताने वरील विषयात मला त्रास देणे सुरु आहे. तुम्हाला पर्मनण्ट करायचे असेलतर माझी शिफारस आवश्यक आहे. अशी धमकी वारंवार देऊन अतिप्रसंग करायचा प्रयत्न करतात. तथापि महापालिकेच्या नावलौकिकास गालबोट लागू नये, बाधा उत्पन्न होऊ नये म्हणून मी याची वाच्यता न करता. तुमच्याकडे न्यायासाठी धाव घेतली आहे. आपल्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला होता. या अनुषंगाने, माझा मुलगा मतिमंद असल्यामुळे मी वैद्यकीय विभागात बदलीसाठी अर्ज केला होता. तथापि, वैद्यकीय अधिका-यांनी या महिलेने दि.८/१०/१३ रोजी जी तक्रार केली होती. त्याअनुषंगाने त्या महिलेचा जबाब घेतलेला आहे. तो वाचून दाखवतो. (संबंधित महिलेच्या जबाबाचे वाचन केले.)

जर आपल्याकडे असे प्रकार घडत असतील, मा.आयुक्त साहेब आपण सुद्धा एक डॉक्टर आहात. असे कृत्य घडणे पिंपरी चिंचवड शहरासाठी ही निंदनीय बाब आहे. आपल्या भागात पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये जवळपास ४० ते ५० टक्के महिला वेगवेगळ्या विभागात काम करतात. ५० टक्के महिला आरक्षण असल्यामुळे आज जवळपास ५१ टक्के महिला काम करत आहेत. असे असताना डॉक्टरकडून हा प्रकार झाल्याचे निदर्शनास येऊन सुद्धा त्याच्यावर कारवाई केली जात नाही. इथे बोलायला सुद्धा अवघड आहे असा दूर्दैवी प्रसंग त्या महिलेवर आला आहे. ती अपंग आहे. तिचा मुलगा देखील अपंग आहे. तिचे पतींचे निधन झाले आहे. ४०/४२ वयाची ही महिला आहे. अशाप्रकारे वागणूक दिली जात असेल, तिचा विनयभंग करायचा प्रयत्न केला जात असेलतर आपल्याकडे तिने दाद मागितली असेलतर हा विषय गंभीर आहे. मा.महापौर साहेब, आपल्याकडून किंवा आयुक्तांकडून या महिलेला न्याय मिळालेला नाही. दि.२८ रोजी ही महिला आयोगाकडे तक्रार केली आहे. त्याची पोच माझ्याकडे आहे. व तक्रार सुद्धा आहे. आपण या विषयावर गंभीरतेने लक्ष द्यावे. जो कोणी डॉक्टर आहे, त्याची तातडीने चौकशी करुन त्याला निलंबीत करावे असे जाहीरपणे सांगतो. मी आपल्याला विनंती करतो की, महापौर मॅडम आपण एक भगिनी आहात. आपण तीची व्यथा या भावनेतून बघितले पाहिजे.

म्हणून नम्र विनंती करतो. जर एखाद्या कर्मचा-याने, अधिका-याने २/४ दिवस काम केले नाहीतर त्याला एवढा मोठा मेमो दिला जातो. हे प्रकरण महिना, दीड महिन्यापूर्वी घडले असताना आयुक्त साहेबांनी यामध्ये लक्ष घातले नाही म्हणून आपण सुद्धा सभागृहाच्या वतीने त्यांना मेमो द्यावा. आपण चांगल्या प्रकरणांत लक्ष घालत नाही. एखाद्या अन्याय झालेल्या महिलेच्या प्रकरणामध्ये लक्ष घालत नाही का? आपल्याला विनंती आहे, या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन संबंधित डॉक्टरला सस्पेण्ड करावे, कामातून निलंबित करावे अशी विनंती करतो.

**मा.ऊल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता याठिकाणी माझे सहकारी, मित्र मा.दत्ता साने यांनी जो विषय मांडला आहे. त्यांनी पत्र वाचून दाखवले. याबाबत दुमत नाही. मला तुम्हाला विनंती करायची आहे की, विषय क्रमांक ६ मध्ये डॉ.के.अनिल रॉय, वैद्यकीय अधिकारी यांना र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० या वेतनश्रेणीमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्याचा विषय आहे. मा.दत्ता साने यांनी जो विषय सांगितला आहे तो वेगळ्या संदर्भातील आहे. त्यासाठी डॉ. रॉय यांना दोषी ठरविणे कितपत योग्य आहे. हा विषय प्रशासनाकडून आला आहे. याठिकाणी सर्वांना माहिती आहे. आयुक्त साहेब हुशार आहेत. विषय चुकीच्या पद्धतीने आणू नये हे परत सांगायचे आहे. एखाद्या व्यक्तीने चूक केली ती त्याच्याकडून अपघाताने झाली आहे. जो प्रकार झाला होता, त्याची त्या महिलेने सर्व ठिकाणी तक्रार केली आहे. कायदेशीर मार्गाने जायचे आहे, जाऊ शकतो. आयुक्त साहेब निर्णय घेऊ शकतात. डॉ.रॉय यांनी वैद्यकीय अधिकारी पदाचा चार्ज घेतला आहे. त्यांना त्या पदाचा अधिकार नाही? त्यांच्या प्रमोशनसाठी विषय आला असताना मा.दत्ता साने यांनी वेगळा विषय आणून त्यांना वेठीस धरणे कितपत योग्य आहे. प्रशासनाच्या माध्यमातून आलेला विषय चुकीचा आहे का, चुकीचे काम केले आहे का? मेडिकल ऑफीसर या पदाचे जे काही नियम आहेत, त्याप्रकारचे शिक्षण त्यांचे नाही का हे आधी सांगावे. मला आपल्याला विनंती करायची आहे की, एखाद्या व्यक्तीने विषय आणल्यानंतर आपण तो विषय किती महिने पेंडींग ठेवणार? एवढे विषय होत असतात, या गोष्टीला आरोग्य अधिकारी यांना जबाबदार धरायचे का? आरोग्य अधिकारी दोषी आहेत का? संबंधित जो कोणी दोषी असेल त्याच्यावर कारवाई केली पाहीजे. जो कोणी दोषी असेल, डॉ. रॉय दोषी असतील तर तसे आयुक्तांनी त्यांना सांगावे. मला नम्रपणे एक विनंती करायची आहे की, ज्या व्यक्तीने किंवा मनुष्याने बरेच वेळा क्लिअरन्स दिला आहे. शहरात हे होत असताना त्यासाठी नियम आहेत. हा विषय मंजूर करावा अशी नम्र विनंती आहे. हा विषय मंजूर करण्यासाठी कोणाचा विरोध असेल तर ते त्याचे व्यक्तिगत मत आहे. डॉ. रॉय यांचा दोष नसताना या गोष्टी करणे योग्य नाही. हा विषय लांबविणे हे योग्य नाही.

**मा.श्रीरंग बारणे**– मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, गेल्या काही दिवसांपासून सभागृहामध्ये वातावरण अतिशय खराब होत चालले आहे. महापौर या नात्याने मी तुम्हाला सभागृहाच्या वतीने विनंती करणार आहे की, इतर महापालिका सोडून पिंपरी चिंचवड महापालिकेत अतिशय चांगल्या प्रकारचे अधिकारी आहेत. लोकप्रतिनिधी त्यांना चांगल्या प्रकारची वागणूक देतात. अलिकडे अधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्यामध्ये कुठेतरी गॅप निर्माण करण्याचा प्रकार घडताना दिसतोय. अशा प्रकारे गैरसमज होत असतील, कोणत्याही कारणाने होत असतील, परंतू जर सन्मा. सदस्यांचे काही म्हणणे असेल, तक्रार असेल तर पार्टी मिटींग असते. त्याठिकाणी त्या

सन्मा. सदस्याने संबंधित अधिका-यांना बोलवून घेऊन हा प्रश्न मार्गी लावावा. सभागृहामध्ये कोणत्याही अधिका-याची एकेरी भाषेत किंमत कमी करत असालतर हा आपला सुद्धा अपमान आहे. मी सभागृहाच्या वतीने विनंती करतो की, वाईट प्रसिद्धी होऊ नये म्हणून आपण सगळे एकत्र येऊन हा प्रश्न मार्गी लावला पाहिजे. जो चुकतो त्याला पाठिशी घालू नये. २/३ महिन्यांपासून सभागृहातील वातावरण खराब होते आहे. आयुक्तांवरचे आरोप असतील, कोणी अधिकारी असेल, जो चुकत असेल त्यावर निश्चितपणे जाहीरपणे आरोप झाले पाहीजेत. परंतू सभागृहामध्ये वातावरण खराब होऊ नये. महापौर या नात्याने, पिठासीन अधिकारी या नात्याने मा.महापौर साहेब, मी तुम्हाला विनंती करतो, आपण सक्षमतेने आपल्या पक्षात मा.योगेश बहल यांच्यासारखे जाणकार नेते आहेत. जे हे वातावरण दूर करु शकतील. मा.प्रशांत शितोळे, मा.अजित गव्हाणे हे सुद्धा समेट घडविण्यामध्ये सक्षम आहेत. सर्वांना एकत्र बसून या गोष्टी सोडविता येतील. सभागृहातील वातावरण प्रदूषित होते आहे, ते दूर होईल.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी ज्येष्ठ नगरसेवक मा.दत्ता साने यांनी जो विषय मांडला आहे. खरेतर ते अत्यंत भावनाप्रधान आहेत. त्यांच्याकडे कोणीतरी येऊन हा विषय सांगितला असेल. मी स्वतः राज्य महिला आयोगाचे एक कौन्सिलींग सेंटर चालवते. मी इथे सांगू इच्छिते, कोणतीही तक्रार होत असताना त्या महिलेचे नाव त्या तक्रारीत उघड करणे कायद्याने गुन्हा आहे. हे कायद्याचा कक्षेत कुठेही बसत नाही. यातून त्या महिलेची बदनामी होते. सगळ्यांचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टीकोण बदलतो. म्हणून त्या महिलेचे नाव प्रोसिडींगमधून वगळण्यात यावे अशी विनंती करते. मा.आयुक्त साहेब, शासनाच्या आदेशाप्रमाणे आपल्याकडे महिला समिती निर्गमित केली आहे. त्यांचा अहवाल वेळच्या वेळी घ्यावा. त्यांच्याकडे ज्या तक्रारी जातात, त्याचे निरसन काय होते,याचा गंभिर्याने विचार करावा. वर्तमानपत्रामध्ये संबंधित महिलेचे नाव टाकू नये व प्रोसिडींगमधूनही हे नाव वगळण्यात यावे.

**मा.महापौर** –प्रोसिडींगमधून हे नाव वगळण्यात यावे.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर बरेच दिवस झाले, सगळ्यांना विषय माहिती आहे. परंतू या विषयावर आजपर्यंत निर्णय होऊ शकला नाही हि खेदाची बाब म्हणावी लागेल. डॉ.रॉय यांच्याबाबत बरेच वेळा पेपरमध्ये बातम्या आल्या. आयुक्त साहेबांनंतर कोणताही अधिकारी इतका प्रसिद्ध झाला नसेल इतकी प्रसिद्धी चांगल्या वाईट प्रमाणात त्यांना मिळाली. परंतू ख-या अर्थाने या गोष्टीला कारण काय आहे ते सुद्धा विचार करणे गरजेचे आहे. हा खरेतर राजकीय विषय नाही. सेना असो, बीजेपी असो, राष्ट्रवादी असो, आमचा या गोष्टीशी काय संबंध? आम्ही फक्त पॉलिसी डिसिजनला. तुमचे काही आरोप असतील, इंटर्नल चौकश्या असतील ते तुमचे तुम्ही बघायचे. डॉ.श्रीकर परदेशी यांच्यासारखी चांगली व्यक्ती उत्कृष्ट प्रशासक म्हणून जेव्हा महापालिकेची सुत्रे हाती घेते. त्यामुळे प्रशासकीय कारभाराला वळण लागते. तरीसुद्धा अशा तक्रारी आमच्याकडे येण्याचे खरेतर काहीच कारण नाही. त्यांच्याकडेच या तक्रारी गेल्या पाहिजेत आणि त्यांनीच यावर निर्णय घ्यायला पाहीजे. बरेचसे निर्णय आम्ही सुद्धा पाळतो. आयुक्त साहेब त्यांच्या अधिकारांत हा निर्णय, तो निर्णय. जनरली असे होत

नाही. मागील आयुक्तांनी घेतलेले निर्णय नवीन आयुक्त बदलत नाहीत. परंतू अशा प्रकारचे अडचणीचे निर्णय होताना जसे मा.श्रीरंग बारणे यांनी सूचवले की, पार्टी मिटींगमध्ये संबंधित सदस्य व अधिकारी यांना बोलवून गैरसमज असतील ते दूर करुन समेट घडवायचा प्रयत्न झाला पाहीजे. परंतू क्लास वनचे जे अधिकारी आहेत, ते पूर्ण शहराचे नियंत्रण करणारे अधिकारी आहेत. त्यांच्याबाबत, अशा प्रकारच्या तक्रारी आमच्यासारख्यांकडे येणे ही खरी लाजीरवाणी गोष्ट आहे. मा.उल्हास शेट्टी यांनी सांगितले, खरेच तसा प्रकार आहे का. आमचा इंटेलिजन्स ब्युरो नाही की आम्ही याच्या चूका शोधा, त्यांच्या चूका शोधा हे योग्य नाही. ही एक स्ट्रॅटेजी झाली आहे आयुक्त साहेब चुकीच्या कामासाठी कडक †क्शन घेतात. मला कॉम्पेटिशन करणारा अधिकारी माझ्यासमोर माझ्या चुका आणून टाकतो. हे सगळ्यांना माहिती आहे. तुम्हालाही माहित आहे. ही फॅक्ट तुम्हाला टाळून चालणार नाही, दूर्लक्षित करुन चालणार नाही. माझे प्रमोशन होत नाही मग बाकीच्यांचे पण अजिबात झाले नाही पाहिजे. आमचा काय संबंध. तुम्हाला ५८ वर्षांपर्यंत शिक्कामोर्तब आहे. आम्हाल दर पाच वर्षांनी रिन्युएशन करावे लागते. आम्ही कशाला कोणाचा वाईटपणा घ्यायचा. आम्ही १२८ + ५ लोकांनी तुमच्यात कॉम्प्रमाईज करायचे काहीच कारण नाही. तुमच्या अधिकारी पदाच्या कालावधीत पॉलिसीला मान्यता देणे, चांगली पॉलिसी असेल तर त्यात सुधारणा घडवणे अशी कामे आम्ही करायची असतात. हे मी सांगायची गरज नाही. परंतू असे गैरसमज होऊ नये. एखाद्या डॉक्टरने कोणतेतरी स्टेटमेंट द्यायचे, परत त्याबद्दल त्याने त्याची माफी मागायची. एखादा सदस्य दुखावला जायचा. महिलेचे नाव पुढे करुन म्हणायचे, नगरसेवक वेठीस धरतात. सारथीमुळे तर आमचे काम कमीच केले आहे. आपण एक उत्कृष्ट प्रशासक आहात. आपल्याकडून तुमच्याबाबतीत जी भिती आहे ती कमी करा. आदरयुक्त दरारा असावा. कुठेतरी तुमच्यासमोर येणा-या तक्रारींत अशी सिच्युएशन नाही राहिली पाहीजे. आपण उत्कृष्ट प्रशासक आहात. गेले २/४ महिने या विषयाची चर्चा चालू आहे. ती न होता हा निर्णय आयुक्त साहेबांनी त्यांच्या अधिकारांत घ्यावा. आयुक्त साहेब सक्षम आहेत. त्यांनी त्यांच्या अधिकारांत जो निर्णय घेतील तो त्यांनी सभागृहासमोर मांडावा. मा.दत्ता साने यांनी जी कारणे, पूरावे, पत्रे दिली, त्या तक्रारींचा सोक्षमोक्ष त्यांनी लावावा. त्यांनी ठरवावे. याला काढा आणि याला बसवा असे आम्ही म्हणणार नाही. डॉ. रॉय हे सुद्धा चांगले अधिकारी आहेत. त्यांच्या जागेवर ज्या कोणाला बसवायचे असेल ती सुद्धा चांगली व्यक्ती आहे. परंतू अशा प्रकारे एखाद्याची बदनामी होणे हे पण योग्य नाही. त्यांच्याकडून आम्हाला सुद्धा ही अपेक्षा नाही. माझी सभागृहाच्या वतीने आपल्याला विनंती आहे की, या विषयावर बिल्कूल चर्चा होता कामा नये. अधिकारी बदनाम होतो, महापालिका बदनाम होते. आयुक्त साहेबांनी त्यांच्या अधिकारांत या विषयावर निर्णय घ्यावा.

**मा.आशा सूर्यवंशी** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, बिजलीनगर दवाखान्याचा विषय इथे आला आहे. डॉ.रॉय यांच्या पदोन्नतीचा हा विषय आला आहे. बिजलीनगर दवाखान्याची वॉर्ड आया हिला त्रास झाला अशी तक्रार आली आहे. परंतू असे काही झालेले नाही. त्या दवाखान्यामध्ये रोज फक्त अर्धा/एक तास ओपीडीसाठी डॉक्टर तिथे येत असतात. एखाद्या माणसाचे चरित्र चांगले असले तरी ते बदनाम करायचे ठरवले तर महिला काहीही करु शकते.

डॉ.पोटे यांनी वायसीएमला चांगले काम केले आहे. मी बिजलीनगर वॉर्डाची नगरसेविका या नात्याने सांगते, ज्या महिलेने ही तक्रार केली आहे, आमच्या इथल्या स्थानिक लोकांनी सांगितले की, डॉक्टरांनाच या व्यक्तीपासून त्रास झाला आहे. एवढेच माझ्या कानावर आले आहे. हा विषय माझ्या वॉर्डातील आहे. आपल्यात काही अडचणी असल्यामुळे आपण काही चांगल्या लोकांना असे करु नये एवढेच सांगते.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, डॉ.कलम यादव या रिटायर्ड झाल्यानंतर आपल्याकडे विशाखा कमिटी अंतर्गत शासकीय कार्यालयांमध्ये अशा प्रकारचे महिलांवर प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे होणा-या अत्याचारसंदर्भात एक कमिटी नेमायची आहे. डॉ.कलम यादव या निवृत्त झाल्यानंतर त्यांच्या जागी दुसरे कोणी नेमले आहे का? विषय अत्यंत गंभीर आहे. विषय गंभीर असलातरी संबंधित महिला कर्मचारी हिने खरेतर त्या कमिटीकडे तिचा तक्रार अर्ज करायला पाहीजे होता. त्या कमिटीने त्यावर निर्णय घ्यायला पाहिजे. त्या कमिटीवर ज्या सामाजिक कार्यकर्त्या घेतल्या आहेत, त्यांचा अनुभव पाहता मला असे वाटते, ज्या महिला तक्रारदारांना तिथे जावेसे वाटत नसेल. यात सुधारणा करावी. थोड्या का होईना खरेतर ज्या महिला त्यांच्या हक्कांसाठी लढतात, त्यांची त्याठिकाणी नियुक्ती करावी. इथे डॉ.रॉय यांचा विषय तहकूब करणार आहोत. एकतर त्यांना पदोन्नती द्या नाहीतर विषय कायमचा सभागृहाबाहेर काढा. चॉकलेट देऊन ते संपायची वेळ आली आहे. डॉ.रॉय यांचा विषय करा. सोम्यागोम्याचे विषय मंजूर करता. यांच्या पदोन्नतीच्या विषयाला विरोध होतो. ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत त्यांचे पदोन्नतीचे विषय मंजूर होतात. एखादा माणूस इमानदारीने काम करत असेल तर त्याला किती दिवस खेळवणार आहात. द्यायचे असेल तर मनमोकळेपणाने करा. एखाद्याला घरी बोलवायचे व नंतर चहा करायला साखर नाही म्हणून त्याचा अपमान करायचा असा प्रकार होतो आहे. हा विषय तहकूब केलातरी आमचा या विषयाला पाठिंबा असणार आहे. डॉ. रॉय यांना पदोन्नती देण्यात यावी. विशाखा कमिटीअंतर्गत जी समिती नेमली आहे, त्या समितीकडे ज्या भगिनी आहेत त्यांनी तक्रार करावी. जेणेकरुन खरे खोटे सभागृहापुढे येईल. मा.आशाताई सूर्यवंशी यांनी सांगितले. त्यांची भाषा अत्यंत घरगुती भाषा आहे. त्याचा अन्वयार्थ काढू नये. विपर्यास करु नये. त्यांनी अत्यंत सभ्य शब्दांत सभेमध्ये सांगितले आहे. त्या महिलेच्या विरोधात त्या आहेत असे नाही. काही ठिकाणी त्याचा गैर अर्थ घेत असालतर ते घरगुती भाषेत सांगितले आहे. निश्चित हे सांगावेसे वाटते, मा.दत्ता साने यांनी काही शब्द वापरले. ते शब्द सभा कामकाजातून काढून टाकावेत. एखाद्याला तात्पुरता कारभार देऊन त्याने किती दिवस सहन करायचे. डॉ.रॉय यांच्या पदोन्नतीचा विषय इथे मंजूर करावा.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मागील २/३ मिटींगमध्ये हा विषय येतो आहे व तहकूब होतो आहे. मागील वेळी बोलताना सूचना केली होती. यामागचे नेमके कारण प्रशासनाला व आम्हाला सुद्धा माहिती आहे. दोन्ही बाजू ऐकून घेतल्या आहेत. मा.आयुक्त साहेब तुम्ही नियमावर बोट ठेवून काम करता अशी तुमची प्रतिमा संपूर्ण शहरात आहे. त्यामुळे मा.श्रीरंग बारणे यांनी सूचना केली होती, पक्षाच्या नेत्यांनी यात लक्ष घालून विषय मिटवला पाहिजे. परंतू मिटत नाही. प्रशासनाला आपण सूचना केली पाहिजे. अशा प्रकारे

त्यांच्यात समेट घडवायचा, तो घडवावा. वैद्यकीय विभागामध्ये ब-याच अडचणी आहेत. त्यांकडे दूर्लक्ष होते आहे. नको त्या विषयाकडे जास्त लक्ष दिले जाते आहे. मा.सिमाताई सावळे म्हटल्याप्रमाणे डॉ.रॉय यांना प्रत्येक मिटींगला येताना टेंशन, ज्यांचा विषय करायचा त्यांना टेंशन राहणार. आज बैठकीत काहीतरी निर्णय व्हावा. यासंदर्भात महापौर साहेब, प्रशासनाला खुलासा करायला लावावा. जो काही निर्णय करायचा आहे तो एकतर फेटाळून लावा नाहीतर मंजूर करावा. या मिटींगमध्येच निर्णय घ्यावा अशी मी सूचना करतो.

**मा.महापौर** – आयुक्त साहेब खुलासा करतील.

**मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त)** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, सर्वप्रथम सन्मा.सदस्य दत्ता साने यांनी बिजलीनगर दवाखान्यातील विषय विषद केला. वस्तुस्थिती सर्वांसमोर मांडतो की, ज्या महिलेची तक्रार होती. त्यांनी दि.१० ऑक्टोबर १३ रोजी माझ्याकडे तक्रार केली होती. मी प्रशासन विभागाकडे ती तक्रार चौकशीसाठी दिली होती. नंतर दि.१७ ऑक्टोबर १३ रोजी त्या महिलेने आणखी सविस्तर तक्रार दिली होती. यादरम्यान जी समिती, सन्मा. सदस्या सिमा सावळे यांनी आत्ता जो मुद्दा मांडला, त्या समितीचे महिला अधिकारी, प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग श्रीमती पाटील, श्रीमती गाडेकर, श्रीमती भरविरकर, श्रीमती देसाई या ४ अधिकारी यांनी संबंधित तक्रारदार महिलेची तक्रार ऐकून घेऊन तिचा जबाब देखील घेतला आहे. त्यानंतर दि.१५ ऑक्टोबर १३ ला संबंधित डॉक्टर यांनी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे की, संबंधित तक्रारदार महिला या प्रशासनामध्ये मानधनावर स्वच्छतेचे काम करतात. त्यांनी काम व्यवस्थित केले नाही म्हणून त्यांना नोटीस दिली. त्यांनी त्यासाठी उलट म्हणून या पद्धतीची माझ्याविरुद्ध तक्रार केली आहे. दि. १५ ऑक्टोबर १३ रोजी संबंधित डॉक्टरने माझ्याकडे तक्रार दिली आहे. सोबत २ कागदपत्रे जोडलेली आहेत. दि. २० ऑगस्ट १३ ला म्हणजे घटनेच्या दीड महिन्यापूर्वी असिस्टंट मेट्रन सौ.एके यांनी संबंधित महिलेने काम व्यवस्थित केले नाही, अस्वच्छता ठेवली म्हणून नोटीस दिली होती. त्या महिलेने ती नोटीस घेतली नाही म्हणून दि. ८ ऑक्टोबर १३ रोजी या असिस्टंट मेट्रन यांनी मेडीकल ऑफीसर यांना बेशिस्त वर्तणुकीबाबत पत्र देणेबाबत सांगितले होते. नोटीस घेण्यास नकार दिल्यानंतर दि. ८ ऑक्टोबर १३ रोजी संबंधित डॉक्टरने संबंधित महिलेला नोटीस दिली होती. ही वस्तुस्थिती मांडणे गरजेचे होते. परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेता संबंधित डॉक्टर व ती महिला यांच्या बदल्या अन्य विभागामध्ये केल्या आहेत. दोघेही संपर्कात येणार नाहीत. ख-या-खोट्या तक्रारीचा शोध प्रशासन घेईल. त्या महिलेने माझी बदली करावी अशी मागणी केली होती. डॉक्टरला तिथे ठेवणे योग्य नव्हते म्हणून दोघांच्या बदल्या केल्या आहेत. या प्रकरणात जरी डॉक्टरने आपले म्हणणे अशा पद्धतीने मांडले असले तरी, समर्थनार्थ पूरावे दिले असले तरी अशा प्रकरणांच्याबाबतीत मा.सिमा सावळे यांनी सांगितले, या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी म्हणून चौकशी समितीला जबाब सोपवले होते. संबंधित डॉक्टरविरुद्ध चार्जशिट दाखल केली आहे. १६ नोव्हेंबरला मी स्वाक्षरी करुन दिली आहे. डॉक्टरला १८ नोव्हेंबरला दोषारोप पत्र लागू करण्यात आले आहे. डॉक्टर दोषी आढळले तर त्याच्यावर कारवाई करण्यात येईल. दरम्यान दोघांच्या बदल्या केल्या आहेत. मा.श्रीरंग बारणे यांनी मुद्दा मांडला की, डॉ.रॉय यांच्या पदोन्नतीबाबत काही मुद्दे सातत्याने सभागृहासमोर

येतात. सदस्यांना काही वेळा पुरेशी माहिती नसेल, काही फॅक्टस् इथे सांगणे आवश्यक वाटते की, आत्ता डॉ.रॉय यांना दि. ३१ मे १३ रोजी प्रभारी स्वरुपात पदभार का दिला याची कारणमिमांसा प्रशासकीय अधिकारी म्हणून मी मांडतो. बाकी अधिकार सन्मा. सभागृहाचा आहे. डॉ.रॉय हे दि.२०/९/९१ रोजी महापालिका सेवेत रुजू झाले. डॉ.साळवे दि.१४/९/९२ रोजी रुजू झाले. म्हणजे डॉ.रॉय हे डॉ.साळवे यांच्यापेक्षा एक वर्ष आधी रुजू झाले आहेत. दि.३१ डिसेंबर ११ला सेवा ज्येष्ठता यादी प्रसिद्ध केली आहे. त्या यादीत डॉ.रॉय यांचा सिनिऍरिटी नंबर २० आहे व डॉ.साळवे यांचा सिनिऍरिटी नंबर २४ आहे. या पदाची सेवा प्रवेश नियमावली या आधीच म्हणजे १७ ऑक्टोबर १९८५ रोजी मंजूर झाली आहे. त्यात म्हटले आहे, एम.ओ.एच. म्हणजे आरोग्य वैद्यकीय अधिकारी होण्यासाठी एमबीबीएस, डि.पी.एच. (डिप्लोमा इन पब्लिक हेल्थ) व वैद्यकीय अधिकारी पदावर ५ वर्षे सेवा आवश्यक आहे. दि.१७ ऑक्टोबर १९८५ ला जे नियम मंजूर आहेत, त्यात आजपर्यंत सुधारणा नाही. नवीन सेवाप्रवेश नियमावली तयार करतो आहोत. ही सेवाप्रवेश नियमावली मा.विधी समितीकडे सादर केली आहे. त्यावर निर्णय व्हायचा बाकी आहे. सभागृहाच्या मान्यतेसाठी हा विषय सभागृहासमोर येणार आहे. या नियमांनुसार आजपर्यंत आपण काम करतो आहोत.

डॉ.नागकुमार रिटायर्ड झाल्यानंतर डॉ.अय्यर यांना तात्पुरता पदभार देण्यात आला होता. डॉ.अय्यर रिटायर्ड झाल्यानंतर डॉ.जगदाळे व नंतर डॉ.गायकवाड यांच्याकडे पदभार सोपवण्यात आला होता. हे सगळे अधिकारी सिनिअर मोस्ट अधिकारी असल्यामुळे त्यांना तत्कालिन आयुक्त मा.शर्मा व मी आल्यानंतर माझ्या कालावधीत पदभार दिला आहे. मा.शर्मा यांनी दि. २९ फेब्रुवारी १२ रोजी डॉ. रॉय यांचा सिनिऍरिटी नंबर २० असल्यामुळे, यादरम्यान इतर अनेक डॉक्टर डिपीएच ही अर्हता धारण करत असल्यामुळे डेप्युटी डायरेक्टर किंवा जॉईंट डायरेक्टर दर्जाचा अधिकारी प्रतिनियुक्तीवर मिळावा अशी मागणी तत्कालिन आयुक्तांनी शासनाकडे केली होती. मी दि.२३ मे २०१२ रोजी रुजू झालो. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात शासनाच्या बदल्या होत असतात. मी दि.२५ मे २०१२ रोजी शर्मा साहेबांच्या पत्राचा संदर्भ दिला व शासनाकडे विनंती केली. सहसंचालक, उपसंचालक दर्जाचा अधिकारी शासनाकडे मागितला. त्यावेळी शासनाने सांगितले, तुमच्या विनंतीचा विचार करुन या दर्जाचा अधिकारी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करु. त्यावेळी मी सध्याचे मुख्य सचिव श्री.जयंतकुमार बांठिया यांची भेट घेतली होती. दरम्यानच्या कालावधीत शासनाकडे पुन्हा विनंती केली होती. य़ाचा आधार घेऊन शासनाने नोटीस पुटअप केली होती. डॉ.एच.एच. चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे यांनी इथे येण्यास संमती दर्शविली होती. रितसर नस्ती आरोग्य विभागात सादर झाली होती. या पदाबाबत मा.उपमुख्यमंत्री, पालकमंत्री यांनी त्यांना नियुक्त करावे अशा आरोग्य विभागास सूचना केल्या होत्या. त्यांची नियुक्ती होणार हे निश्चित होते. परंतू दरम्यान आरोग्याच्या समस्या उद्धभवल्यामुळे त्यांनी सांगितले, प्रकृतीची अडचण लक्षात घेता मी संमती दिली होती, पण मी माघार घेतो आहे. दि.२९ फेब्रुवारी २०१२ शर्मा साहेबांनी दिलेले पत्र, शासन स्तरावरुन कारवाई होईल म्हणून, शासनाकडून नियुक्ती होईल म्हणून हे पद तसेच पेंडींग ठेवले होते. मे १३ रोजी शासनाकडून पर्यायी अधिकारी मिळेल अशी अपेक्षा होती. याबाबत वारंवार आरोग्य मंत्री य़ांच्याकडे पाठपुरावा चालू होता. मी स्वतः आरोग्य मंत्री यांची भेट घेतली आहे. नंतर मे २०१३ मध्ये शासनाच्या आरोग्य खात्याने सांगितले, आमच्याकडे खूप मोठ्या प्रमाणात

पदे रिक्त आहेत म्हणून विनंतीचा विचार करु शकत नाही. आयुक्त डॉ.रॉय यांना पाठिशी घालतात असे सांगण्यात येते. १९८५ मध्ये रिक्रूटमेंट रुल निश्चित झाले होते. सेवा ज्येष्ठता यादी डिसाईड केली होती त्यावेळी मी नव्हतो. याचा माझ्याशी संबंध नाही. डॉ.रॉय यांना डीपीएच करण्यासाठी दि.९ जून २०११ रोजी म्हणजे मी येण्याआधी २ वर्षे आधी परमिशन दिली होती. तत्कालिन आयुक्तांनी नियम तपासून त्यांना परमिशन दिली होती. ते या पदासाठी पात्र ठरणे, त्यांचे डीपीएच पूर्ण होणे हा योगायोग आहे.

डॉ.साळवे यांनी याविषयी ठिकठिकाणी तक्रारी केल्या आहेत. त्यांनी शासनाकडे तक्रार केली आहे. एस.सी. कमिशनकडे तक्रार केली आहे. त्यांना वेळोवेळी समर्पक उत्तरे सादर केली आहेत. माझ्यावर प्रशासनाने अन्याय केला असे त्यांचे म्हणणे आहे. परंतू प्रशासनाने डॉ.साळवे यांना दोन/तीन बाबतींत फेवर केले आहे. उदाहरण देऊ इच्छितो, डॉ.साळवे यांनी दि. २ फेब्रुवारी २००९ रोजी प्रशासनाला अर्ज केला होता, मी †डिशनल एमओएचची अर्हता धारण करतो. तर मला †डीशनल एम.ओ.एच. ची पदोन्नती देण्यात यावी. †डिशनल एमओएच पदाकरिता दि.२१ एप्रिल २००८ ला मान्यता आली आहे. त्यानंतर डॉ. साळवे यांनी २००९ ला पदोन्नती देण्यात यावी म्हणून अर्ज दिला होता. त्यांनी १२ मे २०११ ला देखील अर्ज दिला होता. त्यांच्या अर्जाचा विचार त्यावेळी झाला नव्हता. त्यांचा अर्ज माझ्या टेबलवर आल्यानंतर त्यांना अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी म्हणून मी पदोन्नती दिलेली आहे. त्यांच्या विनंतीचा साडे तीन वर्षे विचार झाला नव्हता. मी आल्यानंतर त्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. मा.सभागृहाने त्यांच्या विषयाला मान्यता कायम केलेली आहे. दुसरी गोष्ट म्हणजे, सदस्यांना याची कल्पना असेल. एमओएच या पदासाठी २०००-२००१ मध्ये बराच वाद निर्माण झाला होता. म्हणून त्यावेळी आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाशी सुसंगत असे वैद्यकीय संचालक पद निर्माण केले. दोन्ही पदांची वेतनश्रेणी समान आहे. दोन्ही पदांना समान अधिकार देण्यात आले. डॉ. जगदाळे रिटायर्ड होताना डॉ.साळवे यांना वैद्यकीय संचालक पदाच्या अतिरिक्त पदभाराची पूर्ण जबाबदारी देण्यात आली आहे. त्यांना ८ महिन्यांत हे बेनेफीट देण्यात आले आहे. डॉ.साळवे यांचे एमबीबीएसचे रजिस्ट्रेशनचे नुतनीकरण झालेले नव्हते. दि.३१ मार्च २०१२ तारखेला त्यांचे रजिस्ट्रेशन एक्सपायर झालेले होते. मेडीकल प्रॅक्टीशनर †क्टच्या तरतुदीनुसार अशा व्यक्तीला प्रॅक्टीस करता येत नाही. कोणत्याही पदावर काम करता येत नाही. त्यांनी एम.डी.चे सुद्धा रजिस्ट्रेशन केले नव्हते. त्यांनी दि.२३ एप्रिल २०१३ रोजी रजिस्ट्रेशनसाठी परमिशन मागितली आहे. अनेक सन्माननियांना कल्पना असेल, पुणे महापालिकेतील †डीशनल एमओएच यांनी रजिस्ट्रेशनचे रिन्युअल न करता ते पद भूषवले म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल होऊन त्यांना अटक झाली आहे. असे असताना डॉ.साळवे यांचे रजिस्ट्रेशन नसल्याची बातमी स्थानिक वृत्तपत्रांमध्ये आली होती, म्हणून त्यांच्यावर सूडबुद्धीने कारवाई केलेली नाही. अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय संचालक या पदावर ते आज काम करत होते. त्यांच्यावर सूडबुद्धी वापरली जाते. मी डॉ.रॉय यांना फेवर करतो असे ते म्हणतात यात कोणतेही तथ्य नाही. त्यांनी एक मुद्दा मांडला आहे, मागासवर्गीय अधिका-यावर अन्याय केला जातो. असे अजिबात नाही. शासनाच्या नियमांनुसार त्यांना फेवर केले जाते. डॉ.जगदाळे रिटायर्ड झाल्यानंतर डॉ.गायकवाड सुपरइंटेंडंट झाले. डॉ.गायकवाड यांच्या पदोन्नतीनंतर डेप्युटी सुपरइंटेंडंट हे पद रिक्त झाले. दोनही पदे ७६०० या वेतनश्रेणीतील आहेत. सिनिऍरिटीनुसार मी

डॉ.मनोज देशमुख यांना बोलवून विचारले. तुम्ही काम करायला इच्छुक आहात का. त्यावेळी डॉ.भगत आले. ते म्हणाले, मी ज्युनिअर आहे. पण दोन पदांपैकी एक पद रिझर्वेशनसाठी गेले पाहीजे. मागासवर्गीय अधिकारी म्हणून मला हे पद मिळाले पाहीजे. त्यांच्या विनंती विचार करुन डॉ.भगत ज्युनिअर असतानादेखील मागासवर्गीय असल्यामुळे त्यांना न्याय दिला आहे. नियमाप्रमाणे ज्या-ज्या ठिकाणी जे अधिकारी पदास पात्र होतात, त्याप्रमाणे त्यांना पदे दिलेली आहेत. सध्या असलेली परिस्थिती पाहता, मध्यंतरी माझ्या वाचनात आले, २००१ मध्ये तत्कालिन एमओएच यांना जी पदोन्नती दिली ती देताना नियमांत शिथिलता आली आहे. परंतू वस्तुस्थिती तशी नाही. १९९९ मध्ये प्रशासनाने प्रस्ताव ठेवला होता. डॉ.अय्यर यांच्या पदोन्नतीचा विषय ठेवला होता. सभागृहाने डॉ.नागकुमार यांना पदोन्नती देण्याचा निर्णय घेतला होता. हा प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता. शासनाने दिलेल्या निर्णयाचे वर्डींग वाचून दाखवतो - शासनाने दि.३ सप्टेंबर २००२ ला म्हटले आहे, पिंपरी चिंचवड महापालिकेतील डॉ.नागकुमार यांची आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर निर्णयास आलेल्या नियुक्तीबाबत शासनाला मान्यता देण्याबाबत मु.प्रा.मनपा. अधिनियमाच्या कलम ४५ (४) नुसार शासनाचे अधिकारांचा वापर करुन याद्वारे डॉ.नागकुमार यांना एमओएच या पदावर नियुक्तीसंदर्भात सदरील न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्याच्या आयुक्तांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. यात शासनाने कुठेही म्हटले नाही, शासनाने सेवा प्रवेश नियमावली शिथिल केली आहे. ५ वर्षे अनुभव किंवा नियम शिथिल केले असे कुठे म्हटलेले नाही. डॉ.साळवे यांनी हा मुद्दा उपस्थित केला आहे. मा.उच्च न्यायालयाने याचिकेत दिलेल्या निर्णयात कागदपत्रे यात पाहता सेवाप्रवेश नियमावलीचे कुठेही भाष्य केलेले नाही. दि. ६ ऑगस्ट २००४ च्या निर्णयात मा.उच्च न्यायालयाने दिले आहे. (निर्णय वाचून दाखवला.) म्हणजे डॉ.अय्यर यांना मेडिकल डायरेक्टर केले म्हणून त्यात अर्थ राहिलेला नाही म्हणून डिसबर्स केले आहे. १९८५ मध्येच सेवा नियमावली निश्चित केली होती. उच्च न्यायालयाने किंवा शासनाने निर्णयात बदल केलेला नाही. आरोग्य वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय संचालक दोन्ही पदे एकच अर्हता धारण करतात. डॉ.रॉय हे डॉ.साळवे यांच्यापेक्षा सिनिअर असल्यामुळे ते या पदासाठी पात्र ठरतात. बाकी निर्णय मा.सभागृहाने घ्यायचा आहे.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, वास्तविक पाहता, विषय तहकूब करायचा आहे. आयुक्त साहेबांनी न विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिल्यामुळे आयुक्त साहेबांनी माझ्या प्रश्नाला उत्तर द्यावे अशी माझी इच्छा आहे. प्रशासनाने डॉ.अय्यर यांचा विषय सभागृहासमोर आणला होता. त्यांना टर्नडाऊन करुन डॉ.नागकुमार यांना पदोन्नती दिली होती. शासनाने सेक्शन ४५ नुसार मान्यता देत असताना रुल्स् चा उल्लेख केला नाही. कोर्टाने सुद्धा केला नाही. मग याचा अर्थ असा समजायचा का की, आयुक्तांनी प्रशासनाने ठेवलेला विषय हा नंतर टर्नडाऊन करु शकतो. मग डॉ.अय्यर यांचा विषय सभागृहाने कसा ठेवला होता**?** याचे उत्तर आपण द्यावे.

**मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त)** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, मी जी माहिती, आकडेवारी सांगितली आहे ती नस्तीतील कागदपत्रांच्या आधारे सांगितली आहे. दि.१८/९/२००० रोजी आयुक्तांचा प्रस्ताव होता. वैद्यकीय अधिकारी म्हणून डॉ.अय्यर यांची पदोन्नतीने नेमणूक करण्यासाठी मा.विधी समितीमार्फत मा.महापालिका सभेसमोर शिफारस करण्यासाठी मा. विधी समिती समोर निर्णयार्थ ठेवावे. त्याप्रमाणे घटनाक्रम समोर ठेवला आहे. त्यात कुठेही तफावत केलेली नाही.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण जेवढे अभ्यासपूर्वक बोलता, तसे इतर सदस्य देखील अभ्यासपूर्वक बोलायचा प्रयत्न करत असतात. त्यावेळचे प्रशासनाचे मत, आयुक्तांचे मत, त्यात सेवाप्रवेश नियमावलीमध्ये डिपीएच झाल्यानंतरची ५ वर्षे असे कुठे आहे का**?** प्रशासनाने अशा पद्धतीने विषय ठेवल्यानंतर मा.सभागृहाने आपल्या मान्यतेने त्यात बदल केला. डॉ.अय्यर यांच्याऐवजी डॉ.नागकुमार यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी का केले. ते ५ वर्षे आधी डिपीएच झाले होते म्हणून तो टर्न केला अशी आमची धारणा आहे. आपण एवढी कुंडली वाचून दाखवली. मागासवर्गीयांना कसा न्याय दिला. हे कसे झाले. हा सर्व अभ्यास करण्यासाठी आम्हाला सुद्धा वेळ पाहिजे. पुढील वेळी सभागृहामध्ये या विषयावर अधिक चर्चा होणार नाही, निर्णय होईल. हा विषय तहकूब ठेवण्यात यावा.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ४०१ विषय क्रमांक - ६
दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/८१२/२०१३, दि.२१/०६/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.३७ दि.०६/०९/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.३६२ दि.२०/९/२०१३

विषय क्रमांक ६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत येत आहे.

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.शुभांगी बो-हाडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ७

दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/ ५५६/२०१३, दि.०२/०८/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.४१ दि.०६/०९/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.३६३ दि.२०/९/२०१३

औंध-रावेत बी.आर.टी.एस. रस्त्यावरील वाय जंक्शन येथे अंडरपास बांधणेचे कामास व याकामी येणा-या र.रु.१३,४२,२१,६९०/-च्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.पौर्णिमा सोनवणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.अरुणा भालेकर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, प्रलंबित असलेल्या बीआरटी रस्त्यावरील अंडरपास बांधण्याच्या कामासाठी आयुक्त साहेब व भदाणे मॅडम यांनी मिलिटरी यांच्याकडे ७ १/२ कोटी रुपये दिले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करते. या रस्त्याचे काम लवकरात लवकर चालू करावे.

**मा.आर.एस. कुमार** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो –

प्रभाग क्र.१४, वाहतुकनगरीमध्ये मुख्य रस्ता कॉंक्रीट करणे या विषयांकीत कामास मनपाच्या सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य विशेष योजनाअंतर्गत र.रु.२,००,००,०००/- (र.रु.दोन कोटी) चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. तथापि सदरची प्रशासकीय मान्यता ढोबळ मानाने (टोकन) पद्धतीने गृहीत धरणेत आलेली होती. सदर कामाचे Pavement Quality Concrete,Storm water design पद्धतीने तपशिलवार अंदाजपत्रक सल्लागारामार्फत केले असता विषयांकीत कामास र.रु.७.७७ कोटी (र.रु.सात कोटी सत्याहत्तर लाख) खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामाची तातडीने निविदा काढणेचे दृष्टीने, सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.७.७७ कोटी रकमेचे खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता तसेच प्रभाग क्र.१४ वाहतूकनगरी मधील पार्कींग प्लॉट मध्ये सुधारणा करणे या विषयांकीत कामास मा.सर्वसाधारण सभा दि.१९/०५/२०१२ ठराव क्र.४ अन्वये, र.रु.२,५०,००,०००/- (र.रु. दोन कोटी पन्नास लाख फक्त) प्रशासकीय खर्चास मंजुरी मिळालेली आहे. सदर रक्कम ढोबळ मानाने (टोकन) गृहीत धरुन सन २०१२-१३ व २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात समाविष्ट केलेली आहे. तथापि तेथे जड वाहनासाठी Pavement Quality Concrete पद्धतीने काम करणे आवश्यक असलेने, त्यानुसार सदर कालावधीसाठी तपशिलवार अंदाजपत्रक तयार केलेले आहे. त्यानुसार विषयांकीत कामासाठी र.रु.४.८५ कोटी रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत यावी व सदर कामाचा स्थापत्य विषयक योजनांतर्गत समावेश करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.शुभांगी बो-हाडे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ४०२ विषय क्रमांक - ७
दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/ ५५६/२०१३, दि.०२/०८/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.४१ दि.०६/०९/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.३६३ दि.२०/९/२०१३

औंध-रावेत बी.आर.टी.एस. रस्त्यावरील वाय जंक्शन येथे अंडरपास बांधणेचे कामास व याकामी येणा-या र.रु.१३,४२,२१,६९०/-च्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच प्रभाग क्र.१४, वाहतुकनगरीमध्ये मुख्य रस्ता कॉंक्रीट करणे या विषयांकीत कामास मनपाच्या सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य विशेष योजनाअंतर्गत र.रु.२,००,००,०००/- (र.रु.दोन कोटी) चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. तथापि सदरची प्रशासकीय मान्यता ढोबळ मानाने (टोकन) पद्धतीने गृहीत धरणेत आलेली होती. सदर कामाचे Pavement Quality Concrete,Storm water design पद्धतीने तपशिलवार अंदाजपत्रक सल्लागारामार्फत केले असता विषयांकीत कामास र.रु.७.७७ कोटी (र.रु.सात कोटी सत्याहत्तर लाख) खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामाची तातडीने निविदा काढणेचे दृष्टीने, सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.७.७७ कोटी रकमेचे खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता तसेच प्रभाग क्र.१४ वाहतूकनगरी मधील पार्कींग प्लॉट मध्ये सुधारणा करणे या विषयांकीत कामास मा.सर्वसाधारण सभा दि.१९/०५/२०१२ ठराव क्र.४ अन्वये, र.रु.२,५०,००,०००/- (र.रु. दोन कोटी पन्नास लाख फक्त) प्रशासकीय खर्चास मंजुरी मिळालेली आहे. सदर रक्कम ढोबळ मानाने (टोकन) गृहीत धरुन सन २०१२-१३ व २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात समाविष्ट केलेली आहे. तथापि तेथे जड वाहनासाठी Pavement Quality Concrete पद्धतीने काम करणे आवश्यक असलेने, त्यानुसार सदर कालावधीसाठी तपशिलवार अंदाजपत्रक तयार केलेले आहे. त्यानुसार विषयांकीत कामासाठी र.रु.४.८५ कोटी रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत यावी व सदर कामाचा स्थापत्य विषयक योजनांतर्गत समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ८
दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. आ.मु.का./३/कावि/५११/ २०१३, दि.२०/०७/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.४२ दि.०६/०९/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.३६४ दि.२०/९/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील हॉटेल/कॅन्टींन व अन्य खाद्यपदार्थ उत्पादन/विक्री करणा-या व्यवसायांना त्यांचे व्यवसायातून दैनंदिन निर्माण होणारे फुडवेस्ट गोळा करणे व वाहतूक करुन कचरा डेपो येथे विल्हेवाट लावणे कामासाठी सध्या आकारणेत येणा-या शुल्कामध्ये परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केलेप्रमाणे हॉटेल/कॅन्टीन वेस्ट गोळा करणे सेवेसाठी आकारणेत येणा-या शुल्कामध्ये वाढ करणे तसेच मंगल कार्यालये, मॉल, स्वीट मार्ट, हॉल, सभागृह, बेकरी व्यवसायांना प्रपत्र "ब" प्रमाणे वाढ करणेस तसेच परिशिष्ट "ब" मधील अ.क्र.२ मध्ये मॉलमधील हॉटेलसाठी स्वतंत्रपणे सेवाशुल्क आकारणेस, तसेच परिशिष्ट "ब" मध्ये मॉलची संख्या २ नमुद केली आहे, त्याऐवजी "मनपा कार्यक्षेत्रातील सद्यस्थितीत मॉलची यादी" प्रमाणे एकूण १० मॉल चालू आहेत. तरी विषयपत्रात १० मॉल गृहित धरुन त्यास, त्याचप्रमाणे मनपा क्षेत्रात यापुढे नव्याने चालू होणारे व्यवसायासाठी सदरचे दर लागू करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**परिशिष्ट " अ "**

| अ.क्र. | हॉटेलचा दर्जा | हॉटेलची संख्या | सध्याचे सेवाशुल्क (वार्षिक) र.रु. | वाढ केल्यानुसार नविन सेवाशुल्क (वार्षिक दर) र.रु. | मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | " अ " | २०६ | ३,०००/- | ८,०००/- | १६,४८,०००/- |
| २ | " ब " | १३१ | २,०००/- | ६,०००/- | ७,८६,०००/- |
| ३ | " क " | ३८१ | १,०००/- | ४,०००/- | १५,२४,०००/- |
| ४ | " ड" | ५३९ | ---- | ३,०००/- | १६,१७,०००/- |
| | **एकूण** | **१२५७** | **----** | **----** | **५५,७५,०००/-** |

**परिशिष्ट " ब "**

| अ.क्र. | दर्जा | संख्या | आकारावयाचे वार्षिक सेवाशुल्क र.रु. | मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | मंगल कार्यालये | ४९ | १०,०००/- | ४,९०,०००/- |
| २ | शॉपिंग मॉल, मेगा मार्ट | ०२ | १५,०००/- | ३०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | फाईव्हस्टार, थ्रीस्टार रिसोर्टस् | ०७ | १२,०००/- | ८४,०००/- |
| ४ | हॉल | ०१ | ५,०००/- | ५,०००/- |
| ५ | सभागृह | ०१ | ५,०००/- | ५,०००/- |
| | **एकूण** | **६०** | **-----** | **६,१४,०००/-** |

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सद्यस्थितीतील मॉलची यादी

| अ.क्र. | प्रभाग कार्यालय | मॉलचे नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| १ | "अ" प्रभाग | स्टार बझार | काळभोरनगर, मुंबई-पुणे रोड |
| | | डी मार्ट | प्राधिकरण, डी.वाय.पाटील, रावेत रोड |
| २ | "ब" प्रभाग | बिग बझार | चिंचवड, मुंबई-पुणे रोड, बीग सिनेमाखाली |
| | | डी मार्ट | चिंचवड, मुंबई-पुणे रोड |
| | | मोअर फॉर यु | मोरवाडी |
| ३ | "क" प्रभाग | मेगा मार्ट | फुगेवाडी, मुंबई-पुणे रोड |
| ४ | "ड" प्रभाग | डी मार्ट | थेरगाव (काळेवाडी) |
| | | मोअर फॉर यु | पिंपरीगांव |
| | | मोअर फॉर यु | विशालनगर, जगताप डेअरी |
| | | मोअर फॉर यु | शिवार चौक, पिंपळे सौदागर |

**मा.सुमन नेटके –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय ९ महिन्यांपूर्वी आला होता. तुम्ही त्यावेळी नव्हता. या विषयावर बरीच चर्चा झाली आहे. आमचे सहकारी मा.प्रशांत शितोळे, मा.महेश लांडगे यांनी या विषयावर चर्चा केली होती. त्याप्रमाणे हा विषय तहकूब ठेवण्यात आला होता. तुमच्या निदर्शनास आणून दिले होते की, या संदर्भातील शहरात गोळा होत असलेला हॉटेल वेस्ट यासंदर्भातील विषयात ज्या पद्धतीने सेवाशुल्कात वाढ केलेली आहे. याठिकाणी आपल्याला मला सांगायचे आहे की, शहरात बरीचशी ऑफिसेस आहेत. सर्व रजिस्टर्ड आहेत अशातला भाग नाही. सकाळी हॉटेल वेस्ट गोळा करण्यासाठी जो ट्रक येतो त्याची परिस्थिती इतकी वाईट असते की त्यामुळे आजूबाजूच्या परिसरात दुर्गंधी पसरते. अपघात होण्याची शक्यता असते म्हणून हा विषय तुमच्या निदर्शनास मुद्दाम आणून देतोय. दरवेळी चर्चा केल्यानंतरही या परिस्थितीमध्ये अजिबात सुधारणा झालेली नाही. शहरात हॉटेल व्यवसाय करणा-यांना टार्गेट करायचे. त्यांचीच फक्त चूक आहे का. फूड लायसन नाही त्यांच्याकडून शुल्क गोळा केले पाहीजे. रस्त्यारस्त्यांत चायनीज गाड्या उभ्या असतात. भाजी मंडईमध्ये लोक व्यवसाय करतात. मोठ्या प्रमाणात कचरा गोळा करत असतो. त्यांच्याकडून शुल्क आकारतो का? आरोग्य अधिका-यांचे म्हणणे आहे, शंभर टक्के वेस्ट गोळा करतो. माझे म्हणणे आहे, चौकाचौकात चायनीज गाड्या, पावभाजीच्या गाड्या आहेत. ते दिवसभर धंदा करतात व संध्याकाळी कचरा तिथेच टाकून निघून जातात. फूटपाथवरील हातगाडीवाले

यांच्यासाठी नियम केले आहेत. त्यांच्याकडून शुल्क गोळा करतात का? कितीतरी रस्त्यांवर कलिंगड खाणारे, वडापाव, पाणीपुरी खाणारे असतात म्हणून मी विनंती करतो की, जे शुल्क लावणार आहात त्यात सुधारणा करणे गरजेचे आहे. हॉटेल व्यावसायिकांपेक्षा मंगल कार्यालयांतून कितीतरी पटीने कचरा टाकला जातो. मी पुन्हा विनंती करतो की, शुल्क वाढवले तरी त्याला उपसूचना राहणार आहे. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील हॉटेल/कॅन्टीन व अन्य खाद्यपदार्थ उत्पादन/विक्री करणा-या व्यवसायांना त्यांचे व्यवसायातून दैनंदिन निर्माण होणारे फुडवेस्ट गोळा करणे व वाहतूक करुन कचरा डेपो येथे विल्हेवाट लावणे कामासाठी सध्या आकारण्यात येणा-या शुल्कामध्ये परिशिष्ट अ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेप्रमाणे सुधारीत दरवाढ करण्यास मान्यता देणेत यावी.

**परिशिष्ट " अ "**

| अ.क्र. | हॉटेलचा दर्जा | सध्याचे सेवाशुल्क (वार्षिक) | वाढ केल्यानुसार नविन सेवाशुल्क (वार्षिक) | सुधारीत सेवाशुल्क (वार्षिक) |
|---|---|---|---|---|
| १ | " अ " | ३,०००/- | ८,०००/- | ४,०००/- |
| २ | " ब " | २,०००/- | ६,०००/- | ३,०००/- |
| ३ | " क " | १,०००/- | ४,०००/- | २,०००/- |
| ४ | " ड" | ---- | ---- | १,५००/- |

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.जावेद शेख** – मा.उल्हास शेट्टी यांनी जी उपसूचना मांडली, त्याबद्दल दुमत नाही. आपण कॉंट्रॅक्ट देतोय. त्यांच्याकडून कचरा जमा करण्यासाठी गाड्या उपलब्ध आहेत. या गाड्या आधुनिक पद्धतीच्या असाव्यात. याचा गांभिर्याने विचार करावा. तुमच्या निदर्शनास काही गोष्टी आणून देऊ इच्छितो, चायनीज गाड्या किंवा वडापाववाले यांचा संध्याकाळचा धंदा असतो. दोन शिफ्टमध्ये असो, सगळ्यांचा कचरा सकाळीच गोळा केला जातो. मग कचरा इथे टाका, तिथे टाका असे प्रकार घडतात. चिकन, मटणाची दुकाने असो, त्यांच्याकडून देखील कचरा संध्याकाळच्या वेळी टाकला जातो. चौकात, वाहत्या पाण्यात कचरा टाकला जातो. त्याचा वास आजूबाजूला सगळीकडे पसरतो. या दुकानदारांचा कचरा उचलतात. मग त्यांच्याकडून देखील शुल्क वसूल करावे. यासाठी आधुनिक पद्धतीच्या गाड्या असाव्यात. जेणेकरुन कचरा डंपिंग करण्यासाठी गाड्या असतात त्याप्रमाणे कचरा उचलण्यासाठी गाड्या असाव्यात. परदेशात ज्या पद्धतीने कचरा उचलला जातो, चिकन/मटणाचा वेस्ट देखील अशाच पद्धतीने उचलला जावा अशी सूचना करतो.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, शहरात ज्या नॉनवेज टप-या आहेत, त्यांना शुल्क आकारणार आहात का? त्यांना लायसन देत नाही, परमिशन देत नाही. टप-या काढत नाही. त्यांना स्वच्छतेसाठी सांगितले तर खरोखर अशी परिस्थिती आहे की, चिकन/मटणाची मांसाहार विक्री करणारी दुकाने सगळा कचरा रात्री कचराकुंड्यांमध्ये टाकतात. त्यामुळे दुर्गंधी पसरते, रोगराई होते. यामुळे मांसाहार विक्री करणा-या टप-यांवर देखील शुल्क आकारु शकतो का?

**मा.चव्हाण (आरोग्य अधिकारी)** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, मा.प्रशांत शितोळे यांनी सूचविल्याप्रमाणे सभागृहाने मान्यता दिल्यास शहरातील मांस विक्री करणा-या टप-यांवर शुल्क आकारु शकतो. तसेच २ शिफ्टमध्ये कचरा गोळा करता येईल.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो –

"ड" दर्जामध्ये शहरामध्ये मांसविक्री (करणारे) प्रकारचे सर्व टप-या, हातगाड्या, मांसविक्री (मांसाहारी) हॉटेल, हातगाडी, पथारीवाले, स्टॉलधारक, मांसाहारी अन्नाची विक्री करणारे सर्व प्रकारचे किरकोळ विक्रेते यांचा समावेश करावा. तसेच "ड" दर्जातील व्यावसायिकांना कच-याची विल्हेवाट न लावल्यास प्रति दिन रु.५००/- पर्यंत दंड आकारणेत यावा. मनपाकडे नोंद, परवाना नसलेले सर्वांचा समावेश असावा. तसेच परिशिष्ठ ब अ.क्र. २ मधील मॉलमधील हॉटेलसाठी स्वतंत्रपणे सेवाशुल्क आकारणेस त्याचप्रमाणे मनपा क्षेत्रात यापुढे नव्याने चालू होणारे व्यवसायासाठी मूळ विषयामध्ये नमूद केलेलेच दर लागू करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.शत्रुघ्न काटे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ४०३ | विषय क्रमांक - ८ |
| दिनांक - २१/११/२०१३ | विभाग - मा.आयुक्त |

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. आ.मु.का./३/कावि/५११/२०१३, दि.२०/०७/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.४२ दि.०६/०९/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.३६४ दि.२०/९/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील हॉटेल/कॅन्टींन व अन्य खाद्यपदार्थ उत्पादन/विक्री करणा-या व्यवसायांना त्यांचे व्यवसायातून दैनंदिन निर्माण होणारे फुडवेस्ट गोळा करणे व वाहतूक करुन कचरा डेपो येथे विल्हेवाट लावणे कामासाठी सध्या आकारणेत येणा-या शुल्कामध्ये परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केलेप्रमाणे हॉटेल/कॅन्टीन वेस्ट गोळा करणे सेवेसाठी आकारणेत येणा-या शुल्कामध्ये वाढ करणे तसेच मंगल कार्यालये, मॉल, स्वीट मार्ट, हॉल, सभागृह, बेकरी व्यवसायांना प्रपत्र "ब" प्रमाणे वाढ करणेस तसेच परिशिष्ट "ब" मधील अ.क्र.२ मध्ये मॉलमधील हॉटेलसाठी स्वतंत्रपणे सेवाशुल्क आकारणेस, तसेच परिशिष्ट "ब"

मध्ये मॉलची संख्या २ नमुद केली आहे, त्याऐवजी "मनपा कार्यक्षेत्रातील सद्यस्थितीत मॉलची यादी" प्रमाणे एकूण १० मॉल चालू आहेत. तरी विषयपत्रात १० मॉल गृहित धरुन त्यास, त्याचप्रमाणे मनपा क्षेत्रात यापुढे नव्याने चालू होणारे व्यवसायासाठी सदरचे दर लागू करणेस मान्यता देणेत येत आहे.

**परिशिष्ट " अ "**

| अ.क्र. | हॉटेलचा दर्जा | हॉटेलची संख्या | सध्याचे सेवाशुल्क (वार्षिक) र.रु. | वाढ केल्यानुसार नविन सेवाशुल्क (वार्षिक दर) र.रु. | मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | " अ " | २०६ | ३,०००/- | ८,०००/- | १६,४८,०००/- |
| २ | " ब " | १३१ | २,०००/- | ६,०००/- | ७,८६,०००/- |
| ३ | " क " | ३८१ | १,०००/- | ४,०००/- | १५,२४,०००/- |
| ४ | " ड" | ५३९ | ---- | ३,०००/- | १६,१७,०००/- |
| | **एकूण** | **१२५७** | **----** | **----** | **५५,७५,०००/-** |

**परिशिष्ट " ब "**

| अ.क्र. | दर्जा | संख्या | आकारावयाचे वार्षिक सेवाशुल्क र.रु. | मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | मंगल कार्यालये | ४९ | १०,०००/- | ४,९०,०००/- |
| २ | शॉपिंग मॉल, मेगा मार्ट | ०२ | १५,०००/- | ३०,०००/- |
| ३ | फाईव्हस्टार, थ्रीस्टार रिसोर्टस् | ०७ | १२,०००/- | ८४,०००/- |
| ४ | हॉल | ०१ | ५,०००/- | ५,०००/- |
| ५ | सभागृह | ०१ | ५,०००/- | ५,०००/- |
| | **एकूण** | **६०** | **-----** | **६,१४,०००/-** |

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सद्यस्थितीतील मॉलची यादी

| अ.क्र. | प्रभाग कार्यालय | मॉलचे नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| १ | "अ" प्रभाग | स्टार बझार | काळभोरनगर, मुंबई-पुणे रोड |
| | | डी मार्ट | प्राधिकरण, डी.वाय.पाटील, रावेत रोड |
| २ | "ब" प्रभाग | बिग बझार | चिंचवड, मुंबई-पुणे रोड, बीग सिनेमाखाली |
| | | डी मार्ट | चिंचवड, मुंबई-पुणे रोड |
| | | मोअर फॉर यु | मोरवाडी |
| ३ | "क" प्रभाग | मेगा मार्ट | फुगेवाडी, मुंबई-पुणे रोड |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | "ड" प्रभाग | डी मार्ट | थेरगाव (काळेवाडी) |
| | | मोअर फॉर यु | पिंपरीगांव |
| | | मोअर फॉर यु | विशालनगर, जगताप डेअरी |
| | | मोअर फॉर यु | शिवार चौक, पिंपळे सौदागर |

वरिलप्रमाणे मा.महापालिका आयुक्त यांची मागणी असली तरी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील हॉटेल/कॅन्टीन व अन्य खाद्यपदार्थ उत्पादन/विक्री करणा-या व्यवसायांना त्यांचे व्यवसायातून दैनंदिन निर्माण होणारे फुडवेस्ट गोळा करणे व वाहतूक करुन कचरा डेपो येथे विल्हेवाट लावणे कामासाठी सध्या आकारण्यात येणा-या शुल्कामध्ये परिशिष्ट अ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेप्रमाणे सुधारीत दरवाढ करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**परिशिष्ट " अ "**

| अ.क्र. | हॉटेलचा दर्जा | सध्याचे सेवाशुल्क (वार्षिक) | वाढ केल्यानुसार नविन सेवाशुल्क (वार्षिक) | सुधारीत सेवाशुल्क (वार्षिक) |
|---|---|---|---|---|
| १ | " अ " | ३,०००/- | ८,०००/- | ४,०००/- |
| २ | " ब " | २,०००/- | ६,०००/- | ३,०००/- |
| ३ | " क " | १,०००/- | ४,०००/- | २,०००/- |
| ४ | " ड" | ---- | ---- | १,५००/- |

"ड" दर्जामध्ये शहरामध्ये मांसविक्री (करणारे) प्रकारचे सर्व टप-या, हातगाड्या, मांसविक्री (मांसाहारी) हॉटेल, हातगाडी, पथारीवाले, स्टॉलधारक, मांसाहारी अन्नाची विक्री करणारे सर्व प्रकारचे किरकोळ विक्रेते यांचा समावेश करावा. तसेच "ड" दर्जातील व्यावसायिकांना कच-याची विल्हेवाट न लावल्यास प्रति दिन रु.५००/- पर्यंत दंड आकारणेत यावा. मनपाकडे नोंद परवाना नसलेले सर्वांचा समावेश असावा. तसेच परिशिष्ठ ब अ.क्र. २ मधील मॉलमधील हॉटेलसाठी स्वतंत्रपणे सेवाशुल्क आकारणेस त्याचप्रमाणे मनपा क्षेत्रात यापुढे नव्याने चालू होणारे व्यवसायासाठी मूळ विषयामध्ये नमूद केलेलेच दर लागू करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.स्वाती साने** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४०४ विषय क्रमांक - ९

दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.किरण मोटे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.८७ दि.२७/०९/२०१३

सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात स्थापत्य उद्यान यामधील खालील नमुद स्थापत्य उद्यान विषयक कामांना मूळ अंदाजपत्रकात तरतुद उपलब्ध आहे. तथापि या कामाचे सल्लागार यांचेकडून विषयांकित उद्यान विकसित करणेच्या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असता सांगवी आरक्षण क्र.३१६ उद्यान विकसित करणे या कामाकरीता अंदाजे र.रु.५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. तरी यापूर्वी टप्पा क्र.१ मध्ये या उद्यानास सिमाभिंत बांधणे व सदर उद्यानाचे स्थापत्य विषयक विकास कामे करणे याकरिता निविदा कार्यवाही चालू आहे. तरी या कामाकरिता उर्वरित टप्पा २ मधील सदर उद्यान विकासित करणेकरिता आवश्यक असलेली अंदाजपत्रकीय र.रु.३ कोटीचे खर्चास मा.महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. आरक्षण क्र.३१६ उद्यान विकसित करणेसाठी खाजगी जागा मालकाकडून १०० टक्के जागेचा ताबा मनपाकडे आलेला आहे. तरी उद्यान विकसित करणेसाठी आवश्यक असलेली अंदाजपत्रकीय रक्कम रु.३ कोटीच्या अंदाजपत्रकीय रकमेस मान्यता मिळणेसाठी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | **प्रभाग** क्र. | पान क्र. | अ. क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१२-१३ ची सुधारित तरतूद | सन २०१३-१४ ची मुळ तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सांगवी येथील मधुबन सोसायटी आरक्षण क्र. ३१६ सर्वे नं.२६ ब येथे उद्यान विकसित करणे. | ५९ | ४६९ | १६२ | ३००००००० /- | ----- | ५००००००० /- |

**मा.पौर्णिमा सोनवणे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.नारायण बहिरवाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपरी चिंचवड शहर हे अतिशय चांगल्या पद्धतीने विकसित होत असलेले शहर आहे. शहराचा विकास देखील अतिशय रचनात्मक दृष्ट्या, छानपैकी झाला आहे. आपल्याला बेस्ट सिटी हा अवॉर्ड सुद्धा मिळाला आहे. शहरातील रस्ते असतील, पूल असतील अतिशय चांगल्या पद्धतीने विकसित झाले आहेत. यात स्थापत्य विभागाचा वाटा मोठ्या प्रमाणात आहे. त्याचबरोबर आपल्या शहरात उद्यानांची संख्यादेखील भरपूर आहे. जवळपास १०० उद्याने शहरात आहेत. ती देखील अतिशय चांगल्या पद्धतीने विकसित झालेली आहेत. दुर्गा टेकडी, गणेश तलाव, बर्ड व्हॅली, केजूदेवी असेल १०० पेक्षा अधिक उद्याने स्थापत्य विभागाने विकसित केली आहेत. आपण आल्यानंतर उद्यान

स्थापत्य व त्याचबरोबर अस्तित्वात असलेले क्रिडा स्थापत्य हे दोन विभाग बंद केले आहेत. त्याचा कार्यभार स्थापत्य विभागाकडे दिला आहे. त्यामुळे उद्यानांची अवस्था फार वाईट झालेली आहे. खाजगी ठेकेदारांना उद्याने चालवायला दिली आहेत. ते उद्यानांची देखभाल करतात. मात्र दुरुस्ती करत नाहीत. स्थापत्य विभागाकडे कामाचा लोड भरपूर आहे. माझ्या प्रभागात श्री.सय्यद कार्यकारी अभियंता उद्यान स्थापत्य, क्रिडा स्थापत्य विषयी काम सांगितले तर ते मला उत्तर देतात, माझ्याकडे अनधिकृत बांधकामे पाडायचे काम आहे. कामाचा लोड खूप आहे. त्यामुळे मला हे काम वेळेवर पूर्ण करता येणार नाही. उद्याने चांगल्या पद्धतीने विकसीत झाली आहेत. परंतू त्यांचा मेंटनन्स देखील झाला पाहीजे म्हणून हा विषय मांडतो आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, उद्यान स्थापत्य हा विभाग पुन्हा चालू करावा. त्यासोबत क्रिडा स्थापत्य हा विभाग सुद्धा चालू करावा. शहरात अनेक मैदाने आहेत. कुठे कंपाऊंड तुटते. माती उचलली जाते. उद्यानांत कुंड्या असतात. क्रिटीकल स्थितीतील खूप कामे आहेत. क्रिडा स्थापत्य विभागामुळे ही कामे होत होती. उदा. शाहूनगरमधील कंपाऊंडचे काम अपूर्ण झाले आहे. स्थापत्य मध्ये तरतूद देखील आहे. ही तरतूद असताना देखील कोणतेही काम होत नाही. आम्हाला उत्तर मिळते, हा विभाग बंद झाला आहे. आपल्याला विनंती आहे की, उद्यान स्थापत्य व क्रिडा स्थापत्य या विभागांना कार्यकारी अभियंता, डेप्युटी इंजिनिअर नाहीत. हे विभाग पुन्हा चालू करावेत अशी विनंती करतो.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर शहरात चांगल्या प्रकारची उद्याने आहेत. गेल्या अनेक अंदाजपत्रकांच्या बैठकीत मी विनंती केली होती, मागणी केली होती, शहरातील उद्यानांना शहर अभियंता यांनी भेट द्यावी. यासाठी एक पिंपरी चिंचवड दर्शन बस चालू करावी. भोसरी पर्यटन स्थळ येथे चांगले उद्यान आहे. रावेत, सांगवीवाल्यांना ते माहित नसेल. दूर्गादेवी टेकडी चांगली विकसित केली आहे. शहरात १०० उद्याने आहेत. मा.नारायण बहिरवाडे यांनी आत्ता उल्लेख केला आहे. एमआयडीसीने जागा घेऊन त्यांनी अतिशय सुंदर उद्यान बांधले आहे. हे सगळे सांगण्यामागे हेतू एकच आहे, उद्यानांच्या देखभाल दुरुस्तीबाबत जी निविदा काढली आहे, ती ३० ते ४० टक्के कमी दराने केली आहे. त्यापेक्षा कमी दराने निविदा केलीतर जी संस्था, जी व्यक्ती ही निविदा घेते, ती ते काम पूर्ण करु शकत नाही. असे माझे ठामपणे म्हणणे आहे. अनेक वेळा मागणी केलीतरी माझ्या परिसरात २ चांगल्या प्रकारची उद्याने केली आहेत. केजूदेवी उद्यान मंडळाला चालवायला दिले आहे. नागरीक संध्याकाळी या उद्यानात येतात. तिथे संध्याकाळी दारू पिणा-यांची संख्या वाढते. रोज सकाळी बाटल्या पडलेल्या मिळतात. तिथे सुरक्षा व्यवस्था दिसत नाही. प्रामुख्याने संध्याकाळी गैरप्रकार चालतात. आपण अतिशय चांगल्या प्रकारे खर्च करुन शहरातील एक अतिशय चांगले उद्यान केले. प्रामुख्याने एखाद्या चांगल्या संस्थेला या उद्यानाचे काम दिलेतर त्यांच्याकडून चांगल्या प्रकारे देखरेख केली जाईल. नवीन उद्यान करताना प्रत्येक उद्यानात जागा पाहून जॉगिंग ट्रॅक करावा. कन्सल्टंट यांना त्या पद्धतीने करण्यास सांगावे. सकाळी चालणा-यांची संख्या मोठ्या प्रमाणात रहिवासी भागात असते. प्रत्येक नागरीक दूर्गा देवी टेकडीवर चालण्यासाठी येऊ शकणार नाही. जॉगींग ट्रॅक करावा. विरंगुळा केंद्र, ध्यान केंद्र ब-याच उद्यानांमध्ये आहेत. योगासनांसाठी फ्रिमध्ये जागा मिळावी. शुल्क घेऊ नये. आपले स्थानिक

नागरीक, ज्येष्ठ नागरीक ही केंद्रे चालवतात. आपल्या भरारी पथकाने हि केंद्रे बंद केली. का तर आयुक्त साहेबांचा आदेश आहे. तिथे गैरप्रकार होत असतील तर ते टाळावेत म्हणून. नागरीक योगसने करण्यासाठी, आरोग्यासाठी, स्वास्थ्यासाठी या केंद्रांचा उपयोग करत असतीलतर निश्चितपणे त्यांना परवानगी देण्यात यावी. असा प्रकारच्या सूचना भरारी पथकाला देण्यात याव्यात. सकाळी ८ वा. ची वेळ असेल तर तशा प्रकारच्या सूचना द्याव्यात. आपण वेगळे काही करतो. जेणेकरुन शहरातील नागरीक तिथे आकर्षित होतील. जेणेकरुन शहरात उद्याने झालीतर त्यापेक्षा वेगळे काही असेल का. वेगळे काहीतरी करा. मा.प्रशांत शितोळे यांच्या वॉर्डात सुद्धा वेगळ्या पद्धतीचे उद्यान केले आहे. बोटक्लब आहे. भोसरी पर्यटन स्थळ आहे. नाविण्यपूर्ण आहे. खरेतर तुमच्याकडे किती कोटी आहेत, यापेक्षा शहरात काही वेगळे आहे का? याचा देखील आढावा तिथे असावा. मी केलेल्या सूचनांचे पालन करावे.

**मा.यमुनाताई पवार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, इतके उद्यानांचे कार्यक्रम चालू आहेत. इतका खर्च करतोय. पण माझ्या प्रभागाला त्यापासून वंचित का ठेवले आहे. मी ग्रामिण भागातली बाई आहे. पहिल्यांदा निवडून आले. माझ्या भागातील नागरीकांना इतका त्रास होतो आहे. कोणत्याही सुविधा नाहीत. नागरीकांवर एवढा टॅक्स बसवला आहे. रस्ते बघा, टाक्या भरतात का. आयुक्त साहेबांना सुद्धा सांगितले होते. त्यांना माझ्या भागाचा उल्लेख काही केला नाही. १६/१७ गावांचा टॅक्स माफ केला तसा ताथवडे गावाचा का केला नाही. आम्ही फक्त हायवेला येऊन हवेशीर राहतो. आम्ही नागरीकांना किती दिवस असेच ठेवायचे. नागरीकांना काय तोंड दाखवायचे याची माहिती द्या.

**मा.अतुल शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सांगवी भागातील लोक मिलिटरी हद्दीत वॉकींगसाठी जातात. कधी कधी त्यांचे गेट सकाळी ७ वा. उघडतात. सांगवीकरांना वॉकींगसाठी मोठी जागा नाही. उद्यानांमध्ये वॉकींग ट्रॅक करुन घेतला आहे. सांगवीत ९७ साली थोपटे नावाच्या व्यक्तीचा वॉकींगसाठी गेल्यावर अक्सिडंट होऊन जीव गेला. ते पीडीसीसी बँकेत कामाला होते. राजू सावंत यांचा अक्सिडंट विद्यापीठात फिरायला जाताना झाला. असे भावी काळात होऊ नये म्हणून विषय मंजूर करावा अशी माझ्यावतीने व सांगवीकरांच्या वतीने कळकळीची विनंती आहे.

**मा.विलास नांदगुडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय मंजूर करावा अशी विनंती आहे. या विषयाच्या अनुषंगाने आयुक्त साहेबांना विनंती करायची आहे की, पिंपळे निलखचा प्रश्न ज्या-ज्या वेळी घेऊन आलो, जे काही प्रश्न असतील ते संपूर्ण नियमांत आहेत. गार्डनची जागा शंभर टक्के ताब्यात असताना बजेट मिटींगमध्ये मी त्यावेळी सांगितले होते. लिमिटमध्ये बजेट बसवायचे आहे. त्या परीसरात तरतूद देता येणार नाही. असे मला सांगितले. शंभर टक्के जागा ताब्यात असताना सुद्धा बजेटच्या हेडवर तरतूद नाही. रक्षक सोसायटी पासून पिंपळे निलख रस्त्याला मंजूरी दिली. त्याचे सुद्धा १५ कोटी वर्ग करावेत. पिंपळे निलख ते स्पोर्टस् सिटी यासाठी दोन प्रोजेक्टचे टेंडर झाले होते. ते टेंडर सुद्धा बजेट

नसल्यामुळे थांबवले. अद्यापही त्यावर कारवाई केली नाही. पिंपळे निलख स्मशानभूमीला जाण्यासाठी लष्कराच्या हद्दीतून रस्ता आहे. त्याचे
कॅल्क्युलेशन केल्यानंतर ३ १/२ कोटी वर्ग करायला सांगितले. त्यावेळी सांगितले पैसे कमी आहेत. पैसे कशासाठी खर्च करायचे. तुम्ही सांगा, ज्या पद्धतीने विषय मांडतोय. बजेटमध्ये तरतूद नसताना सुद्धा वेगळ्या हेडखाली तरतूद करुन विषय मंजूर करतो. मग आमच्यावर अन्याय का? पुढील बजेटमध्ये प्रॉपर कामासाठी तरतूद झाली पाहीजे ही विनंती आहे.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शहरात मोठमोठी उद्याने होत असताना आमच्या भागात झोपडपट्टी पुर्नवसित लोकांसाठी ओपन स्पेस होता तिथे मी स्वतःहून गार्डन विकसित केले आहे. त्याचे मेंटेनन्स करण्यासाठी स्थापत्य विभाग तिथे नसल्यामुळे दोन ट्रक पोयटा माती कोणी टाकत नाही. मी याठिकाणी गार्डन विकसित करतोय, पालिका एक पैसा देत नाही. लॉन लावलेले आहेत. उद्यान विभागाचे श्री.गायकवाड यांना किती वेळा सांगितले, १० बाय १० चे बसवावेत. परत ते कच-यातले आणून बसवतात. ठेकेदाराकडून बिले घेतात. मी त्या भागात इतकी वर्षे काम करतोय. ५० फूटांची झाडे झाली आहेत. ५ कोटी १० कोटींची उद्याने करत असताना झोपडपट्टी परिसरातील लोक मोठमोठे ओपन प्लॉट विकसित करु शकत नाही. अति.आयुक्त यांना सुद्धा विनंती आहे की, त्या मंडळांना मोबदला द्यायला सांगा. १०/२० हजारांची पोयटा माती द्यायला सांगा.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, अनेक उद्यानांमध्ये लॉन सुकलेला आहे. झाडांना पाणी मिळत नाही. माझ्या प्रभागात नाना-नानी पार्क आहे. ११०० ज्येष्ठ नागरीक मेंबर आहेत. मी सुद्धा वॉकींगसाठी जातो. रोज माझ्या कानावर जात असते, बघा लॉन कसा आहे? याचे कारण टेंडर ४० टक्के बिले देतो. मग कॉंट्रॅक्टर कसे काम करणार? कमिशनरांना वारंवार विनंती केली, बिलो टेंडर देऊ नका. प्रत्येक उद्यानात एक सिक्युरिटी ठेवायला पाहिजे. मी अनेक वेळा विनंती केली हे. अनेक ठिकाणी लॉन चांगल्या स्थितीत नाहीत. वारंवार विनंती करतो, अति. आयुक्त आपण सुद्धा सरप्राईड व्हिजिट द्या. म्हणजे माहिती पडेल. मी परत विनंती करतो की, टेंडर देताना हे लक्षात घ्या. हे कुठेतरी थांबवावे. कॉंट्रॅक्टरने पैसे कमी केल्यानंतर एकाच पार्टीला ३०/४० गार्डनचे कॉंट्रॅक्ट देऊ नका. तो एकावेळी कशी देखभाल करणार. तुमच्या अधिका-यांनी सरप्राईज व्हिजिट केली पाहीजे. मागे साईट व्हिजिट केली होती, त्याचा रिपोर्ट मागवा. एका दिवसात १० पेक्षा जास्त गार्डनला व्हिजिट करु शकत नाही. याबाबतील आपण लक्ष घालावे.

**मा.झामाबाई बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता मा.नारायण बहिरवाडे यांनी उद्यानाचा विषय मांडला. आपल्या शहरात १०० उद्याने आहेत. महापालिकेने शहरात चांगल्या चांगल्या प्रकारची उद्याने केली आहेत. मला एवढेच सांगायचे आहे, आपण एवढा खर्च करतोय. उद्यानांची अशी दूरावस्था होत असेल, तिथे असलेल्या खेळण्यांची दूरावस्था होत असेल काय उपयोग? आत्ता मा.बारणे यांनी सांगितले, उद्याने मंडळांना चालवायला देतात. पण वॉचमन जर दारू पिऊन पडत असेल, बाटल्या टाकत असेल तर उद्यानांत फिरायला जाणारे लोक असतील ते बाहेरून बघून जाणार. मग उद्यानांची हिच दूरावस्था होणार. उद्यानांमध्ये वॉचमन आहे का,

नाही. तिथे जाणा-यां नागरिकांना त्रास होत असेल तर आपण त्या वॉचमनला पगार कशासाठी देतो? किती उद्यानांमध्ये आपण वॉचमन ठेवला आहे याची माहिती द्यावी.

**मा.अनिता तापकीर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझ्या भागामध्ये गार्डन केली पाहीजे. ज्येष्ठ नागरीकांना बसण्यासाठी खुर्च्या नाहीत. गवत वाढले आहे. त्याची साफसफाई होत नाही. देखभाल व्यवस्था केली जात नाही. उद्यानांसाठी खर्च केला जातो, तो करण्यात यावा अशी सभागृहाला विनंती करते.

**मा.महापौर** – आज अधिकारी नाहीत. माहिती घेऊन सांगतील.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १०वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४०५ विषय क्रमांक - १०
दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.प्रशांत शितोळे,मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.८९ दि.२७/०९/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने मौजे सांगवी येथे प्र.क्र.६० सांगवी गावठाण संगमनगर व परिसरामध्ये रस्ते विकसित करणे, फुटपाथ करणे, जलनि:सारण, विद्युत व पाणी पुरवठा विषयक कामे एकत्रितरित्या करणेबाबत मा.आयुक्त यांनी परवानगी दिली आहे तरी सदर कामाचे अंदाजपत्रकीय र.रु.६.०० कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता घेणेस व चालू आर्थिक वर्षातील तरतूद र.रु.२.०० कोटी या कामासाठी उपलब्ध असून उर्वरित रक्कम पुढील आर्थिक वर्षात खर्ची टाकणेस व सर्व काम एकत्रितरित्या करणेकामी अंदाजपत्रक २०१३ पान क्र.३६९/६ मध्ये सुधारणा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.स्वाती साने** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४०६ विषय क्रमांक - ११
दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.प्रशांत शितोळे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.९१ दि.२७/०९/२०१३

सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात विशेष योजना या लेखाशिर्षातील खालील नमुद स्थापत्य विषयक कामांना मुळ अंदाजपत्रकात तरतूद उपलब्ध आहे. तथापि अंदाजपत्रकीय रकमेस मा.महापालिका सभेची प्रशासकीय मंजूरी मिळणे आवश्यक आहे. पिंपळे सौदागर येथील रक्षक चौकाकडे जाणारा रस्ता संरक्षण विभाग अचानक बंद करु शकते सर्वे नं.५९ ते १२१ पर्यंत संरक्षण हद्दीलगत १८.०० मी. रुंदीच्या डी.पी.रस्त्यासाठी ७० टक्के पेक्षा जास्त जागा ताब्यात आलेली आहे. सदर कामासाठी र.रु.८,७०,००,०००/- च्या अंदाजपत्रकीय रकमेस मा.महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. पिंपळे सौदागर येथील मनपा शाळा ते रक्षक चौकापर्यंतचा अस्तित्वातील २०.०० मी. रुंद डी.पी.रस्ता रुंदीकरण करुन विकसित करणेसाठीच्या र.रु.१,५०,००,०००/- च्या अंदाजपत्रकीय रकमेस मा.महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. तसेच आरक्षण क्र.३७१ ब येथे उद्यान विकसित करणेसाठी खाजगी जागा मालकाकडून ७० टक्के पेक्षा अधिक जागेचा ताबा मनपाकडे आलेला आहे. उद्यान विकसित करणेसाठीच्या ३ कोटीच्या अंदाजपत्रकीय रकमेस मा.महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. स्थापत्य विशेष योजना अंतर्गत प्रभाग क्र.५५ पिंपळे सौदागर येथील खालील नमुद केलेली कामे करणेकरीता अंदाजपत्रकीय रकमेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | प्रभाग क्र. | पान क्र. | अ. क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१२-१३ ची सुधारित तरतूद | सन २०१३-१४ ची मुळ तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | प्रभाग क्र.५५ पिंपळे सौदागर येथील सर्वे नं.५९ ते सर्वे नं.१२१ पर्यंत संरक्षण हद्दीलगत १८.९९ मी. रुंद डी.पी. | ५५ | २८ | ८७ | ८,७०,००,०००/- | ----- | २०,००,०००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रस्ता विकसित करणे. | | | | | | |
| २ | प्रभाग क्र.५५ पिंपळे सौदागर येथे मनपा शाळा ते रक्षक चौकापर्यंतच्या २०.०० मी. रुंद डी.पी. रस्ता विकसित करणे. | ५५ | २८ | ८९ | १,५०,००,०००/- | ----- | २५,००,०००/- |
| ३ | पिंपळे सौदागर आरक्षण क्र.३७१ ब येथे उद्यान विकसित करणे.(५ एकरावर उद्यान विकसित करणे) (भाग २) | ५५ | ४५९ | ३९ | ३,००,००,०००/- | ----- | ५०,००,०००/- |
| | एकूण रक्कम रुपये - | | | | १३,२०,००,०००/- | ----- | ९५,००,०००/- |

**मा.शुभांगी बो-हाडे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १२

दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.प्रशांत शितोळे, मा.नितीन काळजे यांचा प्रस्ताव

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.९२ दि.२७/०९/२०१३

प्रभाग क्र.१३ मधील पिंपळे सौदागर, रहाटणी परिसरातील जुन्या पाईपलाईन काढून नविन पाईप लाईन टाकणेच्या कामाकरिता झालेल्या र.रु.२,३०,४०,०००/-चे खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, या विषयाची आकडेवारी चुकीची आहे. हा विषय दप्तरी दाखल करणेत यावा.

**मा.महापौर** – हा विषय दप्तरी दाखल करणेत येत आहे.

**मा.शत्रुघ्न काटे** – सदर सूचनेला अनुमोदन देतो आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ४०७ विषय क्रमांक – १२
दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.प्रशांत शितोळे, मा.नितीन काळजे यांचा प्रस्ताव
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.९२ दि.२७/०९/२०१३

विषय क्रमांक १२ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ४०८ विषय क्रमांक – १३
दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१०/५९१/२०१३, दि.०४/०९/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र. ३० दि.१९/०९/२०१

विकास योजना सुधारित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतूदीनुसार कार्यवाही सुरु करणेत येत आहे. सन २०११ मध्ये उक्त अधिनियमा मध्ये सुधारणा करणेत आली असून दि.०५/०४/२०११ पासून अंमलात आली आहे. त्यानुसार विकास योजना तयार करणेचा कालावधी खालीलप्रमाणे आहे.

| कलम | कार्यवाहीचा तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| २३ | विकास योजना सुधारित करणेचा इरादा जाहिर झालेनंतर हरकती / सुचना मागविण्याचा कालावधी | सदर ठराव शासकीय राजपत्रात प्रसिध्द झालेनंतर हरकती / सुचना मागविण्यासाठी ६० |

| | | |
|---|---|---|
| | व कलम २४ अन्वये नगररचना अधिकारी नेमणूक करणेचा ठराव करणे. | दिवस मुदत देणे. |
| २६ | विकास योजनेचे प्रारुप तयार करून राजपत्रात प्रसिध्द करणे. | इरादा राजपत्रात प्रसिध्द झालेनंतर २ वर्षात अथवा ६ महिन्याची वाढीव मुदत (शासनाच्या मंजूरीने मिळू शकते) म्हणजेच ३० महिन्यात व तदनंतर प्रसिध्द झालेनंतर हरकती / सुचना मागविण्यासाठी ३० दिवस मुदत देणे. |
| ३० | प्रारुप विकास योजना शासनास मंजूरीसाठी सादर करणे. | कलम २६ अन्वये प्रसिध्द झाल्यापासून ६ महिन्यात अथवा वाढीव ६ महिन्याच्या कालावधीत (शासनाच्या मंजूरीने मिळू शकते) म्हणजे १ वर्षात सादर करणे. |

वर नमुद केल्यानुसार विकास योजना तयार करणेच्या विविध टप्प्यात कालावधी निश्चित झालेला आहे. सदर विकास योजना सुधारित करण्याच्या अनुषंगाने पुढील सर्व कामे पार पाडण्यासाठी प्रथमत: महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये नगररचना अधिकारी यांची नेमणूक आणि तसेच उक्त अधिनियमाच्या कलम २३ अन्वये सदर क्षेत्राची विकास योजना सुधारित करणेकरिता इरादा जाहिर करणे आवश्यक आहे. तथापि इरादा जाहिर झालेनंतर ३ वर्षाच्या आत विकास योजनेची कार्यवाही पुर्ण करुन शासनास सादर करणे आवश्यक आहे. त्यासाठी विकास योजना सुधारित करणेच्या प्राथमिक टप्पा म्हणजेच प्राथमिक मोजणी, सर्वेक्षण व बेसमॅप (Base Map) करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेमधील उपलब्ध अधिकारी, कर्मचारी यांचेकडील दैनंदिन कामकाज सांभाळून सर्व्हे करणेसाठी जादा वेळ लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या कामासाठी खाजगी संस्थेची मदत घेऊन सर्व्हे करणेसाठी मा.मनपा सभेची मंजूरी घेणे योग्य होईल. सदर सर्वेक्षण, प्राथमिक मोजणी व बेसमॅप (Base Map) तयार झालेनंतर कलम २३ खाली इरादा जाहिर करणे व कलम २४ खाली नगररचना अधिकारी नेमणूकीबाबत कार्यवाही करता येईल व अधिनियमातील विहित कालमर्यादेत विकास योजना मंजूरीसाठी शासनास सादर करता येईल. त्यासाठी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यासाठी जुन्या हद्दीच्या मंजूर विकास योजना क्षेत्राची प्राथमिक मोजणी, सर्व्हेक्षण व बेसमॅप (Base Map) खाजगी संस्थेमार्फत घेणेसाठी आणि त्याकरिता निविदा प्रसिध्द करणेकामी प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर ब-याच लोकांना या विषयाबाबतची माहिती कदाचित असेल किंवा नसेल तरी या विषयाच्या अनुषंगाने माहिती होईल. १९८६ला प्रथम डि.पी. आला, त्यानंतर आज २० वर्षांनंतर डि.पी. रिव्हिजनसाठी हा विषय मा.शहर सुधारणा समितीमार्फत महापालिका सभेकडे आला आहे. यापूर्वी शहरातील

जुन्या हद्दीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे प्रस्ताव पूर्वी मंजूर झाले आहेत. त्यात काही बदल म्हणा किंवा सुधारणा म्हणा, शहराच्या दृष्टीकोणातून अतिशय महत्वाचा विषय आहे. या विषयांच्या अनुषंगाने सूचना म्हणा, तक्रार म्हणा, विनंती म्हणा करु इच्छितो. शहरात ब-याच आरक्षणांच्या मोजण्या चालू आहेत. डि.पी. रिव्हिजन करायची वेळ आली आहे. १९% ते २०% जागा ताब्यात घेतल्या आहेत. कितीतरी लोकांनी स्वतःहून जागा ताब्यात दिल्या आहेत. एकूण शहरात बघितले तर लाखो, करोडोंचा टिडीआर जनरेट झाला. जागा ताब्यात मिळाली. तरीसुद्धा १५ ते २०% च्या पुढे टक्केवारी जाऊ शकली नाही. आज ही वेळ आलेली आहे. डिपी रिव्हीजनपर्यंत आज आलेलो आहोत. एका बाजूला आरक्षणाच्या जागांची मोजणी चालू केली आहे. मागणी करणारेही आम्हीच आहोत. आर झोनमधील अनधिकृत बांधकामे काढू नका, आरक्षणातील काढा अशी आमची मागणी आहे. डि.पी. तयार होण्याआधी बांधकामांना काही आधार नाही का, असा सुद्धा प्रश्न रिव्हाईज डि.पी. करताना सभागृहासमोर येईल. ज्यावेळी तुमच्यासमोर विषय येईल. मी सुधारीत विकास आराखड्याच्या अनुषंगाने सभागृहालासुद्धा माहिती देतो आहे. प्रत्येकाला माहीत आहे, आपल्या प्रभागात बाधीत घरे किती, किती स्क्वे. फूट आहे. आरक्षणे किती आहेत, कोणत्या प्रकारचे आरक्षण आहे, ब्ल्यू लाईनमध्ये आहे का, रेड लाईनमध्ये आहे का. ज्युनिअर इंजिनिअर सर्वे करत आहेत. सर्व सदस्यांना, अधिका-यांना याची माहिती आहे. परंतु आत्ताच मला एका सदस्यांनी सांगितले, आज आरक्षणाची बांधकामे काढून घेण्यासंदर्भात सुद्धा लाईन ऑफ अक्शन तुम्ही संबंधितांना सुचवण्याचे विचाराधीन आहे. हे करत असताना नोटीसा सुद्धा आलेल्या आहेत. याचा विचार करत असताना शेवटाला गेलो असताना पुन्हा सुरुवात करतोय. डि.पी.ची मुदत संपायला आली होती. खरेतर पुन्हा एकदा कायद्याच्या चाकोरीत बांधून पडणार का असा प्रश्न उभा राहिल्याशिवाय राहणार नाही. हे होत असताना ३ वर्षांच्या आत इरादा जाहीर झाल्यानंतर शासनाला सादर करणे आवश्यक असते. या गोष्टीचा आपण जरुर विचार करणार का? जुन्या हद्दीत जी गावे समाविष्ट झाली. पिंपळे निलख, पिंपरी, चिंचवड, आकुर्डी, वाकड असेल, निगडी असेल, बराचसा भाग यात येतो. भोसरी गाव असेल, गावे आली त्यावेळची परिस्थिती, त्यावेळी जो डि.पी. जाहीर झाला. त्याचा जो परिणाम झाला. बैठक घेत असताना ज्या सूचना/हरकती आल्या त्याचा विचार करावा. आज डि.पी. साठी आलेल्या सूचनांचा विचार केलातर त्यासाठी ५०० तक्रारी प्राप्त झाल्या. त्याकाळात शहराचा डिपी जाहीर झाला, त्यावेळी आजच्या तूलनेत सूचना/हरकती अतिशय कमी आल्या होत्या. त्यावेळची तत्कालिन परिस्थिती पाहीलीतर त्यावेळी सर्व लोक शेती करत होते. कामगार वर्ग जास्त होता. इंडस्ट्रीयल एरिया होता. डिपी रिव्हिजनमध्ये विकास आराखडा जेव्हा तयार झाला. त्यापूर्वीचे जे रहिवासी असतील, त्यापूर्वी तिथे नागरीकरण झाले असेल तर त्यांना सुरक्षितता देणे, त्यांनी इथे राहणे, त्यांना वाचवणे आपले कर्तव्य आहे असे मला वाटते. त्याप्रमाणे आपण कारवाई कराल. विकास आराखडा असा जिवंत बाधीत ठेवाल अशी अपेक्षा आहे. नवीन गावांतील नगरसेवकांना यातील गांभिर्य लक्षात येतील का मला माहित नाही. जुन्या गावांतील माझ्यासारख्या व्यक्ती यांना मात्र त्याचा तोटा झाल्याशिवाय राहणार नाही. माझी आग्रहाची विनंती आहे की, आज मोजणी चालू आहे. उद्या पाडायची म्हणून करु नका. ब्ल्यू लाईन, रेड लाईनमध्ये जी आरक्षणे आहेत, आहेत म्हणून ती पाडायची असा लोकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. कायदेशीर बाबीं घेऊन काही करता आलेतर त्याचा खुलासा करावा

अशी विनंती करतो. मा.महापौर साहेब, अतिशय महत्वाचा विषय आहे. जुन्या पिंपरी चिंचवड शहराची हद्द आहे. या विषयाला मंजूरी द्यावी अशी विनंती आहे.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, डि.पी. प्लॅनचा विषय सभागृहापुढे आलेला आहे. मा.प्रशांत शितोळे यांनी ब-याच गोष्टींचा उल्लेख केला आहे. मुळात पिंपरी चिंचवड महापालिका स्थापन झाली त्यावेळी गावे मिळून ही महापालिका स्थापन झाली. नंतर डिपी झाला. त्यावेळी सूचना/हरकती आल्या नव्हत्या. त्यावेळी लोकांमध्ये अज्ञान होते. परंतू आज सुधारीत डि.पी. होणार आहे, त्यावेळी सगळ्या गोष्टींना सामोरे जावे लागणार आहे. सुधारीत डि.पी. होत असताना नगरसेवक म्हणून पिंपरी चिंचवड शहराचा नागरीक म्हणून आमची अपेक्षा आहे. सर्व गोष्टींचा बारकाईने विचार व्हावा. मुळात ज्या ठिकाणी आरक्षणात घरे बांधली, अशा ठिकाणी आपली काय भूमिका असणार आहे. नगरसेवक म्हणून आपण लोकांना मदत केली पाहीजे. त्यांची घरे वाचली पाहीजेत. प्रत्यक्षात जागेवर न जाता डि.पी. प्लॅन केला जातो. त्यामुळे अनेक तक्रारी पुढे आल्या आहेत. कोणतीतरी एजन्सी, कन्सल्टंट अपॉईंट करतो. प्रत्यक्षात जागेवर जाऊन पाहणी न करता ऑफिसमध्ये बसून नकाशे तयार करतात. शेतक-यांवर, नागरीकांवर मोठ्या प्रमाणात अन्याय होतो. च-होली इथे सगळ्या जमिनी ज्या आरक्षणात गेल्या आहेत, अशी बरीचसी शेतकरी कुटूंबे आहेत. हा अन्याय शेतक-यांवर झाला आहे. त्यांच्यावरील अन्याय दूर करता येतो का हे पाहिले पाहीजे. आज या परिसरामध्ये महत्वाचा मुद्दा हा आहे की, जुन्या डिपीची अंमलबजावणी नेमकी कितपत झाली आहे. याची प्रशासनाला माहिती असेलतर आज लोकप्रतिनिधी म्हणून या डिपी प्लॅनची माहिती आम्हाला मिळाली पाहीजे. याची नेमकी किती अंमलबजावणी झाली, किती रस्ते आरक्षणात आले याची माहिती कळाली पाहीजे. इथून पुढे डिपी होत असताना याचा बारकाईने विचार करावा. यातून चांगला मार्ग काढून हरकती/सूचना कमीत कमी याव्यात, नागरीकांच्या हिताचे निर्णय व्हावेत अशी भूमिका घेतली जावी. डिपी होत असताना नेमका किती कालावधी लागणार आहे,या सगळ्या गोष्टींची सुद्धा माहिती मिळाली पाहीजे. या विषयाचा खुलासा सभागृहाला व्हावा अशी अपेक्षा आहे.

**मा.नितीन काळजे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ज्यावेळी 1997 ला नवीन गावे महापालिका हद्दीत समाविष्ट झाली, त्यावेळी आमची घरे आधी रस्त्याच्या आरक्षणात टाकली होती. आमची घरे पूर्वीपासून आहेत. ग्रामपंचायतीत नोंद आहे. 1999 ला डिपी तयार झाला. त्यावेळी विहीरी, घरे रस्त्यामध्ये दाखवली गेली. त्यावेळी पब्लिश झाली होती. नंतर ती दाखवली गेली नाही. आमच्या च-होली गावापर्यंत आमत्. 18 विहीरी व 70/80 घरे आरक्षणात जातात. ही नंतर झालेली घरे नाहीत. 1997 पूर्वीची घरे आहेत. मागे सुद्धा सांगितले होते, याविषयी काहीतरी केले पाहीजे. घरमालकांना भरपाई दिली पाहीजे. मोनार्च कंपनी, टाटा कन्सल्टन्सी यांनी जो सर्वे केला. त्यावेळी दगड लावले होते. काही शेतक-यांनी दगड लागू दिला नाही. त्यानंतर दगड न लावल्यामुळे परत चेंजेस होत गेले. जागेवर पझेशन वेगळे देतो. रस्ता करताना शेतकरी जागा सोडत नसेल तर ती जागा सोडून दुसरीकडे पझेशन दाखवतो. अशाप्रकारे महापालिकेची दिशाभूल करत आहेत. माझ्या कुटूंबातील जागांवर 4 ठिकाणी आरक्षणे पडली आहेत. मी स्वतः हरकत घेतली आहे. त्यावेळी सुद्धा काही झाले नाही.

माझ्या शेजारी बिल्डरने बिल्डींग उभी केली आहे. पेपरमध्ये दाखवले आहे. रेकॉर्डप्रमाणे दिलेले आहे. प्रत्यक्षात हा रस्ता चुकीचा केला आहे. मी आपल्याकडे चुलत्याच्या नावाने तक्रार केली आहे. त्यावर काही कारवाई झालेली नाही. बिल्डर व अधिकारी संगनमताने यात लक्ष काही देत नाहीत. स्थापत्य विभागात पत्र दिले, रस्ता बरोबर केला आहे. नंतर सांगितले तुम्ही डिमार्केशन द्या. नगररचना यांनी दिले पाहिजे. लवकरात लवकर डिमार्केशन करुन त्याप्रमाणे दगड लावावेत. एवढेच माझे सांगणे आहे.

**मा.महापौर** – विषय मंजूर करणेत येत आहे.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, विषय मंजूर करायचे म्हटले नव्हता. जी आरक्षणे ठेवली आहेत, ती ताब्यात घेऊ नये याला पण मर्यादा असते. 1967 मध्ये जी आरक्षणे पडली आहे. ती 1964 मध्ये इंडस्ट्रीयल एरिया जाहीर झाला. त्यानंतर लेआऊट करायला सुरुवात झाली. महापालिका झाल्यानंतर आरक्षणे पडली असली तरी 1967 च्या ले आऊटमधले आरक्षण तुम्ही ताब्यात घेत नाहीत. याला काय म्हणायचे? मा.आयुक्त साहेब, आम्ही आपल्याला दोष देत नाही. परंतू या प्रशासनात किती डोळेझाक होते. प्लॉट रिकामा का ठेवला. लोक जिथे जागा मिळेल तिथे घरे बांधतात. मा.आयुक्त साहेब, आपण नवीन विकास आराखडा तयार करणार आहात. ग्रीन झोन किती टक्के ठेवणार आहात. सवलतीसाठी किती टक्के ठेवणार आहात, यलो झोन किती टक्के ठेवणार आहात. याची टक्केवारी द्यायला पाहीजे. 3/4 वर्षे लागणार होती. या आधीपासून आम्ही होतो. डिपी. 1992 ला झाला. 1994 ला आला. 3/4 वर्षे यासाठी जातात. टक्केवारी काढली असती तर बरे झाले असते. ज्यावेळी कामाला सुरुवात केली, त्याची टक्केवारी द्यावी. याठिकाणी पूर्वीची जी आरक्षणे ठेवली आहेत, ती तशीच ठेवणार आहात का याचा खुलासा पाहीजे आहे. या कामासाठी खूप वेळ लागणार आहे. म्हणून या विषयाला मंजूरीला आमचा विरोध नाही.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा.सुजाता पालांडे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ४०९ विषय क्रमांक – १४

दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/१५/पिंपरी/१०/२०१३, दि.०३/०९/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२८ दि.१९/०९/२०१३

३) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.नरवि/कावि/१५/पिंपरी/१८/२०१३ दि.१९/९/२०१३

४) मा.महापालिका सभा ठराव क्र. ३७८ दिनांक २०/९/२०१३

मोरवाडी स.नं.१५०, १५१, १५२ येथे आरक्षण क्र.९१ मधील पार्क या आरक्षणातील पश्चिमेकडील २०५००.०० चौ.मी.क्षेत्र आणि आरक्षण क्र.९५ सांस्कृतिक केंद्र २००० मी. असे एकूण सुमारे २२५००.०० चौ.मी.क्षेत्र या आरक्षणातून वगळून प्रस्तावा सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.९५ बहुउद्देशिय कलाकेंद्र या प्रयोजनासाठी आरक्षित करणेकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये पुर्नफेरबदल बाबत कार्यवाही प्रसिध्दीस देऊन त्यावरील प्राप्त हरकती, सुचना यावर सुनावणी घेऊन शासनास फेरबदल प्रस्ताव सादर करणेबाबत आयुक्तांना अधिकार देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.जावेद शेख** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण सदरच्या आरक्षणात जे काही फेरबदल सुचविलेले आहेत. हा विषय मंजूर करायला आम्हाला हरकत नाही. परंतू विषयाला धरुन काही गोष्टी सूचवायच्या आहेत. माझ्या प्रभागात आरक्षण क्र.५४८ प्राथमिक शाळा, येथे दोन/चार दिवस झाले, काही अधिकारी आले. ही घरे काढून टाकायची म्हणून त्यांनी नोटीसा दिल्या. सर्वे नं. ८४ ला जे आरक्षण पडले आहे, त्याकरिता यात कुठेतरी समन्वय घडवावा. या आरक्षणात एकूण ५४ घरे आहेत. मागिल वर्षी १२ ऑगस्ट रोजी पत्र दिले होते. सदरचा मूळ मालक व रहिवाश्यांमध्ये समन्वय घडवून आणावा. मूळ मालक यांचे स्वतःचे देखील अनधिकृत बांधकाम आहे, ही गोष्ट निदर्शनास आणून दिली आहे. ज्यावेळी इंगळे साहेब, भदाणे मॅडम यांनी साईट व्हिजिट केली होती. पुढे काही होईल असे वाटले होते, तसे काही झाले नाही. प्रशासनाच्या हातात सगळ्या गोष्टी असतील तरी सोयीस्करपणा का करुन घेतात? प्रशासन व सभागृह ही दोन चाके आहेत. त्यांना एकमेकांची मदत लागते. ५४ घरे वाचवायची असतील तर मूळ मालकावर दबाव आणणे गरजेचे आहे. पत्रात उल्लेख आहे. आरक्षण क्र. २६४ वर माजी नगरसेवक श्री.गोपाळ कुटे यांचे घर आहे. विठ्ठल मंदिराशेजारी ओपन स्पेसमध्ये आरक्षण क्र. २६४ मध्ये बंगला आहे. घर खाली करावे म्हणून त्यांना नोटीस सुद्धा मिळाली आहे. २/३ दिवसांत कोणतीही कारवाई झालेली नाही. याच मालकाने आरक्षण क्र. ५४८ मध्ये नागरीकांना सर्वसाधारण ५४ लोकांना जागा विकली आहे. कोणी अर्धा गुंठा, एक गुंठ्यात इमारत बांधली आहे. सात बारावर ४३ लोकांचे नाव लागले आहे. प्रशासनाने कारवाई केलीतर त्याचा टिडीआर, एफएसआय मूळ मालकालाच मिळणार आहे. पहिले ज्या मालकाने घर विकले त्याने त्या घराचे पैसे घेतले. नंतर या घरांवर कारवाई केल्यानंतर त्याचा टिडीआर घेणार. आरक्षण क्र. ५४८ मध्ये तीन मजली इमारत आहे, त्याची आजपर्यंत नोंद नाही. ३६ फ्लॅट आहेत. सगळे भाड्याने दिलेले आहेत. काही जणांनी ते विकायचा प्रयत्न केला, त्यावेळी मी विरोध केला होता. मालकाबरोबर माझा वाद झाला. आपल्या महापालिकेचे पाणी देखील फुकट चालू आहे. आपल्या अधिका-यांना पहायला वेळ नाही. यावर कारवाई करा. मी मागिल वर्षी १२ ऑगस्टला यासंदर्भात पत्र दिले आहे. गोपाळ कुटे यांनी प्लॅन टाकला आहे. आरक्षणातील फेरबदलाचा भाग असतो. आरक्षण क्र.५४८ मध्ये एवढी जागा असेल तर त्याचा निर्णय दिला पाहीजे. ५४ घरांचे डिमॉलिशन केलेतर २५०/३०० नागरीक रस्त्यावर येतील. त्यांनी एक/एक

पै जमा करुन घर घेतले आहे. यात लक्ष घाला, वेळ द्या. आज दोघा भावांत वाद आहे. आज प्रभाकर कुटे यांची मिसेस नगरसेविका आहे. ज्या लोकांची घरे बाधीत होतील त्यांचे काय? या विषयावर काहीतरी ठोस निर्णय होईल तो नागरीकांच्या हिताचा होईल. माझी मनापासून भावना आहे, या ५४ घरांसाठी न्याय करावा. यात विशेष लक्ष द्यावे. यातून मार्ग काढायचा प्रयत्न करावा. यासाठी आयुक्त साहेब आपण महापौर साहेब यांना सूचना करावी. या विषयावर पडदा टाकावा. माजी नगरसेवकाची इमारत पाडण्यासाठी पहिली माणसे पाठवावीत. मी तुमच्याबरोबर आहे. भदाणे मॅडम फक्त एकदा आल्या. त्यांनी वेळ द्यावा. यात माझे एक वर्ष गेले.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शेख साहेबांनी जसे सांगितले. सार्वजनिक कामासंदर्भात आपल्या अधिका-यांकडून जी कामे केली जातात, त्याठिकाणी सन्मा. सदस्य म्हणून आपल्याला चुकीची उत्तरे दिली जातात याबाबत खेद वाटतो. माझ्या प्रभागात 11 मीटरचा रस्ता झाला आहे. 3/4 वर्षांपूर्वी ड प्रभाग स्थापत्य विभागात त्याठिकाणी असणारे मूळ मालक आदरणीय आमदार लक्ष्मण जगताप यांच्या मध्यस्थीने त्यांनी संमती घेतली व रस्त्याचे काम सुरु केले. तिथे मस्जिदचा भाग येतो. मी 3 वर्षांपूर्वी कागद दिले. अजून दखल घेतली नाही. मूळ मालकाने 8 गुंठ्याची जागा देऊन महापालिकेला सहकार्य करुन सुद्धा तीन-चार वर्षे झाली तरी त्यांना मोबदला मिळत नाही. प्रशासन काय करते असा प्रश्न निर्माण होतो. वारंवार विनंती केली. 10/8/5 गुंठे अवार्ड डिक्लेअर करुन मोबदला देता येणार नाही. हा अन्याय आहे. जनतेवर अन्याय करु नका. महापालिकेच्या विकासासाठी जागा मालक त्यांच्या जागा देतात. त्यांच्याशी धन्यवाद माना,अभिनंदन करा. त्यांच्यावर अन्याय करु नका. आपल्या नगररचना विभागाला सूचना द्या. पिंपळे गुरव, नवी सांगवी, सांगवी परिसरातील ज्या मूळ मालकांनी यापूर्वी 18 मी. रस्त्यासाठी त्यांच्या जागा दिल्या आहेत. त्यांना मोबदला मिळालेला नाही. त्यांना लवकरात लवकर मोबदला द्यावा. तशी तरतूद करावी अशी सूचना करतो.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,विषय क्र. 14 ला नगररचना संचालक श्रीमती भदाणे मॅडम यांनी खुलासा करावा. यापूर्वी ज्या हरकती/सूचना झाल्या, त्या बाद करणार आहात का?

**मा.भदाणे (उपसंचालक,नगररचना)** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, प्रथमतः मा.सिमाताई सावळे यांनी मला संचालक केल्याबद्दल I am very happy. २००९ मध्ये मायनॉर मॉडिफीकेशन्स झाले होते. त्यामध्ये क्रमांक ९५ मध्ये कल्चरल सेंटर होते. त्यात २००० चौ.मी. चे मायनॉर मॉडिफिकेशन्स प्रपोज केले होते. ते २०१० च्या सातव्या महिन्यात सॅंक्शन होणार होते. त्यादरम्यान एका च-होलीच्या विषयात उपसूचना देऊन आरक्षण क्र.९१ मध्ये ट्रॅफिक पार्क करावे अशी उपसूचना दिली होती. मध्यंतरी उपसूचनेवर कारवाई करायची नाही असे ठरले असल्यामुळे या विषयात डायरेक्ट नोटीस काढली होती. सूचना/हरकती मागविल्या

होत्या. सुनावणीची डेटही फिक्स केली होती. आयुक्त साहेबांच्या आदेशानुसार नस्ती बंद केली आहे. प्रशासनाने नव्याने मॉयनॉर मॉडीफिकेशन्ससाठी हा प्रस्ताव सादर केला आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.तानाजी खाडे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४१० विषय क्रमांक – १५

दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

**मा.विधी समिती**

**अ)** दिनांक १६/८/२०१३, २३/८/२०१३ व ६/९/२०१३चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

**ब)** दिनांक ६/९/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.नितीन काळजे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.तानाजी खाडे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४११ विषय क्रमांक – १६

दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

**मा.महिला व बालकल्याण समिती**

**अ)** दिनांक १४/८/२०१३, २८/८/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ब)** दिनांक ११/९/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**क)** दिनांक २५/०९/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.नितीन काळजे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.तानाजी खाडे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४१२ विषय क्रमांक – १७

दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

**मा.शहर सुधारणा समिती**

**अ)** दिनांक २१/८/२०१३ व २६/८/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.नितीन काळजे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.तानाजी खाडे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४१३ विषय क्रमांक – १८

दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

**मा.क्रिडा समिती**

**अ)** दिनांक २१/८/२०१३ व २६/८/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ब)** दिनांक ०४/०९/२०१३ व दिनांक १३/९/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**क)** दिनांक १९/९/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.नितीन काळजे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.तानाजी खाडे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १९

दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.डप्र/पापु/४५१/२०१३, दि.१४/१०/२०१३

जुनी सांगवी येथे जुनी ६ लक्ष लिटर पाण्याची टाकी, पंप हाऊस व पंप पाडून १५ ल.लि. क्षमतेची नवीन टाकी बांधणे या कामाच्या रक्कम रु.१,१५,९५,६३३/-च्या अंदाजपत्रकीय रक्कमेस दि.२२/०३/२०१३च्या मा.महापालिका सभेपुढे ठ.क्र.२४५ नुसार मान्यता मिळालेली आहे. परंतु सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकामध्ये पान क्र. ७०७, अनु. क्र.३९ वर ३२,००,०००/- अंदाजपत्रकीय रक्कम आलेली आहे व सदर अंदाजपत्रकास एकत्रित मान्यता मिळालेने या अंदाजपत्रकीय रक्कमेस (३२,००,०००/-) सुद्धा मान्यता मिळालेली आहे. सदर कामाच्या निविदा काढावयाच्या झाल्यास या कामाला प्रशासकीय मान्यता रक्कम रु. १,१५,९५,६३३/- सन २०१२-१३ च्या आर्थिक वर्षात मिळालेली असल्याने, सन २०१३-१४ च्या आर्थिक वर्षासाठी या कामास रु.१,१५,९५,६३३/- या रक्कमेस मान्यता मिळणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने सदर विषयांकित कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,१५,९५,६३३/- इतक्या रक्कमेस नव्याने मान्यता मिळणेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे सूचना मांडते -

मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्रमांक पापु/१५/-/२०१३ दिनांक २१/११/२०१३ नुसार मा.महापालिका आयुक्त यांना त्यांचे विषय क्रमांक १९ वरिल विषयपत्र मागे घेणेस मान्यता देणेत यावी.

**मा.यमुनाताई पवार** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ४१४ विषय क्रमांक – १९

दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.डप्र/पापु/४५१/२०१३, दि.१४/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्रमांक पापु/१५/-/२०१३ दिनांक २१/११/२०१३ नुसार मा.महापालिका आयुक्त यांना त्यांचे विषय क्रमांक १९ वरिल विषयपत्र मागे घेणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.नंदा ताकवणे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २०वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – २०

दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.डप्र/पापु/४४९/२०१३, दि.१४/१०/२०१३

जलक्षेत्र क्र. ड/१२ पिंपळे गुरव परिसरातील गुरुत्व वाहिनीवरील थेट पाणीपुरवठा बंद करणेकामी स.नं.७२ येथे २० द.ल.लि. क्षमतेची टाकी बांधणे या कामाच्या रक्कम रु.१,३०,००,०००/- च्या अंदाजपत्रकीय रक्कमेस दि.२६/११/२०१२ च्या मा.महापालिका सभेपुढे ठराव क्र.१४५ नुसार मान्यता मिळालेली आहे. परंतु सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकामध्ये पान क्र. ७०८, अनु.क्र.५३ वर ४०,००,०००/- अंदाजपत्रकीय रक्कम आलेली आहे व सदर अंदाजपत्रकास एकत्रित मान्यता मिळालेने या अंदाजपत्रकीय रक्कमेस (४०,००,०००/-) सुद्धा मान्यता मिळालेली आहे. सदर कामाच्या निविदा काढावयाच्या झाल्यास या कामाला प्रशासकीय मान्यता रक्कम रु.१,३०,००,०००/- सन २०१२-१३ च्या आर्थिक वर्षात मिळालेली असल्याने, सन २०१३-१४ च्या आर्थिक वर्षासाठी या कामास रु.१,३०,००,०००/- या रक्कमेस मान्यता मिळणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने सदर विषयांकित कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,३०,००,०००/- इतक्या रक्कमेस नव्याने मान्यता मिळणेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.आशा सुपे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे सूचना मांडते -

मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्रमांक पापु/१५/-/२०१३ दिनांक २१/११/२०१३ नुसार मा.महापालिका आयुक्त यांना त्यांचे विषय क्रमांक २० वरिल विषयपत्र मागे घेणेस मान्यता देणेत यावी.

**मा.अनिता तापकीर** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ४१५ विषय क्रमांक – २०
दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.डप्र/पापु/४४९/२०१३,
दि.१४/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्रमांक पापु/१५/-/२०१३ दिनांक २१/११/२०१३ नुसार मा.महापालिका आयुक्त यांना त्यांचे विषय क्रमांक २० वरिल विषयपत्र मागे घेणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.तानाजी खाडे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – २१
दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.पअक/१०/कावि/८५४/२०१३,
दि.१९/१०/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये कासारवाडी येथे मनपामार्फत मैलापाणी शुद्धीकरणासाठी टप्पा क्र. १,२ व ३ असे एकुण तीन Sewage Treatment Plant आहेत. सदर प्लॅन्टमध्ये सद्यस्थिती सर्वसाधारण ७४ ते ८० एम.एल.डी. मैलापाण्यावर प्रक्रिया केली जाते. सद्यस्थितीत प्रक्रियायुक्त पाण्याचा पुर्नवापर काही प्रमाणात मनपाचे उद्यानासाठी करणेत येतो व उर्वरित पाणी नदीपात्रामध्ये सोडणेत येते. CME येथे कासारवाडी STP पासून पंपिंगद्वारे पाणी पुरविणेच्या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर कामाची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम २,४७,४८,२११/- इतकी येत असलेबाबत, त्यांना यापूर्वी कळविलेले आहे. त्यानंतर त्यांनी दिनांक २५/०७/२०१३ रोजीचे पत्रानुसार सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम मनपाकडे डिपॉझीट म्हणून जमा करणेची, तसेच या रक्कमेतून काम पूर्ण झालेनंतर देखभाल, दुरुस्तीकामी प्रति महिना आवश्यक ती रक्कम देणेची संमती दर्शविलेली आहे. तसेच सदरचे काम त्यांनी त्वरीत पूर्ण करुन देणेबाबत कळविलेले आहे. परंतु सदर कामासाठी CME यांचेकडून सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकानंतर (म्हणजे २५ जुलै २०१३ रोजी) पत्र मिळाले असून या विभागामार्फत सदर कामाचे खर्चासाठीची तरतुद या वर्षाच्या मनपाच्या अंदाजपत्रकामध्ये करणेत आलेली नाही. परंतू सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम CME कडून मनपाकडे जमा होणार असलेने त्या रक्कमेतून सदर काम मनपामार्फत करुन घेणेस येणारे अंदाजे सुमारे र.रु.२,४८,००,०००/- चे रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.किरण मोटे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो –

पवना नदीवरील पिंपळे सौदागर येथील डेअरी फार्म लगतचा बंधारा मनपामार्फत तोडणेत आलेने मिलीटरी डेअरी फार्मचे नदीतून पंपींग करणेत येणार पाणी बंद झाल्याने व त्यांची दैनंदिन पाण्याची गरज लक्षात घेता व कामाची निकड लक्षात घेता व कामाची निकड पहाता कासारवाडी मैलाशुद्धीकरण केंद्रामधील प्रक्रिया केलेले पाणी सदर मिलिटरी डेअरी फार्म येथे पुरविणेच्या कामास येणा-या अंदाजे र.रु.३,००,००,०००/- प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.नितीन काळजे** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.संजय काटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय मी वाचला. आपल्याकडे सीएमई पैसे भरणार आहे. आपण शुद्धीकरण केलेले पाणी देणार आहोत. त्यासाठी सीएमई त्यांच्या आर्थिक बजेटमधून खर्च करणार आहे. सीएमई चा हा विषय लगेच मंजूर करु नये. २/३ मिटींग विषय तहकूब ठेवावा. सीएमईच्या हद्दीतून बोपखेलचे नागरीक ये-जा करत असतात. दीड वर्ष झाले, रस्त्यावरील खड्डे बुजवत नाहीत. ते स्वतः दुरुस्ती करत नाहीत. आपल्याला करु देत नाहीत. त्यामुळे विषयाला त्वरित मंजूरी देण्याचे कारण नाही. विषय तहकूब ठेवावा. नागरीकांची सोय होणे महत्वाचे आहे. सीएमईमुळे जागतिक लेवलचे रोलिंग चॅनेल झाला आहे. आपल्या महापालिकेचे नाव आशिया खंडात जाणार आहे. ते असहकाराची भूमिका घेतात. त्यामुळे त्यांना लगेच ग्रीन सिग्नल देऊ नये. हा विषय २ महिने तरी तहकूब ठेवण्यात यावा अशी विनंती करतो.

**मा.किरण मोटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सीएमई आपल्याला सहकार्य नसले तरी शासनाच्या गाईडलाईन्स अशा आहेत. तुम्ही मैलाशुद्धीकरणातून पाणी डायरेक्ट सोडून देता. हे पाणी १० टक्के तरी रिसायकल केले पाहिजे. मी सर्वांना विनंती करतो की, या विषयाला मंजूरी दिलीतर ऐतिहासिक निर्णय होईल. खालच्या गावांना अशुद्ध पाण्याचे परिणाम भोगायला लागतात. महापालिकेला ५ कोटी द्यावे लागणार आहेत. वॉटर फिल्ट्रेशन प्लाण्ट करण्यासाठी पुणे मनपा व पिंपरी चिंचवड दोन्ही मनपांना ५ कोटी द्यावे लागले आहेत. या विषयाला मंजूरी द्यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे. एक ऐतिहासिक निर्णय होईल. मैला शुद्धीकरण केलेले पाणी नदीत डायरेक्ट न सोडता त्याचा सदउपयोग करणार आहोत. माझी विनंती आहे, हा विषय मंजूर करण्यात यावा.

**मा.अतुल शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, संरक्षण खाते म्हणले की आपला हात नक्कीच कपाळावर जातो. अशा खात्याला माझ्या वतीने व सभागृहाच्या वतीने सलाम. त्यांचे काम भूषणावह आहे. परंतू सांगवी, पिंपळे सौदागर, बोपखेल इथे काय परिस्थिती आहे. काय वागणूक देतात. सांगवी फाटा इथे रोड करण्यासाठी जागा सुद्धा देत नाहीत. अशीच परिस्थिती पिंपळे सौदागर व बोपखेल इथे सुद्धा आहे. परवा आपल्या साध्या एका ड्रायव्हरने सीएमईच्या भिंतीला धडक मारली तर त्याला थेट उचलून डेपोला नेले. तो पुरुष आहे पण ती

स्त्री असती तर. आपण का ऐकून घेतो. यांना चकरा मारु द्या. चहा पाणी होऊ द्या. नंतरच निर्णय घ्यावा. हा विषय तहकूब करण्यात यावा अशी सूचना करतो.

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.अतुल शितोळे यांनी जी सूचना केली, त्याला अनुमोदन आहे. मिलिटरी क्षेत्रात नदीपलिकडे गेलोतर सांगवी ते पिंपळे सौदागर, रक्षक सोसायटी ते सांगवी इथे निम्म्यापेक्षा जास्त क्षेत्र मिलिटरीचे आहे. मी नगरसेवक असलो तरी रोडच्या अलिकडे माझे घर व पलिकडे मिलिटरीचे मैदान आहे. आमच्या नागरीकांची फार गैरसोय होते. पूर्वी मा.शरद पवार साहेब संरक्षण मंत्री असताना त्यांनी रस्ते सोडलेले होते. आत्ता त्यांनी पुन्हा अतिक्रमण केले आहे. माझ्या प्रभागात १८ मी. चा डि.पी. रस्ता आहे. सांगवीत एम.के. हॉटेल चौकापासून रोडचे काम करु देत नाहीत. पाईपलाईन टाकू देत नाहीत. आपण प्रशासकीय अधिकारी आहात. महापालिकेचे अभ्यासू आयुक्त आहात. मी गेले वर्षभर प्रयत्न करतोय. रोडचे काम किंवा पाण्याची पाईपलाईन टाकू देत नाहीत. पाण्याच्या लाईन उखडून गेल्या आहेत. आपण सीएमईला सौजन्य दाखवतो. त्यांनी सुद्धा आपल्या कामांना तेवढेच प्राधान्य देणे गरजेचे आहे. हा विषय तहकूब ठेवावा व नंतर या विषयावर चर्चा करावी.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ४१६ विषय क्रमांक – २१
दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.पअक/१०/कावि/८५४/२०१३, दि.१९/१०/२०१३

विषय क्रमांक २१ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.प्रशांत शितोळे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २२वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – २२
दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. नरवि/कावि/२३२/२०१३ दि.१९/१०/१३

मौजे ताथवडे हे गाव शासन अधिसूचना क्र. पीसीसी ३००७/१२६७/प्र.क्र.१७४/ ०७/ नवि-२२, दिनांक ३०/०७/२००९ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेले आहे. त्याबाबतची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ०६/०८/२००९ रोजी

प्रसिद्ध झालेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधि.१९६६ च्या कलम २१ मधील तरतुदीनुसार सदर नव्याने समाविष्ट ताथवडे गावाची प्रारुप विकास योजना तयार करुन ती ३ वर्षांच्या आत शासनास मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ७२८ दि. २१/०८/२००९ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम २३ व २४ मधील तरतुदीनुसार मौजे ताथवडे या गावाच्या क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर केला आहे. सदर इराद्याबाबत दिनांक ०१/०१/२०१० रोजी जाहिर केला असून सदर सूचना शासनाच्या राजपत्र दिनांक १४/०१/२०१० मध्ये प्रसिद्ध झालेला आहे. सदर क्षेत्राची विकास योजना तयार करण्याकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महासभेने संदर्भ क्र.२ च्या ठरावाने उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांची नगर अधिकारी म्हणून नेमणूक करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये मौजे ताथवडे या गावाची विकास योजना तयार करण्याकामी उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांची नगररचना अधिकारी म्हणून कार्यालयीन आदेश क्र. नरवि/कावि/५/५८/२०११, दि.०५/०३/२०११ अन्वये नेमणुक केली आहे. त्यानुसार ताथवडे गावाचा विद्यमान जमिन वापर नकाशा उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दि. २०/०१/२०१२ रोजी सादर करण्यात आला आहे.

उपरोक्त विकास योजना तयार करण्याचा इरादा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २१(१) अन्वये जाहीर केल्यापासुन ३ वर्षांच्या आत शासनास सादर करणे आवश्यक आहे. सदर विकास योजना तयार करण्याचा इरादा दि.१४/०१/२०१० च्या शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेला आहे. तथापि महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील सुधारीत तरतुदीनुसार आणी त्याअन्वये शासनाने पत्र क्र. टिपीएस-१८११/१८४८/प्र.क्र.२१९/११/नवि-१३ दि.०५/१२/२०११ अन्वये दिलेल्या मार्गदर्शनानुसार सदर विकास योजना तयार करण्याचा इरादा दि.०५/०४/२०११ रोजी झाली असल्याचे गृहीत धरण्यात येत आहे. सदर दि.०५/०४/२०११ इरादाची तारीख गृहीत धरल्यास तदनंतर ६ महिन्याच्या आत म्हणजेच दि.०४/१०/२०११ पर्यंत विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करणे उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक आहे. त्यामुळे विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करणेकरीता दि. ०५/१०/२०११ ते दि. २०/०१/२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत मा.महासभेने ठराव घेण्याकरीता मान्यतेसाठी सादर.

मौजे ताथवडे या गावाची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करण्याकरीता मा.महासभेने संदर्भ क्र.३ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर विकास योजना दि. ७.३.२०१३ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाली आहे.

सदर विकास योजना प्रसिद्धीनंतर प्राप्त होणा-या हरकतधारकांना सुनावणी देण्याकरीता उक्त अधिनियमाच्या कलम २८(२) अन्वये नियोजन समितीमध्ये मनपाच्या स्थायी समिती मधील ३ सदस्य श्री.जगताप, श्रीमती बारणे, श्रीमती वाघेरे यांच्या नेमणुकीबाबत मा.महासभेने ठराव क्र. २८१ दि.९/०५/२०१३ रोजी मान्यता दिलेली आहे. तसेच मा.संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दि. ४/०४/२०१३ चे पत्रान्वये नगररचना विभागातील निवृत्त

अधिकारी श्री.कोलटकर, श्री.कुलकर्णी, श्री.रानडे यांची नियोजन समितीमध्ये सदस्य म्हणुन नियुक्त करणेत आले आहे. त्यानुसार कार्यालयीन आदेश क्र.नरवि/कावि/१०/ताथवडे/५७२/२०१३ दि.१२/०८/२०१३ अन्वये नियोजन समिती स्थापन करणेत आली आहे. सदर नियोजन समितीने दि.२१/०८/२०१३ ते दि.३१/०८/२०१३ पर्यंत संबंधित हरकत धारकांना सुनावणी देवुन प्रसिद्ध विकास योजनेच्या अनुषंगाने त्यांचा अहवाल दि.११/१०/२०१३ च्या पत्राने सादर केलेला आहे. नियोजन समितीने सादर केलेला अहवाल मा.महासभेच्या मान्यतेसाठी सोबत सादर करीत आहे. सदर विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधि.१९६६ च्या कलम ३० अन्वये शासनास मंजुरीसाठी सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.राजेंद्र जगताप** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, प्रथमतः ख-या अर्थाने आयुक्त साहेब व नगररचना विभागाच्या अधिकारी श्रीमती भदाणे मॅडम यांचे अभिनंदन करतो. विहीत मुदतीत हा डिपी प्लॅन आमच्या समोर आणला आहे. तो आणत असताना १ के खाली का आणला, एवढी घाई का होती असे काही प्रकारचे आरोप, प्रत्यारोप झाले. यात कोणाचाही मालाफाईड इंटरेस्ट नसताना सुद्धा हा विषय मा.विधी समिती मार्फत यावा किंवा मा.शहर सुधारणा समितीमार्फत यावा. वास्तविक पाहता, जीबीने मान्यता देऊन स्थायी समिती अध्यक्ष, सदस्य जे पदसिद्ध मेंबर असतात. त्यांना, इतर दोघांना व शासनाच्या दोघांना अशी शासनाने कमिटी गठीत केली होती. त्याला सभागृहाने मान्यता दिलेली होती. या सदस्यांना शिफारस करायचा अधिकार असताना विषय १ के खाली आला. सगळे चांगले चालले असताना कुठेतरी बदनामी करायची हा काही लोकांचा छंद आहे. त्यामुळे ज्या-ज्या लोकांना छंद आहे, त्यांनी त्यांचा छंद करावा. माझी हरकत नाही परंतू माझी विनंती आहे, या विषयाचा आणखी अभ्यास करण्यासाठी, यात अधिक पारदर्शकता येण्यासाठी हा विषय एक महिन्यासाठी तहकूब ठेवण्यात यावा. ज्यांना-ज्यांना या विषयाचा अभ्यास करायचा आहे त्यांनी नगररचनामार्फत, नगरसचिवांमार्फत,आयुक्तांमार्फत सर्वांना सेक्शन २६ प्रमाणे पब्लिश झाला होता. नियोजन कमिटीने जे जे निर्णय घेतले होते. त्या कमिटीला फेरबदल करायचा, डिलिट करायचा, प्रपोज करायचा अधिकार महासभेला आहे. म्हणून मा.महापालिका सभेने निर्णय घ्यावा. सहकारी पक्षांनी देखील याचा व्यवस्थित अभ्यास करावा. ६०० हेक्टरचा छोटासा डिपी असल्यामुळे सर्वानुमते, अभ्यासपूर्वक विषय मंजूर करावा. तोपर्यंत हा विषय तहकूब करण्यात यावा.

**मा.आर.एस कुमार** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ४१७ | विषय क्रमांक – २२ |
| दिनांक - २१/११/२०१३ | विभाग - मा.आयुक्त |

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. नरवि/कावि/२३२/२०१३
दि.१९/१०/१३

विषय क्रमांक २२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.प्रशांत शितोळे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २३वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ४१८ विषय क्रमांक – २३
दिनांक - २१/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/कमु/१०७२/२०१३,
दि.१८/१०/१३

पुणे नाशिक महामार्गावरील भोसरी येथील राजमाता जिजाऊ उड्डाणपुलाखालील परिसर विकसीत व सुशोभिकरण करणेकामी र.रु.७७,२१,०००/- चे खर्चास व त्याप्रमाणे करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ९२ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, बेळगांव महानगरपालिकेची निवडणूक होऊन आठ महिन्यांहून अधिक काळ लोटला आहे. तरी निर्वाचित नगरसेवकांना त्यांचे अधिकार बहाल केलेले नाहीत. महापौर, उपमहापौर यांची निवडही करणेत आलेली नाही. याचे एकमेव कारण म्हणजे मराठी नगरसेवक अधिक संख्येने (५८ पैकी ३२ सदस्य) निवडून आले असून, सत्ता त्यांच्या हाती जाण्याची भिती कर्नाटक प्रशासनाला वाटते. यापुर्वी दोन वेळा काहीतरी सबब देवून बेळगांव महानगरपालिका बेकायदेशीररित्या बरखास्त करण्यात आली

होती. वरील प्रकाराचा लोकशाही मार्गाने निषेध करण्यासाठी आम्ही मराठी लोक अधिवेशनाचे पहिल्या दिवशी निर्धार मेळावा घडवायचा प्रयत्न करत असल्याने मेळावा घेण्यास परवानगी नाकारली जाते किंवा ऐनवेळी दिली जाते. इतिहासात युद्धात जिंकून घेतलेल्या प्रदेशावर जेते लोक आपली भाषा, आपली संस्कृती लादत असत. तसला प्रकार लोकशाही युगात चालत असल्याने मराठी भाषकांवर होत असलेल्या अन्यायाबाबत मराठी भाषिकांना पाठिंबा म्हणून कर्नाटक सरकारचा निषेध करणेत येत आहे. मराठी भाषिकांना न्याय मिळावा म्हणून जाहीर पाठिंबा देऊ इच्छितो. त्यांनी २४ तारखेला महामोर्चा काढायचे ठरवले आहे.

**मा.भाऊसाहेब भोईर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.योगेश बहल यांनी अतिशय संवेदनशील विषय सादर केला आहे. हा विषय अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. मा.योगेश बहल यांनी मांडलेल्या निषेध सूचनेला मी अनुमोदन देतो.

**मा.महापौर** – सर्व मराठी भाषिक, बेळगावमधील मराठी भाषिकांना सभागृहातर्फे पाठिंबा देऊन ही सभा संपल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/११६२/१३
दिनांक – ०९/१२/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.